❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती | शुक्रवार, दि. ०४ सप्टेंबर २०२६ ❖ पाने : ८ ❖ अंक : २५० ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com | Epaper - www.sandhyaepaper.com | www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या यूट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE

www.sandhyaepaper.com

**संध्या प्रहार**




# सर्वसमावेशक विकास हाच ‘विकसित महाराष्ट्र २०४७’चा मुख्य आधारस्तंभ

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : शिक्षक दिनानिमित्त विशेष शिक्षकांचा प्रातिनिधिक सत्कार



■ मुंबई (दै. संध्या)

सर्वसमावेशक विकास हा आपल्या भारतीय संस्कृतीचा मूळ गाभा असून समाजात जन्माला येणाऱ्या प्रत्येक मुलाला योग्य संधी व वातावरण मिळणे गरजेचे आहे. ‘विकसित महाराष्ट्र 2047’ या ध्येयाकडे वाटचाल करताना समाजातील प्रत्येक घटकाचा विकास होणे आवश्यक असून ‘दिशा’ अभियानाच्या माध्यमातून विशेष मुलांच्या सर्वांगीण विकासाला चालना दिली जात आहे. या अभियानाशी जोडलेल्या राज्यातील सर्व विशेष शिक्षकांना त्यांच्या अमूल्य योगदानाबद्दल राज्य शासनाच्या वतीने प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. विशेष मुलांना योग्य शिक्षण, संधी आणि वातावरण उपलब्ध करुन देणे ही सामूहिक जबाबदारी असून या क्षेत्रात महाराष्ट्र देशासाठी दिशादर्शक असल्याचे त्यांनी नमूद केले.

शिक्षक दिनाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांच्या वर्षा निवासस्थानी आयोजित कार्यक्रमात विशेष शिक्षकांचा प्रातिनिधिक स्वरूपात राज्यस्तरीय सन्मान करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास जय वकील फाउंडेशनच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अर्चना चंद्र, एसीईसीएफचे सह संस्थापक अमित चंद्र, जय वकील फाऊंडेशनच्या अध्यक्ष व संचालक डॉ. अनायता हेगडे, बजाज फिनसर्व्हच्या अध्यक्षा शेफाली बजाज, एचटी पारेख फाउंडेशनच्या कार्यकारी संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी झिया लालकाका, दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव माणिक गुरसळ, आयुक्त सत्यजित बडे, समग्र शिक्षा अभियानचे राज्य प्रकल्प संचालक संजय यादव, राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांगजन सशक्तीकरण संस्थानचे संचालक राम कुमार, मुख्यमंत्री यांच्या विशेष कार्य अधिकारी प्रिया खान यांच्यासह राज्यभरातील विशेष शिक्षक ऑनलाईन उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, विशेष मुलांचे मूल्यमापन केवळ गुणांवर न होता, त्यांचा आत्मविश्वास आणि समाजात समरस होण्याची क्षमता यावर होते. सर्व शाळांमध्ये ‘दिशा’ अभियान स्वीकारणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. सध्या राज्यातील 36 जिल्ह्यांमध्ये 450 हून अधिक शाळा, 2700 हून अधिक शिक्षक आणि 21 हजारांहून अधिक दिव्यांग व बौद्धिक अक्षम विद्यार्थी या अभियानाशी जोडले गेले आहेत. या मुलांना वैज्ञानिक आणि नव्या अध्यापन तंत्राच्या आधारे शिक्षण देण्यासाठी लागणारी साधनसामग्री या उपक्रमामुळे उपलब्ध झाली आहे. या कार्यक्रमात प्रातिनिधिक स्वरूपात पाच शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. राज्यातील सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी आपापल्या जिल्ह्यांत समारंभपूर्वक सर्व विशेष शिक्षकांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करावे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले. ‘दिशा’ अभियान हा शासनाच्या प्राधान्यक्रमातील महत्त्वाचा उपक्रम असून, याच्या प्रगतीचा व अडचणींचा ‘वॉर रूम’ मधून नियमित आढावा घेतला जाईल, दिव्यांग कल्याण विभागामार्फत दरवर्षी प्रत्येक विशेष मुलापर्यंत व त्याच्या कुटुंबापर्यंत दिशा अभियानाची उपयुक्त छापील वर्कबुक्स पोहोचविली जातील, त्याचप्रमाणे नियमित शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या बौद्धिक अक्षमता असलेल्या बालकांसाठी नियमित शिक्षकांच्या प्रशिक्षणात या अभ्यासक्रमाचा अंतर्भाव करण्यासाठी दिव्यांग कल्याण विभाग आणि जय वकील फाऊंडेशन एकत्रित प्रयत्न करतील आणि बालकांमधील विशेष गरजांची वेळीच ओळख व्हावी यासाठी विशेष ‘प्रशिक्षण मॉड्यूल’ विकसित करण्यात येईल, असे सांगून यासाठी जय वकील फाऊंडेशनने पुढाकार घ्यावा, असे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

### शिक्षकांचा प्रातिनिधीक सन्मान

बौद्धिक अक्षम मुलांसाठी भारतातील पहिला प्रमाणित व एकसमान अभ्यासक्रम असलेल्या ‘दिशा अभियानाची’ प्रभावी अंमलबजावणी केल्याबद्दल यामिनी काळे (नवजीवन मतीमंद मुलांची शाळा, छत्रपती संभाजीनगर), अण्णासाहेब कदम (पांडुरंग निवास मतीमंद विद्यालय, लातूर), वैशाली गायकवाड (नंदनवन दुर्बल मनस्क मुलांची शाळा, नागपूर), ज्ञानेश्वर काळे (कै. रावसाहेब निवासी मतीमंद विद्यालय, देवळी, वर्धा) आणि मानसी मुलाम, जय वकील स्कूल फॉर चिल्ड्रन इन नीड ऑफ स्पेशल केअर, मुंबई शहर या पाच विशेष शिक्षकांच्या उल्लेखनीय कार्याचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. दिव्यांग कल्याण विभागाचे आयुक्त सत्यजित बडे यांनी प्रास्ताविकाद्वारे विभागाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाची तर अर्चना चंद्र यांनी जय वकील फाऊंडेशनच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या दिशा अभियानाची माहिती दिली. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या विशेष कार्य अधिकारी प्रिया खान यांनी कार्यक्रमाचे संचालन केले.

## थोडक्यात...

### ‘कॉकरोच जनता पार्टी’मध्ये मोठी फूट!

**नवी दिल्ली : दैनिक संध्या**

जंतर-मंतरवरील आंदोलनानंतर देशभरात चर्चेत आलेल्या कॉकरोच जनता पार्टीमध्ये उभी फूट पडली आहे. सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यासोबत हातमिळवणी करून आंदोलनाचा सौदा केला, असा गंभीर आरोप करत मूळ आंदोलनातील प्रमुख कार्यकर्ते मनीष ब्रह्मभट्ट यांनी गुरुवारी (3 सप्टेंबर) 'कॉकरोच जनता पार्टी डेमोक्रेटिक' या नव्या राजकीय पक्षाची अधिकृत घोषणा केली. या बंडामुळे युवा आंदोलनाच्या नावाखाली स्थापन झालेल्या या पक्षात अंतर्गत वाद चव्हाट्यावर आला आहे. अहमदाबादचे रहिवासी असलेले आणि आंदोलनात सुरुवातीपासून सक्रिय राहिलेले मनीष ब्रह्मभट्ट यांनी नवी दिल्लीत पत्रकार परिषद घेऊन अभिजीत दिपके यांच्यावर थेट तोफ डागली. "जंतर-मंतरवरील आंदोलन देशातील सामान्य जनतेच्या आणि विद्यार्थ्यांच्या घामातून उभे राहिले होते. मात्र, आंदोलन यशस्वी होताच ते पूर्णपणे विकले गेले. अभिजीत दिपके यांनी घरी बसून स्वतःच्या मर्जीने १२ लोकांची राष्ट्रीय कोअर टीम तयार केली. यासाठी रस्त्यावर उतरलेल्या कोणत्याही विद्यार्थ्याला, कार्यकर्त्याला विश्वासात घेण्यात आले नाही."

### आवाज उठवणाऱ्या विद्यानंद बापटांवर हल्ला

**पुणे : दैनिक संध्या**

पुण्यातील गणेशोत्सवात डीजेच्या कर्णकर्कश आवाजाला आणि ध्वनिप्रदूषणाला जाहीर विरोध करून राज्यभरात चर्चेत आलेले पर्यावरणप्रेमी विद्यानंद बापट यांना टिळक रस्त्यावरील कशाळे चौकात बेदम मारहाण करण्यात आली आहे. एका वृत्तवाहिनीला मुलाखत देत असताना आणि नागरिकांच्या प्रतिक्रिया जाणून घेत असताना अचानक आलेल्या 4 ते 5 तरुणांनी त्यांच्यावर हल्ला चढवला. या घटनेमुळे पुणे शहरात मोठी खळबळ उडाली असून संताप व्यक्त केला जात आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, विद्यानंद बापट हे टिळक रोडवरील कशाळे चौक परिसरात वृत्तवाहिनीशी संवाद साधत होते. त्याच वेळी स्थानिक गणेश मंडळांशी संबंधित असल्याचे सांगणाऱ्या 4 ते 5 तरुणांचा गट तिथे आला. त्यांनी बापट यांना अडवून त्यांच्याशी वाद घातला आणि काही क्षणांतच त्यांना बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली. अचानक घडलेल्या या हल्ल्यामुळे परिसरातील नागरिक आणि प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी काही काळ अवाक झाले.

### किल्ल्यावरून आईने तीन मुलांसह घेतली उडी

**धाराशिव : दैनिक संध्या**

काही दिवसांपूर्वी छत्रपती संभाजीनगरमधील खवड्या डोंगरावर एकाच कुटुंबातील तिघांचा डोंगरावरून खाली कोसळून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना ताजी असतानाच, आता धाराशिवमधूनही तितकाच धक्कादायक प्रकार समोर आला आहे. धाराशिव जिल्ह्यातील नळदुर्ग किल्ल्यावरून एका आईने आपल्या तीन लहान मुलांसह उडी घेतल्याची माहिती समोर आली आहे. या भीषण घटनेत आई आणि तिच्या एका मुलाचा मृत्यू झाला असून, दोन चिमुकल्या मुली गंभीर जखमी झाल्या आहेत. छत्रपती संभाजीनगरमधील तीसगाव परिसरात असलेल्या खवड्या डोंगरावर काही दिवसांपूर्वी अत्यंत हृदयद्रावक घटना घडली होती. आत्मघाती पाऊल उचलण्याच्या उद्देशाने डोंगरावर गेलेल्या 18 वर्षीय मुलाला वाचवण्यासाठी त्याचे आई-वडील धावले होते.

## सिंधूचे पाणी रोखलं, पाकिस्तानमध्ये हाहाकार

### कोर्टाच्या निर्णयाचा कागद भारताने कचऱ्यात फेकल्याने पाकचा तिळपापड

■ मुंबई (दै. संध्या)




रक्त आणि पाणी एकत्र वाहू शकत नाही, ही भारतीय पंतप्रधानांची घोषणा आता पाकिस्तानसाठी सर्वात मोठा धक्का ठरली आहे. भारताने सिंधू नदीचे पाणी रोखल्यानंतर पाकिस्तानात पाण्यासाठी तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. या परिस्थितीत पाकिस्तान सरकारकडे आता केवळ 'कोर्ट ऑफ आर्बिट्रेशन'च्या निर्णयाचा कागद उरला आहे, ज्याला भारताने आधीच बेकायदेशीर आणि अमान्य घोषित केले आहे. पाकिस्तानच्या सीमापार दहशतवादी कारवायांना उत्तर म्हणून भारताने जेव्हा 1960 चा 'सिंधू पाणी करार' स्थगित केला, तेव्हा शहबाझ शरीफ सरकारची मोठी कोंडी झाली. पाकिस्तानने नेदरलँड्स येथील न्यायालयात भारताची तक्रार केली होती. न्यायालयाने 1960 चा करार लागू ठेवण्याचे आदेश दिले असले तरी, भारताने स्पष्ट केले आहे की भारत या न्यायालयाचे अधिकारक्षेत्र मानत नाही. त्यामुळे हा निकाल भारतासाठी केवळ 'कागदाचा तुकडा' आहे. आंतरराष्ट्रीय न्यायालयात भारताने उपस्थित राहण्यास आणि निकाल मानण्यास नकार दिल्यानंतर पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयाने यावर तीव्र विरोध दर्शवला आहे. 60 वर्षे जुना हा जलवाटप करार कायदेशीररीत्या बंधनकारक असून कोणताही देश एकतर्फी निर्णय घेऊ शकत नाही, असा दावा इस्लामाबादने केला आहे. पाकिस्तानने शांघाय सहकार्य संघटनेच्या व्यासपीठावरही हा मुद्दा उपस्थित केला, मात्र भारताने आपली भूमिका ठाम ठेवली आहे. नवी दिल्लीने सिंधू पाणी करार पूर्णपणे स्थगित ठेवला आहे. पाकिस्तानने जोपर्यंत सीमापार दहशतवाद कायमस्वरूपी आणि पडताळणीयोग्य पद्धतीने थांबवला जात नाही, तोपर्यंत या करारावर पुनर्विचार केला जाणार नाही, अशी भारताची अट आहे. तसेच, हेग येथील स्थायी लवाद न्यायालयाची स्थापना करारातील मूळ नियमांचे उल्लंघन करून झाली आहे, त्यामुळे त्याचे कोणतेही अंतरिम आदेश भारताच्या सार्वभौम धोरणांवर लागू होत नाहीत. पाकिस्तान आंतरराष्ट्रीय मध्यस्थीद्वारे भारतावर दबाव आणण्याचा प्रयत्न करत आहे, परंतु त्याचा फारसा परिणाम झालेला नाही. बिश्केक येथे झालेल्या बैठकीत पाकिस्तानने सिंधू नदीच्या पाण्याचा मुद्दा मांडला, परंतु त्याचा मित्र देश असलेल्या चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांनीही यावर कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही.

## अजितदादांच्या जाण्याचं राजकारण नको : सुनेत्रा पवार

### दादांची आई, मुलं आणि माझ्याएवढं मोठं दु:ख कोणाचं असू शकत नाही

■ पुणे (दै. संध्या)



राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षा आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी अजित पवारांच्या मृत्यूचे राजकारण होऊ नये असं म्हटलं आहे. दादांच्या आई, मुलं आणि माझ्या एवढं मोठं दुःख कुणाचंच असू शकत नाही, असंही सुनेत्रा पवार यांनी म्हटलं. माझा तपास यंत्रणांवर विश्वास आहे. आम्ही देखील दादांच्या अपघाताची चौकशीची मागणी करतो आहोत, फक्त ते मीडियासमोरच केली पाहिजे असं काही नाही असं त्यांनी म्हटलं होतं. खासदार सुप्रिया सुळे यांनी एक वक्तव्य केलं होतं, त्याबाबत विचारलं असता सुनेत्रा पवार यांनी भूमिका मांडली. खरं सांगायचे तर आदरणीय अजितदादा गेल्याने सगळ्या महाराष्ट्राबरोबर, माझ्या कुटुंबात जी पोकळी निर्माण झाली आहे ती माझ्या आणि माझ्या मुलांपेक्षा कोणाला जास्त माहिती असणार मला असं वाटतं दादांच्या या घटनेवर सगळ्यांचा काहीतरी आम्हाला निर्णय कळला पाहिजे. आम्ही देखील त्यादृष्टीनं प्रयत्नच करत आहोत, असं सुनेत्रा पवार म्हणाल्या.

आम्ही आदरणीय पंतप्रधान साहेबांना, आदरणीय गृहमंत्र्यांना भेटून आलो आहे हे आपल्या सर्वांना माहिती आहे. आपल्या आदरणीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अधिवेशनात शब्द दिलेला आहे. तो शब्द ते पाळण्यासाठी कसोशीने प्रयत्न करत आहेत. नक्कीच तपास यंत्रणा सुद्धा आपलं काम करत आहे. माझा तपास यंत्रणांवर, कायदा आणि संविधानानं निर्माण केलेल्या गोष्टींवर विश्वास आहे. मला असं वाटतं की त्यांना आपण वेळ दिला पाहिजे. सतत मीडियामध्ये येणं म्हणजे अपडेट मिळणं असं नाही, असं सुनेत्रा पवार यांनी स्पष्ट केलं. मला असं वाटतं की वारंवार अशा गोष्टी करुन मीडिया ट्रायल होते की काय असं वाटतं. खरंतर आपल्या सर्वांनी विचार केला पाहिजे. दादांची आई, दादांची मुलं आणि मी याच्यापेक्षा त्याचं दुःख कोणाला होणार आहे. त्याच्यामुळं त्यांच्या सगळ्या गोष्टींची लवकरात लवकर चौकशी व्हावी हे आम्हाला देखील वाटतं, आम्ही तसे प्रयत्न करत आहोत. त्यामुळं असं समजण्याचं कारण नाही की आम्हाला काही होत नाही किवा काही नाही. मला एवढंच वाटतं की आपण तपास यंत्रणेला वेळ दिला पाहिजे. त्यांच्यावर माझा विश्वास आहे, असं सुनेत्रा पवार यांनी म्हटलं. तुम्हाला माहिती आहे की अशा प्रकारच्या गोष्टी परत परत मीडियामध्ये होतात. दादांच्या जाण्याचं अशा प्रकारचं राजकारण कोणीच करु नये असं मला वाटतं, सुनेत्रा पवार म्हणाल्या.

अमित ठाकरेंनी फोटो हटवल्यानं तुम्ही एफआयआर केला, माझा भाऊ गमावला, सरकारमध्ये माझा भाऊ त्यांच्या सरकारमध्ये उपमुख्यमंत्री होते, त्यांचा एवढा मोठा अपघात होता, त्यांचा मृत्यू झाला, त्याचा आजपर्यंत एफआयआर झाला का? अजित पवार त्यांच्याच सरकारमध्ये होते, त्यांचं सरकार आहे, अजित पवार यांचे 40 आमदार आजही त्यांच्याच सरकारमध्ये आहेत. मी माझ्या भावासाठी न्याय मागत आहे. अमित ठाकरेंवर केस होत असेल तर माझ्या भावाला न्याय कधी मिळणार असा सवाल सुप्रिया सुळे यांनी विचारला होता.

# राज्यातील पायाभूत सुविधांच्या विकासावर भर

### *मुंबईत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी एका तासात पोहोचता येईल असं नियोजन करत आहोत; एकनाथ शिंदेंची मोठी माहिती*

■ मुंबई (दै. संध्या)



राज्यात पायाभूत सुविधांच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणावर काम सुरू आहे. मुंबईतही काँक्रिटच्या रस्त्यांचे जाळे विणले जात असून एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी एका तासात कसे पोहोचता येईल याचं नियोजन आम्ही करत आहोत, अशी माहिती राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

समृद्धी महामार्ग हा महाराष्ट्राच्या विकासाला वेग देणारा गेमचेंजर प्रकल्प ठरला आहे. 701 किमी लांबीच्या या महामार्गामुळे नागपूर ते मुंबई प्रवासाचा वेळ मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे. या प्रकल्पासाठी जमीन अधिग्रहण करताना शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा करण्याच्या प्रक्रियेबाबत एकनाथ शिंदे यांनी मोठी माहिती दिली. समृद्धीसाठी जमीन हस्तांतरित झाल्यानंतर अवघ्या दोन तासांत शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा करण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं.

समृद्धी महामार्गासह महाराष्ट्रातील पायाभूत सुविधांवर बोलताना शिंदे यांनी या प्रकल्पाला सुरुवातीला विरोध आणि अनेक आव्हानांचा सामना करावा लागल्याचं सांगितलं. मात्र लोकांचा विश्वास संपादन करून प्रकल्प पूर्ण करण्यात आला. आता समृद्धी महामार्गाच्या दोन्ही बाजूंना मल्टीनॅशनल कंपन्या येत असून त्यामुळे रोजगार, उद्योग आणि विकासाला चालना मिळत असल्याचा दावा त्यांनी केला. समृद्धी महामार्गासाठी जमीन देण्याबाबत शेतकऱ्यांमध्ये सुरुवातीला काही प्रमाणात नाराजी आणि अविश्वासाचं वातावरण होतं. यापूर्वीचे अनुभव चांगले नसल्याने जमीन हस्तांतरणाबाबत आव्हान होतं. मात्र जमीन हस्तांतरित झाल्यानंतर दोन तासांत पैसे खात्यात जमा होतील, असं आपण शेतकऱ्यांना सांगितलं आणि त्यासाठी स्वतः साक्षीदार राहिलो, असं एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. 701 किमीचा समृद्धी महामार्ग हा महाराष्ट्रातील महत्त्वाच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांपैकी एक आहे. नागपूरहून सकाळी निघालेला शेतकरी संध्याकाळपर्यंत मुंबईत पोहोचू शकतो, असं सांगत शिंदे यांनी या महामार्गामुळे प्रवासासोबतच आर्थिक विकासालाही वेग मिळाल्याचं स्पष्ट केलं. महामार्गाच्या दोन्ही बाजूंना उद्योग आणि मल्टीनॅशनल कंपन्यांची गुंतवणूक वाढत असल्याचंही त्यांनी सांगितलं.

शक्तिपीठ महामार्गाला कोल्हापूर आणि सांगली परिसरात होत असलेल्या विरोधावरही एकनाथ शिंदे यांनी भाष्य केलं. समृद्धी महामार्गालाही सुरुवातीच्या काळात विरोध झाला होता, मात्र तो प्रकल्प मार्गी लागला, असं त्यांनी सांगितलं. मात्र शक्तिपीठ महामार्ग कोणत्याही परिस्थितीत लोकांवर रेटून नेला जाणार नाही. लोकांची संमती घेऊनच पुढे जाण्याची भूमिका सरकारची असल्याचं शिंदे यांनी स्पष्ट केलं. शक्तिपीठ महामार्गामुळे विकासाला चालना मिळू शकते आणि राज्याच्या अर्थव्यवस्थेत मोठा बदल घडू शकतो, असा दावा शिंदे यांनी केला. मुंबई आणि MMR रिजनमधील वाहतुकीच्या समस्या सोडवण्यासाठी सरकारकडून सर्वतोपरी प्रयत्न सुरू असल्याचं एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. वाढती लोकसंख्या, वाहनांची संख्या आणि शहरीकरणामुळे MMR परिसरातील वाहतुकीवर मोठा ताण निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर पायाभूत सुविधा आणि वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यावर भर दिला जात असल्याचं त्यांनी सांगितलं.

समृद्धी महामार्गावर प्रवाशांची सुरक्षितता हे सरकारचं प्रमुख ध्येय असल्याचं शिंदे यांनी सांगितलं. महामार्गावर लूटमार किंवा इतर गुन्हेगारी घटना रोखण्यासाठी टास्क फोर्सची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे प्रवाशांना सुरक्षित प्रवास मिळावा यासाठी सुरक्षा यंत्रणा अधिक मजबूत करण्यावर भर दिला जात असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

## महाप्रसाद, लंगर, आता रडारवर

■ मुंबई (दै. संध्या)

सण-उत्सवांच्या काळात भाविक आणि नागरिकांना मिळणारा महाप्रसाद, लंगर अथवा भंडाऱ्यांमधील अन्नाची गुणवत्ता आता अन्न आणि औषध प्रशासनाच्या थेट रडारवर असणार आहे. अन्न आणि औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सण-उत्सवांच्या काळात होणारी अन्नातील भेसळ रोखण्यासाठी ‘स्टँडिंग ऑर्डर्स फॉर ऑल फेस्टिव्हल्स’ हा ऐतिहासिक आणि धर्मनिरपेक्ष निर्णय जाहीर केला आहे. या नियमानुसार, महाप्रसादाच्या ठिकाणांची प्रत्यक्ष तपासणी केली जाईल. भारताच्या इतिहासात सर्व धर्मीयांच्या सणांसाठी वर्षभराचा असा स्थायी आदेश काढण्याची ही पहिलीच वेळ आहे. सणांच्या काळात मिठाई, खवा, पनीर, तूप, सुकामेवा आणि मटण-चिकनची मागणी अनेक पटींनी वाढते; त्यामुळे भेसळीची शक्यताही दाट असते. हे रोखण्यासाठी एफडीएने वर्षभराचे कॅलेंडर तयार केले असून सर्व सणांचे तीन स्तरांत वर्गीकरण केले आहे. प्रथम श्रेणी (राज्यव्यापी): गणेशोत्सव, नवरात्र, दिवाळी, ईद, नाताळ (ख्रिसमस) आणि नववर्ष पूर्वसंध्या. द्वितीय श्रेणी (प्रादेशिक): मकर संक्रांती, महाशिवरात्र, होळी, गुढीपाडवा, आषाढी व कार्तिक वारी, श्रावण मास, जन्माष्टमी, दहीहंडी, कोजागिरी आणि गुरुनानक जयंती. तृतीय श्रेणी (स्थानिक): स्थानिक जत्रा, पालखी सोहळे आणि उरुस. कारवाईची प्रक्रिया ही सणाच्या 21 दिवस आधी सुरू होऊन सण संपल्यानंतर 30 दिवसांपर्यंत सुरू राहील. ही मोहीम एकूण चार टप्प्यांत राबवली जाईल.

# संपादकीय

## बदलत्या समाजाला संवेदनशीलतेची गरज

आजचा काळ वेगाचा आहे. तंत्रज्ञानाने जग जवळ आणले, संवादाची साधने हातात आली आणि माहितीचा महासागर प्रत्येकाच्या बोटांवर उपलब्ध झाला. मात्र या प्रगतीसोबत माणूस माणसापासून दूर जात असल्याचे चित्रही अनेकदा दिसते. सुविधा वाढल्या, पण संवेदनशीलता कमी होत चालली तर ही प्रगती नेमकी कोणासाठी आणि कशासाठी, हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे.

समाजात घडणाऱ्या अनेक घटना आपल्याला अस्वस्थ करतात. अन्याय, अत्याचार, फसवणूक, भ्रष्टाचार, सामाजिक विषमता, पर्यावरणाचा ऱ्हास अशा अनेक प्रश्नांवर आपण चर्चा करतो. सोशल मीडियावर प्रतिक्रिया देतो. एखाद्या घटनेवर संताप व्यक्त करतो आणि काही तासांत दुसऱ्या विषयाकडे वळतो. परंतु समाज बदलण्यासाठी केवळ प्रतिक्रिया पुरेशी नसते; त्यासाठी सातत्यपूर्ण कृतीची गरज असते. आजच्या पिढीसमोर संधींची कमतरता नाही. शिक्षण, रोजगार, व्यवसाय, तंत्रज्ञान आणि जगभरातील ज्ञानाची दारे खुली आहेत. मात्र या संधींचा उपयोग केवळ स्वतःच्या प्रगतीसाठी न करता समाजाच्या उन्नतीसाठी कसा करता येईल, याचा विचार होणे आवश्यक आहे. कारण व्यक्तीची प्रगती आणि समाजाची प्रगती या एकमेकांपासून वेगळ्या नाहीत. विशेषतः तरुण पिढीने सामाजिक प्रश्नांकडे केवळ प्रेक्षक म्हणून न पाहता सहभागी नागरिक म्हणून पाहणे गरजेचे आहे. मतदान करणे, कायद्याचा आदर करणे, सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करणे, पर्यावरणाची काळजी घेणे, गरजू व्यक्तीला मदत करणे, चुकीच्या गोष्टींविरोधात आवाज उठवणे आणि आपल्या परिसरातील प्रश्न सोडवण्यासाठी पुढाकार घेणे, हीदेखील राष्ट्रनिर्मितीचीच कामे आहेत. आज समाजासमोर आणखी एक मोठे आव्हान आहे ते म्हणजे वाढती असहिष्णुता. मतभेद असणे स्वाभाविक आहे; पण मतभेदांचे रूपांतर वैरात होणे धोकादायक आहे. लोकशाही ही केवळ निवडणुकांची व्यवस्था नाही. वेगवेगळ्या मतांचा आदर करण्याची संस्कृती म्हणजे लोकशाहीची खरी ताकद. आपण आपल्या विचारांवर ठाम राहू शकतो; पण त्याच वेळी समोरच्या व्यक्तीला त्याचे मत मांडण्याचा अधिकार आहे, हेही स्वीकारले पाहिजे. माध्यमांची भूमिकाही या काळात अत्यंत महत्त्वाची आहे. बातमी ही केवळ माहिती देणारी नसून समाजाला दिशा देणारी शक्ती आहे. त्यामुळे बातमी देताना तथ्य, जबाबदारी आणि सामाजिक भान या तीन गोष्टी महत्त्वाच्या ठरतात. अफवा, अपुरी माहिती किंवा सनसनाटीपणाला प्राधान्य देण्यापेक्षा सत्य परिस्थिती लोकांसमोर मांडणे ही पत्रकारितेची खरी ताकद आहे. प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यावरही मोठी जबाबदारी आहे. नागरिकांच्या समस्या ऐकून घेणे, त्यावर वेळेत कार्यवाही करणे आणि प्रशासनात पारदर्शकता ठेवणे आवश्यक आहे. विकासकामांचे उद्घाटन आणि घोषणा महत्त्वाच्या असल्या तरी त्यापेक्षा महत्त्वाचे म्हणजे त्या योजनांचा प्रत्यक्ष लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचतो का, हे पाहणे. शहरांचा विकास होत असताना पायाभूत सुविधांबरोबरच माणसांच्या जीवनमानाचा विचार झाला पाहिजे. रस्ते, पूल, इमारती आणि मेट्रो आवश्यक आहेत; पण त्याचबरोबर स्वच्छ हवा, सुरक्षित रस्ते, दर्जेदार शिक्षण, चांगली आरोग्यसेवा, सार्वजनिक उद्याने आणि सर्वसामान्यांसाठी सन्मानाने जगण्याची व्यवस्था हीदेखील विकासाचीच मोजपट्टी आहे. आज आपण एका संक्रमणाच्या टप्प्यावर आहोत. जुन्या मूल्यांना आधुनिकतेची जोड देण्याची गरज आहे. विज्ञान स्वीकारताना विवेक गमावता कामा नये आणि परंपरा जपत असताना अंधश्रद्धेला प्रोत्साहन देता कामा नये. आधुनिकतेचा अर्थ केवळ आधुनिक साधने वापरणे नसून आधुनिक विचार स्वीकारणे हा आहे. समाज बदलण्याची जबाबदारी केवळ सरकारची किंवा एखाद्या संस्थेची नाही. ती प्रत्येक नागरिकाची आहे. आपल्या घरापासून, आपल्या रस्त्यापासून, आपल्या परिसरापासून आणि आपल्या वागणुकीपासून बदलाची सुरुवात होऊ शकते.

## संस्कृत सुभाषित

'मना चंदनापरि त्वा भिजावे । परी अंतरी सज्जना नीववावे ।।

अर्थ : असा समर्थ रामदास, चंदनाप्रमाणे भिजण्याचा जो संदेश देतात, तो स्वत: भिजून समाजाला सुगंध व शांती देण्याचा संदेश म्हणजे हा 'छायामन्यस्य कुर्वती हाच गुण होय.

## उपदेशकथा

### स्वावलंबन

एका चंडोल पक्ष्याने एका भरलेल्या शेतात आपले घरटे केले. कोवळी कोवळी कणसे खायला घालून तिने आपल्या पिलांना वाढविलं. त्यांच्या डोक्यावर तुरे फ ुटून ती उडण्याइतकी झाली. एक दिवस शेताचा मालक पीक पाहण्याकरिता आला. पीक तयार झालेले पाहून तो म्हणाला, आता कापणीची वेळ झालेली दिसते तेव्हा आता कापणीकरिता आपल्या सर्व मित्र मंडळींना बोलविले पाहिजे. संध्याकाळी हे बोलणे चंडोल पिलाने आपल्या बापाला सांगितले आणि तो म्हणाला, बाबा, आता आपल्याला नवं घर शोधायला पाहिजे. इथून हललं पाहिजे.

इतक्यात जाण्याची जरुरी नाही. बाप म्हणाला, आणखी काही दिवसांनी मालक पुन्हा शेतावर आला. सूर्याच्या उन्हाने वाळून धान्याची कणसे जमिनीवर पडायच्या बेतात आली होती. ते पाहून तो म्हणाला, उद्या मजूर आणि कामगार बोलावून कणसाची कापणी करून टाकली पाहिजे. ती बातमी ऐकल्यावर चांडोल आपल्या मुलांना म्हणाला, मित्रावर अवलंबून राहण्याऐवजी तो आता स्वत: काम करणार. आता मात्र इथे थांबून चालणार नाही. दुसरी जागा शोधली पाहिजे.

कथा उपदेश : स्वावलंबन केव्हाही चांगले. जो दुसऱ्यावर अवलंबला, तो थांबला.

## गुरु वचन

### ज्येष्ठांच्या अनुभवाला कमी लेखू नका

एका शेठजीकडे अपार संपत्ती होती. एकेदिवशी त्याच्या मनात विचार आला की, एक भव्य शिव मंदिर बांधावे. सहा महिन्यात मंदिर बांधून तयार झाले. मंदिर उभारणीसाठी लागलेल्या खर्चाशिवाय जो पैसा शेठजीकडे उरला होता तो त्यांनी मंदिराच्या घुमटात भरून ठेवला. याचा उल्लेख त्यांनी आपल्या वहीखात्यातही केला. नंतर ते तीर्थयात्रेला निघाले. मात्र वाटेतच त्यांचे निधन झाले. शेठजीचे चार मुले होती आणि चारही जण व्यापारी होते. शेठजीच्या मृत्युनंतर काही दिवसांनी त्यांच्या व्यापारात तोटा झाला. त्यामुळे त्यांना पैशाची आवश्यकता भासू लागली. तेव्हा त्यांनी आपल्या वडिलांची जुनी वहीखाते शोधण्यास सुरूवात केली. त्यापैकी एकात मंदिराच्या घुमटात धन ठेवल्याचा उल्लेख होता.

त्यात असेही लिहिले होते की, धन चैत्र शुक्ल नवमीच्या दिवशी घुमटात भरले होते. चार जणांनी घुमट तोडले. मात्र त्यांना धन मिळाले नाही. तेव्हा त्यांना आपल्या वडिलांचे घनिष्ठ मित्र असलेल्या एका ज्येष्ठ व्यक्तीला गाठले आणि घडलेला प्रकार सांगितला. त्या व्यक्तीने त्यांना चैत्र शुक्ल नवमीच्या दिवशी बारा वाजता येण्यास सांगितले. ठरलेल्या दिवशी व वेळी त्या व्यक्तीने त्या ठिकाणी खोदण्यास सुरूवात केली जिथे घुमटाची सावली पडली होती.

घुमटाची सावली चैत्र शुक्ल नवमीच्या दिवशी दुपारी बारा वाजता धन भरले होते आणि त्याच महिन्यात, दिवशी आणि वेळी घुमटाची सावली पडणाऱ्या ठिकाणी खोदकाम करण्यात आल्यावर धन सापडले. चौघा भावांनी ज्येष्ठ व्यक्तीचे आभार मानले आणि त्या धनातून आपला व्यापार पुन्हा सुरू केला. यावरून ज्येष्ठांच्या ठिकाणी असलेल्या अनुभवाला कमी लेखू नये, हेच ही कथा सांगते.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | २४:१३:५०+ |
| ४ सप्टेंबर २०२६ | नक्षत्र:रोहिणी २३:०३:५६ |
| शुक्रवार | योग:हर्षण १५:४३:१८ |
| विक्रम संवत्- २०८२ | करण:बालव १३:२०:५८ |
| आषाढ शके | करण:कौलव |
| संवत्- १९४८ | २४:१३:५०+ |
| संवत्सर -पराभवनाम | सूर्य:सिंह |
| अयन- दक्षिणयन | चन्द्र:वृषभ |
| मास- आषाढ | हिजरी सन् - १४४८ |
| ऋतु- सौर शरद | मुस्लिम मास - रबिलावल |
| कृष्ण पक्ष | तारीख - २१ |
| तिथि:अष्टमी | |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०५९

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | | | | | 5 | 7 | | 1 |
| 6 | | 7 | 9 | | | | 5 | |
| | | | | | | 2 | | 6 |
| 4 | 7 | | 6 | 5 | 9 | | | 3 |
| | | | 1 | | 2 | | | |
| 5 | | | 4 | 8 | 7 | | 1 | 9 |
| 3 | | 8 | | | | | | |
| | 6 | | | | 3 | 9 | | 5 |
| 9 | | 2 | 5 | | | | | 7 |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. १०५८ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 9 | 2 | 4 | 6 | 8 | 5 | 7 | 3 |
| 5 | 4 | 8 | 2 | 3 | 7 | 6 | 9 | 1 |
| 6 | 7 | 3 | 9 | 5 | 1 | 2 | 8 | 4 |
| 2 | 6 | 7 | 8 | 1 | 9 | 3 | 4 | 5 |
| 4 | 8 | 5 | 6 | 2 | 3 | 9 | 1 | 7 |
| 9 | 3 | 1 | 7 | 4 | 5 | 8 | 6 | 2 |
| 3 | 5 | 6 | 1 | 9 | 4 | 7 | 2 | 8 |
| 7 | 2 | 4 | 5 | 8 | 6 | 1 | 3 | 9 |
| 8 | 1 | 9 | 3 | 7 | 2 | 4 | 5 | 6 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९०९ – लॉर्ड बेडन पॉवेल यांनी सुरू केलेल्या बालवीर चळवळीचा पहिला मेळावा भरविला गेला.
- २००२ – योहानेसबर्ग येथील वसुंधरा परिषद अक्षय विकासया घोषणेने संपली.

### राष्ट्रीय

- १६५६ – शिवाजी महाराजांनी किल्ल्यांची जुनी नावे बदलून मराठी वळणाची नवीन नावे दिली.
- १६६५ – शिवाजी महाराज व मुघल स्राट यांच्यामध्ये पुरंदरचा प्रसिद्ध तह झाला.
- १७८९ – मराठेशाहीतील मुत्सद्दी सरदार महादजी शिंदे यांनी भारतमध्ये गोवध–बंदीचे फर्मान बादशहाकडून मिळविले.
- २००८ – काँग्रेसच्या व्ही. वैद्यलिंगम यांनी पुडुचेरीचे नवे मुख्यमंत्री म्हणून शपत घेतली.

### जन्म

- १८२५ – दादाभाई नौरोजी, काँग्रेसचे अध्यक्ष व भारताचे पितामह म्हणून ओळखले जाणारे.
- १८९५ – सियाराम शरण गुप्त, हिंदी कादंबरीकार.
- २००७ – भारताने पहिल्या दक्षिण अशियाई जलतरण आणि वाटर पोलो चॅम्पीयनशीपच्या सुरुवातीच्या दिवशी चार सुवर्णपदक मिळविले.

### निधन

- १९६५ – अल्बर्ट श्वाईटूझर, शांतता नोबेल पारितोषिक विजेता, समाजसेवक.
- १९६७ – 'समतानंद' अनंत हरी गद्रे.
- १९९७ – धर्मवीर भारती, हिंदी साहित्यिक.
- १९९९ – मुक्री, हिंदी चित्रपटसृष्टीतील विनोदी अभिनेता.
- २००६ – सत्येंद्र नारायण सिन्हा, बिहारचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते.

## : SMS :

Doctor: Tumhe kya problem hai?
Patient: Sab mujhe bhul jaate hai.
Doctor: Aap kaun ho bhai?

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३०.७ | २३.४ |
| अहमदनगर | ३१ | २२.५ |
| अकोला | ३१.४ | २५.५ |
| अमरावती | २६.९ | २५.२ |
| बीड | ३५.५ | २६.७ |
| भंडारा | २७.५ | २४.४ |
| बुलढाणा | ३९.२ | २६.७ |
| चंद्रपूर | ३४.९ | २६.७ |
| चेन्नई | ४१.३ | ३१ |
| नवी दिल्ली | ३९.३ | ३१.४ |
| धुळे | ३५.२ | २४.८ |
| गोंदिया | २६.८ | २४.७ |
| जळगाव | ३० | २५ |
| कोल्हापूर | २६.८ | २२.६ |
| लातूर | ३१.९ | २३.४ |
| मुंबई | ३२.८ | २७.६ |
| नागपूर | २९.४ | २४.५ |
| नांदेड | ३३.१ | २४.२ |
| नंदूरबार | ३० | २४.३ |
| नाशिक | २९.१ | २३.४ |
| पुणे | २६.१ | २२.३ |
| पंढरपूर | ३२.८ | २३.४ |
| सातारा | २९ | २१.६ |
| सांगली | ३१.१ | २२.८ |
| सोलापूर | ३३.९ | २४.१ |
| वर्धा | ३१.२ | २५.१ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : पूर्व कौटूंबिक असहकार्यामुळे मन नाराज होऊ शकते. व्यापारात अडचणी येतील.

**तूळ :** शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : पूर्व सामान्य कामासाठी दिवस चांगला राहण्याची शक्यता आहे.

**वृषभ :** शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : उत्तर नवीन व्यापारात प्रगती होण्याचे संकेत मिळतील. मोठया तसेच प्रतिष्ठित लोकांशी संबध वाढतील.

**वृश्चिक :** शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : उत्तर सामान्य गोष्टींवर सुद्धा परिणामांवर ध्यान ठेवा. कामात अडचणी येऊ शकतात. व्यापार मध्यम राहील.

**मिथून :** शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : पूर्व व्यापारीक स्पर्धेत विजयी होण्याचे योग आहे. घरासंबंधात समस्या राहू शकते.

**धनू :** शुभ रंग : निळा, अनुकूल दिशा : उत्तर व्यापारिक वाद संपुष्टात येतील. कुटूंबात आनंदाचे वातारण येईल. साहस, पराक्रमाचा फायदा होईल.

**कर्क :** शुभ रंग : निळा, अनुकूल दिशा : उत्तर आत्मविश्वास वाढीस लागल्याने अवघड समस्याही सहज पूर्ण होतील.

**मकर :** शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : पूर्व आर्थिक योजनांवर चर्चा होईल. स्थायी मालमत्तेची खरेदी–विक्री संभव आहे.


**सिंह :** शुभ रंग : पिवळा, अनुकूल दिशा : पूर्व नोकरीत आपले महत्व तसेच प्रभाव वाढेल. वास्तविकतेला महत्व देणे गरजेचे आहे.

**कुंभ :** शुभ रंग : पिवळा, अनुकूल दिशा : पूर्व एखादे राहिलेले काम पूर्ण झाल्याने आनंद होईल. नोकरीत सहकाऱ्यांकडून मदत मिळेल.

**कन्या :** शुभ रंग : पांढरा, अनुकूल दिशा : पूर्व आर्थिक परिस्थितीत प्रयत्नांनी सुधारणा होऊ शकेल. सहचरणी सोबत वाद घालू नका.

**मीन :** शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : पूर्व व्यापार चांगला चालेल. भौतिक सुख–साधनांची आवड निर्माण होईल. अनावश्यक राग करु नका.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०५९



### आडवे शब्द

१. ब्रिटेशांना भारतात शिरकावासाठी मिळालेले निमित्त
५. ठाकरेंचा बंगला
७. दृष्टिभेट
११. गुजराथी नृत्य
१२. तरुण, १३. जागृत
१४. पत्राची सुरुवात
१५. सहाय्य
१७. ही केल्यास तळे चाखण्याचा अधिकार असतो?
१९. माराची खूण
२०. अफवा
२१. बदाम, पिस्ते इ.
२३. पेरणी
२४. 'ने मजसी ने' काव्य लिहिणारे स्वातंत्र्यवीर
२६. एकरूप
२९. पुष्कळ
३०. माघारी पाठविणे
३१. सूर्याचे एक नाव
३२. गप्पाष्टकांची जागा!
३३. जाडसर पीठ
३४. बैठे लाकडी आसन
३५. फळातील द्रव
३६. नावाचा जयघोष
३९. कणीदार
४०. स्वयंपाकी
४१. आवाजाचा गोंधळ
४२. वेदना
४४. कीव (हिंदी)
४६. शरीर
४७. ब्राह्मण
४८. शक्ती, बळ
५०. नेहमी
५१. श्रीमंत
५४. औरंगाबादजवळची प्रसिद्ध लेणी
५५. वक्राकार
५८. अस्वलांना खेळविणारा
६१. तात्यपर्य, गोषवारा
६२. मुलगा
६३. कावळा
६५. खाणाखुणांवरून शोध
६७. पवित्र
६८. एक मंगलवाद्य
६९. अनुमती
७०. नृत्य
७१. चैतन्यरूप– --कार
७२. अतिशय दुष्ट
७३. काठेवाडी मनुष्य
७४. पाहुणचार, आगतस्वागत
७६. मरेपर्यंत
७७. दणकट, मजबूत
७८. कुचेष्टा

### उभे शब्द

२.पोथीचे सकाम वाचन
३. जीभ
४. तंबी, दम
६. महाशय
७. सोंग वठवणारा
८. सम्राट
९. फुगलेल्या पोटाला या चर्मवाद्याची उपमा दिली जाते
१०. सुरक्षा
१४. मावशीचा मुलगा
१६. श्रीविष्णुचे अवतार
१८. बातमी
२०. शेतजमीन, जा–ये
२१. वाळणे
२२. गाईचे पिल्लू
२३. फायदेशीर
२४. तात्पर्य
२५. रविवासर
२७. चाळीस शेर
२८. अगदी सारखे
३०. आत्म्याचा दुसऱ्याच्या शरीरात कथिर शिरकाव
३१. शर्त
३२. चरण
३४. ठेवलेली नजर
३५. पाताळ, नरक
३६. जहाज, होडी इ.
३७. पाणी
३८. रममाण
४०. संसद सदस्य
४३. पाश्चात्त्यांसाठी सणासुदीचा काळ
४५. रसाळ
४९. हल्ल्यासाठी लपून बसणे– -- धरणे
५१. भीती, धास्ती
५२. भांडण
५३. मवाळ धोरण
५६. नवलाची कामगिरी
५७. पांढरपेशा
५९. गती
६०. कामदेवाचे शस्त्र
६२. छोटे कुबड
६४. व्यायाम
६६. अश्रूंची चव
६७. खुंटी, मेख
६९. पुन्हा
७०. खूळ, छंद
७१. किंकाळी
७३. नव्या जमान्यातील धान्य, याचे पीठ दूध इ. वापरतात
७४. अजगर
७५. काचेची वाटी

### जम्बो शब्दकोडे क्र. १०५८ चे उत्तर

आडवे उत्तर १.नागपूर ४.अंतर्गत ७.पारावार ११.राम १२.बरोबर १३.रुपाया १५.टणत्कार १६.जनावर १८.रतन १९.पाप २०.गळ २१.हकनाक २४.साम २६.सतत २८.चकमक ३०. मानमरातब ३२.बखेडा ३४.लाट ३५.वाटी ३६.नव ३७.बळकट ३९.कापड ४०.सुमन ४३.डीर ४४.वसा ४६.माग ४७.चिळकांडी ४८.वातड ४९.वडील ५०.नरक ५१अ.तड ५२.दुस्साहस ५४.बाबा ५५.वादावादी ५९.कपाट ६१.कारक ६३.मंद ६४.अवस ६६.विपरीत ६९.पलंग ७२.वासा ७३.कथाकथन ७६.कालवाकालव ७८.पाळी ७९.यम ८१.टप ८३.रसद ८४.भानगड ८५.आरसा

उभे उत्तर : १.नाराज २.गमनागमन ३.रबर ४.अंबर ५.तरतरीत ६.तरू ७.पाया ८.वाटप ९.रण १०.सरतेशेवटी १४.पालक १७.बळ १९.पाककला २२.नाच २३.रंक २४. सामान सुमान २५.भराव २६.सबब २७.तबकडी २९.मटका ३१. मनन ३३.खेटर ३५.वाडवडील ३८.कुर्यात सदा मंगलाम् ४१.मगर ४२.तळतळाट ४५.साल ४७.माया ४७अ. कांड ४८.वानवा ५१.कथेकरी ५२.दुबार ५३.वादी ५४.बाका ५६.वाद ५७.रास ५८.रविवासर ६०.पातक ६२.कप ६५.वटवट ६७.पसा ६८.पाकळी ७०.लंका ७१.बकासूर ७४.थापाड्या ७५.नयन ७७.मोद ८०.मग ८२.पल्ला

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

# आधुनिक कौशल्याशिवाय आयटी क्षेत्रामध्ये टिकता येणार नाही

## डॉ. दीपक शिकारपूर : 'कर्तुत्वाच्या संधी खेचुन आणण्यासाठी, संवैधानिक लोकशाही टिकवण्याचे काम जागरूक तरुणाई करेल - काँग्रेस नेते गोपाळदादा तिवारी

■ पुणे (दै. संध्या)

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये तरुणांसाठी मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध आहेत तसेच या क्षेत्रामध्ये स्टार्टअप म्हणजेच स्वतःचा बिझनेस सुरू करणाऱ्यांसाठीही भविष्य उज्वल आहे, परंतु त्यासाठी तुम्हाला सतत आधुनिक कौशल्य आणि तंत्रज्ञान शिकणे गरजेचे आहे. जुनं ते सोनं ही विचारसरणी या क्षेत्रामध्ये चालत नाही. नव ते हवं ही आता मानसिकता झाली आहे . हे ओळखून आधुनिक कौशल्य प्रत्येक तरुणाने आत्मसात केले पाहिजे. आधुनिक कौशल्याशिवाय माहिती तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये टिकता येणार नाही अशी भावना ज्येष्ठ संगणक तज्ञ डॉ. दीपक शिकारपूर यांनी व्यक्त केली. एन एम डी




इन्फोटेक सर्व्हिसेस या कंपनीच्या नवव्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. दीपक शिकारपूर बोलत होते. कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी नवनाथ दरेकर, आमदार सत्यजित तांबे ,श्रॉफ ग्रुप ऑफ कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक जे पी श्रॉफ, काँग्रेसचे प्रदेश प्रवक्ते गोपाळदादा तिवारी, राष्ट्रवादी काँग्रेसच्या रुपाली ठोंबरे पाटील, अभिनेत्री ऋता दुर्गुळे, रितिका श्रोत्री आदि यावेळी उपस्थित होते. डॉ. दीपक शिकारपूर म्हणाले, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील डाटा सायन्स, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, मशीन लर्निंग यांसारखे तंत्रज्ञान शिकले तर या क्षेत्रामध्ये सध्या निभाव लागू शकतो. अन्यथा तुम्ही काळाच्या ओघांमध्ये मागे पडू शकता हे लक्षात घेऊनच नवनाथ दरेकर यांनी एन एम डी इन्फोटेकच्या माध्यमातून तरुणांना आधुनिक तंत्रज्ञान आणि शिक्षण देत आहेत ही काळाची गरज आहे.

आमदार सत्यजित तांबे म्हणाले, महाविद्यालयीन काळामध्ये मी माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात संदर्भात उद्योग सुरू केला आणि आजही मी या क्षेत्रामध्ये आहे त्यामुळे माहिती तंत्रज्ञान क्षेत्राच्या गरजा मला माहिती आहे. माहिती कार्पोरेट आणि शिक्षण यामधील दरी भरून काढण्याचे काम एन एम डी संस्था करत आहे. संस्थेच्या माध्यमातून रोजगारक्षम तरुण निर्माण करणे , स्टार्ट अप च्या माध्यमातून उद्योजक निर्माण करण्यासाठी ही संस्था महत्वपूर्ण योगदान देत आहे.

काँग्रेस नेते गोपाळदादा तिवारी म्हणाले, भारताची लोकशाही मजबूत रहाण्यासाठी तरुणांनी व विद्यार्थ्यांनी जागरूक राहिले पाहिजे. तरुण जर आपल्या हक्क आणि संधी संदर्भात जागरूक असतील तर त्यांच्या प्रगतीमध्ये कोणताही अडथळा येणार नाही. छोट्या खेडेगावातून पुण्यासारख्या शहरा मध्ये येऊन उद्योग व आयटी क्षेत्रात स्वतःची ओळख निर्माण करण्याचे व तरूणाईमध्ये आत्मविश्वास निर्माण करत त्यांना आत्मनिर्भर करण्याचे काम 'नवनाथ मोहन दरेकर' अर्थात एनएमडी यांनी केले आहे त्यांचा आदर्श आजच्या तरुणांनी घेतला पाहिजे. जे पी श्रॉफ म्हणाले, सायबर सिक्युरिटी आणि आर्टिफिशल इंटेलिजन्स या क्षेत्रामध्ये तरुणांना संधी देण्याची महत्त्वपूर्ण काम नवनाथ दरेकर हे आपल्या कंपनीच्या माध्यमातून करत आहे. ध्येय ,ध्यास आणि ध्यान या त्रीसुत्री चा संगम नवनाथ दरेकर आणि त्यांच्या कंपनीमध्ये दिसतो त्यामुळे त्यांचे आणि त्यांच्या कंपनीचे भविष्य उज्वल आहे. नवनाथ दरेकर म्हणाले, एन एम डी इन्फोटेक सर्व्हिसेस च्या माध्यमातून दहा हजार विद्यार्थ्यांना माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील आम्ही शिक्षण दिले आहे तसेच 5000 विद्यार्थ्यांना या क्षेत्रामध्ये नोकरी आणि स्टार्टअप सुरू करण्यासाठी आम्ही संधी देऊ शकलो. यामुळे त्या विद्यार्थ्यांच्या पालकांना समाधान वाटते हेच आमचे यश आहे. भविष्यामध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्स मशीन लर्निंग आणि डाटा सायन्सच्या माध्यमातून समाजासाठी कंपनी काय योगदान देऊ शकेल यावर लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे.

ऋता दुर्गुळे म्हणाल्या, नवनाथ दरेकर यांनी एन एम डी इन्फोटेक सर्व्हिसेस च्या माध्यमातून नवोदित तरुणांना उद्योजक आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये संधी देत आहेत ही निश्चितच कौतुकास्पद बाब आहे. नवनाथ दरेकर हे केवळ उद्योजक नाही तर कंपनीच्या माध्यमातून नवीन उद्योजक घडवून ते देशाच्या आर्थिक विकासामध्ये ही हातभार लावत आहेत. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील महत्त्वपूर्ण योगदानासाठी राकेश म्हात्रे, सुनीता वळवे, महेश शिंदे, विक्रम कोळी, प्रसाद हळदे, पियुष काटकर, यश सूर्यवंशी, अथर्व पवार, यशिका गायकवाड, सेजल झगडे, प्रभाकर कोनुरवार ,ओंकार खोत यांना विविध पुरस्काराने यावेळी गौरवण्यात आले प्रतिभा पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

## थोडक्यात पण महत्वाचे




### भागवत यांना अनिरुद्ध देशपांडे यांच्या हस्ते वासुदेव जीवनदृष्टी गौरव पुरस्कार प्रदान

पुणे : दैनिक संध्या

वेद वासुदेव प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित 'वासुदेव जन्मोत्सव सोहळा २०२६' मध्ये पर्यावरण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल १४ फीट फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रवीण भागवत यांना कै. विनायकराव निमदेव स्मृतीप्रीत्यर्थ 'वासुदेव जीवनदृष्टी गौरव पुरस्कार' सिटी कॉर्पोरेशनचे एम. डी. अनिरुद्ध देशपांडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. वेद वासुदेव प्रतिष्ठानच्या वतीने प. पू. श्रीमद् वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज यांच्या जन्मोत्सवानिमित्त आयोजित 'वासुदेव जन्मोत्सव सोहळा २०२६' भक्तिमय वातावरणात उत्साहात पार पडला. कर्वे रस्त्यावरील हर्षल हॉल येथे झालेल्या या सोहळ्यात भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले. यावेळी वेद वासुदेव प्रतिष्ठानचे अध्यक्ष अजित कृष्ण तुकदेव, अनिरुद्ध चिवटे, अविनाश कुळकर्णी , स्मिता घळसासी, नीलिमा चिवटे आदि मान्यवर उपस्थित होते. सोहळ्याची सुरुवात सकाळी 'चैतन्य वासुदेव रथ सोहळ्या'ने झाली. त्यानंतर श्रीमद् दत्तात्रय व श्री सत्यदत्त पूजा, महाप्रसाद, जन्मोत्सव कीर्तन, मनोगत तसेच गायनसेवा व करुणाष्टपदी आदी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम झाले. जन्मोत्सवानिमित्त परिसरात दिवसभर भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

### घरगुती अन्नावरील २६ टक्के कुत्र्यांना पचनाच्या तक्रारी

पुणे : दैनिक संध्या

घरगुती अन्नावर अवलंबून असणाऱ्या कुत्र्यांपैकी २६ टक्के कुत्र्यांना पचनाशी संबंधित समस्या जाणवत असल्याचे एका अंतर्गत अभ्यासातून समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर 'मार्स पेट न्यूट्रिशन'चा ब्रँड असलेल्या आणि भारतातील आघाडीच्या डॉग फूड ब्रँडपैकी एक असलेल्या 'पेडिग्री'ने प्रौढ कुत्र्यांसाठी 'हेल्दी बेली' हे नवीन, संपूर्ण आणि संतुलित खाद्य बाजारात आणले आहे. भोपळा, रताळे, चिकन, अंडे, प्रीबायोटिक्स आणि तंतू यांच्या मिश्रणातून हे खाद्य तयार करण्यात आले आहे. पचनास अनुकूल घटक, सहज पचणारी प्रथिने आणि आतड्यांच्या आरोग्यास उपयुक्त प्रीबायोटिक्स यांचा समावेश असलेले हे उत्पादन कुत्र्यांची पचनक्रिया सुरळीत ठेवण्यास मदत करते, असा कंपनीचा दावा आहे. कुत्र्यांच्या आरोग्याबाबत त्यांच्या पालकांमध्ये जागरूकता वाढत आहे. समस्या निर्माण झाल्यानंतर उपाय करण्याऐवजी, दैनंदिन आहारातून विशिष्ट आरोग्यविषयक गरजा पूर्ण करण्याकडे अनेकांचा कल वाढत असल्याचे कंपनीने नमूद केले. कंपनीच्या अंतर्गत अभ्यासानुसार, घरचे अन्न देणाऱ्या कुत्र्यांच्या पालकांपैकी २६ टक्के जणांनी त्यांच्या कुत्र्यांना पचनाशी संबंधित समस्या जाणवल्याचे सांगितले. त्यामुळे कुत्र्यांच्या दैनंदिन आहारात संतुलित आणि योग्य पोषणाचा समावेश करण्याची गरज अधोरेखित होत असल्याचे कंपनीने म्हटले आहे. कुत्र्यांच्या पचनाशी संबंधित आरोग्याविषयी माहिती देण्यासाठी आणि योग्य पोषणाची भूमिका समजावून सांगण्यासाठी कंपनीने 'हेल्दी बेली' नावाची विशेष 'मायक्रोसाइट'ही सुरू केली आहे.

### पुण्यातून 'डेंग्यूमुक्त भारत' अभियानाला सुरुवात

पुणे : दैनिक संध्या



भारतातील क्रमांक एक वैयक्तिक वापरासाठीचे डास प्रतिबंधक उत्पादन असलेल्या ओडोमॉसने 'डेंग्यूमुक्त भारत' या देशव्यापी जनजागृती अभियानाची सुरुवात केली. नागरिकांमध्ये डेंग्यूपासून बचावाबाबत जागरूकता निर्माण करणे तसेच दिवसा डेंग्यूचा प्रसार करणाऱ्या डासांपासून संरक्षण घेण्याची गरज अधोरेखित करणे, हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. शाळांमधील जनजागृती कार्यक्रम आणि समुदाय सहभागाच्या उपक्रमांद्वारे पावसाळ्याच्या काळात दररोज डासांपासून संरक्षण घेण्या बाबत जनजागृती करण्याचा प्रयत्न या अभियानातून केला जाणार आहे. डासांमुळे पसरणाऱ्या आजारांपासून बचावाबाबत जनजागृती निर्माण करणे आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना अंगीकारण्यास प्रोत्साहन देणे, हा ओडोमॉसच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा एक भाग आहे. ग्राहक शिक्षण आणि समुदाय जनजागृती कार्यक्रमांद्वारे कुटुंबांना डेंग्यू, मलेरिया आणि इतर डासांमुळे पसरणाऱ्या आजारांचा प्रसार करणाऱ्या डासांपासून सुरक्षित राहण्यास मदत करण्याचे उद्दिष्ट ब्रँडने ठेवले आहे. या अभियानांतर्गत संपूर्ण भारतातील शाळांमध्ये विविध उपक्रम राबवले जाणार असून, जनजागृती सत्रांच्या माध्यमातून विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांशी संवाद साधला जाणार आहे. डेंग्यूचा प्रसार करणाऱ्या डासांपासून प्रभावी संरक्षण कसे मिळवावे, याबाबत त्यांना माहिती देण्यात येणार आहे. या उपक्रमाचा शुभारंभ पुण्यात करण्यात आला. यावेळी सोसायटीमध्ये डॉ. श्रुती साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि देशसेवा फाऊंडेशन च्या मदतीने जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले. या सत्रात ३०० हून अधिक नागरिक आणि मुलांनी सहभाग घेतला. या उपक्रमाचे नेतृत्व प्रमुख वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. श्रुती भीमराव साळवे यांनी केले.

## ज्ञान प्रसाद ग्लोबल विद्यापीठाच्या वतीने रायरेश्वर येथे शिक्षकांचा सन्मान



■ पुणे (दै. संध्या)

डॉ. डी. वाय. पाटील ग्रुप पुणे संचालित ज्ञान प्रसाद ग्लोबल युनिव्हर्सिटी (डीपीजीयू) च्या वतीने प्र- कुलपती डॉ. सोमनाथ पी. पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त रायरेश्वर येथे शिक्षणाला प्रोत्साहन देणे, दुर्गम भागातील शिक्षकांच्या योगदानाचा सन्मान करणे आणि पर्यावरण संवर्धना साठी काम करणे, या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला.

डीपीजीयू टीमने रायरेश्वर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला भेट देऊन दुर्गम डोंगराळ भागात विद्यार्थ्यांना शिक्षण देणाऱ्या शिक्षकांचा सन्मान केला. त्यांच्या शैक्षणिक कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करत शिक्षकांना पुस्तके आणि विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य भेट दिले . ग्रामीण आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी आवश्यक साधने उपलब्ध करून देण्यासाठी विद्यापीठाच्या सामाजिक बांधिलकीचा हा उपक्रम महत्त्वपूर्ण आहे. यासोबतच डीपीजीयू टीमने प्राथमिक शाळा परिसरात देशी वृक्षांचे वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. स्थानिक समुदायाच्या सहभागातून झालेल्या या उपक्रमाने शिक्षण आणि पर्यावरण या दोन्ही क्षेत्रांतील सामाजिक जबाबदारी अधोरेखित केली. या उपक्रमाबाबत मत व्यक्त करताना डॉ. सोमनाथ पी. पाटील, यांनी समाजाप्रती असलेली जबाबदारी ही शिक्षण संस्थेच्या कार्याचा महत्त्वाचा भाग आहे. असे मत व्यक्त केले.

बोपोडीतील रेडीरेकनरचा कमी असलेला दर वाढविण्यासाठी

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार : परशुराम वाडेकर

■ पुणे (दै. संध्या)

बोपोडी परिसरातील झोपडपट्टी पुनर्वसनाच्या कामांना गती मिळावी आणि बोपोडीचा सर्वांगीण विकास व्हावा, यासाठी बोपोडी येथील रेडीरेकनरचा दर वाढविण्याची मागणी राज्य सरकारकडे करण्यात येणार आहे. यासंदर्भात पुण्याचे उपमहापौर मा. परशुराम वाडेकर हे मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार आहेत.

आज दि. ३ सप्टेंबर २०२६ रोजी उपमहापौर मा. परशुराम वाडेकर यांनी मा. सतीश कुमार खडके, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (SRA), मा. अर्चना पाटील, उपजिल्हाधिकारी तसेच मा. ऋषिकेश घाटे, सहाय्यक अधिकारी यांच्यासमवेत बोपोडी परिसरातील सर्व्हे नं. २३ व २४, नाईक चाळ, भोईटे चाळ, इंदिरा वसाहत, आदर्श नगर तसेच सर्व्हे नं. ५३ व ५४, बोपोडी, मुंबई-पुणे रोड या भागांची पाहणी केली.

यावेळी बोलताना मा. परशुराम वाडेकर यांनी सांगितले की, बोपोडी परिसरातील सुमारे ७० टक्के भाग झोपडपट्टी क्षेत्रात येतो. या परिसरातील रेडीरेकनरचा दर



तुलनेने कमी असल्यामुळे विकासकांना येथे SRA योजनेच्या माध्यमातून पुनर्वसन प्रकल्प राबविण्यास अपेक्षित आर्थिक व्यवहार्यता मिळत नाही. परिणामी अनेक विकासक बोपोडी परिसरात SRA योजना राबविण्यास उत्सुक नसल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. बोपोडी परिसरातील नागरिकांना चांगली घरे, मूलभूत सुविधा आणि नियोजनबद्ध विकास मिळण्यासाठी रेडीरेकनरच्या दरात योग्य ती वाढ करणे अत्यंत आवश्यक आहे. रेडीरेकनरचा दर वाढल्यास SRA प्रकल्पांसाठी विकासकांना प्रोत्साहन मिळेल आणि रखडलेल्या पुनर्वसन प्रक्रियेला गती मिळण्यास मदत होईल. मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुणे शहर झोपडपट्टीमुक्त करण्याच्या संकल्पनेला प्रत्यक्षात आणण्यासाठी बोपोडीतील रेडीरेकनरचा दर वाढविणे हा महत्त्वाचा निर्णय ठरू शकतो, असेही मा. वाडेकर यांनी सांगितले. यासंदर्भात लवकरच मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन बोपोडी परिसरातील रेडीरेकनरचा दर वाढविण्याची मागणी ठोसपणे मांडण्यात येणार असल्याचे उपमहापौर मा. परशुराम वाडेकर यांनी स्पष्ट केले.

## कलाकाराने उपेक्षितांचा आवाज बनले पाहिजे

उर्गेन आर्ट फेस्टिवल मधील कलाकार परिसंवादामध्ये ज्येष्ठ कलावंतांचे मत

■ पुणे (दै. संध्या)

कलाकार म्हणून काम करत असताना आपल्यातील संवेदना कायम जागरूक ठेवल्या पाहिजे . आपण समाजाकडे संवेदनशील नजरेने पाहिले तर आपल्यातील कला अधिक बहरत जाते . समाजाचे केवळ मनोरंजन न करता समाजाला जागृत ठेवून समाजातील उपेक्षित वर्गाचे प्रश्न मांडून त्यांचा आवाज बनण्याचे काम कलाकाराने केले पाहिजे, असे आवाहन चित्रकला नाट्य आधी विविध क्षेत्रातील ज्येष्ठ कलावंतांनी केले. करुणादीप फाउंडेशन आणि त्रिरत्न वैरोचना सेंटर यांच्यातर्फे बालगंधर्व रंगमंदिर येथे आयोजित करण्यात आलेल्या उरगेन आर्ट फेस्टिवल फेस्टिवल मध्ये कलाकार परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते ,त्यावेळी जेष्ठ कलाकारांनी कलाकार आणि समाजाप्रती असणाऱ्या त्यांच्या भावना व्यक्त केला. ज्येष्ठ छायाचित्रकार पद्मश्री सुधारक ओलवे, ज्येष्ठ चित्रकार मोगलान श्रावस्ती ,ज्येष्ठ चित्रकार सवी सावरकर, ज्येष्ठ रंगकर्मी संजय जीवने आधी या परिसंवादामध्ये सहभागी झाले होते. सुधारक ओलवे म्हणाले, पत्रकार म्हणून काम करत असताना माझी परिस्थिती अत्यंत गरीब होती. श्रीमंत लोकांच्या घरी



जाऊन त्यांचे फोटो काढण्याचे माझे काम होते, ही परिस्थिती मनाला वेदना देणारी होती, त्यामुळे समाजाचे प्रश्न छायाचित्राच्या माध्यमातून मांडण्यासाठी मी काम सुरू केलं . देवदासी ,जाती व्यवस्था, मुलगी नको अशा प्रकारच्या मानसिकता माझ्या छायाचित्राच्या माध्यमातून आजपर्यंत मांडत आलो आहे. समाजाचे वास्तव माझ्या छायाचित्रांमध्ये मानले जात आहे यामध्ये मी समाधानी आहे. सविंद्र सावरकर म्हणाले, कलाकार म्हणून मला जे माझ्या कलेच्या माध्यमातून मांडायचे आहे ते निश्चितपणे मांडतो. त्यासाठी मी कोणाचाही दबाव घेत नाही. कोणतीही विपरीत परिस्थिती आली तरी माझ्यातील कलाकाराला शांत बसू देत नाही, त्यामुळेच माझी कला समाजाला आणि विशेषता तरुणांना आकर्षित करत आहे. संजय जीवने म्हणाले, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार न मांडणारीही अनेक नाटक तयार होतात परंतु ही एक प्रकारची समाजाची अधोगती आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आणि गौतम बुद्ध यांचा समानतेचा विचार कलेच्या माध्यमातून मांडला गेला पाहिजे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनीही 1936 मध्ये प्रबोधनकार ठाकरे यांच्या खरा ब्राह्मण या नाटकाची समीक्षा केली होती, त्यामुळे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे समाज सुधारक या पलीकडे विविध प्रकारचे पहिले आहेत हे आपण जाणून घेतले पाहिजे.

मोगलाण श्रावस्ती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि गौतम बुद्ध यांचा विचार मांडणाऱ्या अनेक लेण्यांचे आज दुरवस्था झाली आहे. आपण त्यांच्याकडे समाजाचा वारसा म्हणून पाहिले पाहिजे , परंतु आत्मा मग्न झालेला समाज हा लेण्यांपासून आणि त्यापासून मिळणाऱ्या शिक्षणापासून दूर गेला आहे. त्यामुळे समाजाची अधोगती सुरू आहे. कलाकार म्हणून चित्राच्या माध्यमातून समाज प्रबोधन करता येईल ही माझी निश्चित भावना आहे. चित्रकला ही केवळ मनोरंजनासाठी नावे तर त्यातून समाजशिक्षणही झाले पाहिजे ही माझी ठाम भूमिका आहे.

## पुण्यातील रिअल इस्टेट ब्रँड जमतानीचा ब्रँड ॲम्बेसेडर रणवीर सिंग




■ पुणे (दै. संध्या)

पुण्यातील रिअल इस्टेट क्षेत्रातील जमतानी समूहाने लोकप्रिय अभिनेता रणवीर सिंग याची ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती केली आहे. 'The Name is a Promise – नाव म्हणजे एक वचन' या तत्त्वज्ञानावर उभ्या असलेल्या जमतानीच्या नव्या पर्वाची सुरुवात या भागीदारीतून करण्यात आली. पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत या भागीदारीची अधिकृत घोषणा करण्यात आली. गेल्या १६ वर्षांतील जमतानीच्या प्रवासात वेळेत प्रकल्प पूर्ण करणे, दर्जेदार बांधकाम, विश्वासार्हता आणि ग्राहकांशी दीर्घकालीन संबंध या मूल्यांना महत्त्व देण्यात आले आहे. या मूल्यांमुळे पुण्यातील १३ हजारांहून अधिक ग्राहकांचा विश्वास संपादन केल्याचा कंपनीचा दावा आहे. रणवीर सिंगची ऊर्जा, महत्त्वाकांक्षा, सातत्याने स्वतःमध्ये बदल घडवून आणण्याची वृत्ती आणि पारंपरिक चौकटी मोडून नवे प्रयोग करण्याची शैली जमतानीच्या नव्या वाटचालीशी सुसंगत असल्याचे कंपनीने म्हटले आहे. या भागीदारीबद्दल बोलताना रणवीर सिंग म्हणाला, "कोणतीही मजबूत भागीदारी समान मूल्ये आणि भविष्यासाठीच्या समान दृष्टिकोनातून निर्माण होते. जमतानीसोबतची ही भागीदारी माझ्यासाठी त्यामुळेच विशेष आहे. दर्जा आणि विश्वासाच्या जोरावर या ब्रँडने एक मजबूत वारसा निर्माण केला आहे आणि त्याच्या पुढील प्रवासाचा भाग होताना मला अभिमान वाटतो."

# पुण्यात एडीपी इंडियाचा वार्षिक दिन सोहळा उत्साहात साजरा

## २७ वर्षांच्या विकासाचा टप्पा आणि मानवी नेतृत्व, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित कामाच्या नव्या युगाची सुरुवात

■ पुणे (दै. संध्या)

मानवी भांडवल व्यवस्थापन उपाययोजनांमधील आघाडीची संस्था एडीपी प्रायव्हेट लिमिटेड ने पुण्यातील जेडब्लू मॅरीयट येथे १,३५० हून अधिक कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत आपला वार्षिक दिन सोहळा साजरा केला. 'आमचे नवे युग: मानवी नेतृत्व, कृत्रिम बुद्धिमत्तेची साथ' या संकल्पनेखाली आयोजित या सोहळ्यात भारतातील एडीपी च्या २७ वर्षांच्या प्रवासाचा गौरव करण्यात आला. तसेच, संस्थेच्या सातत्यपूर्ण विकास आणि परिवर्तनाला चालना देणारे कर्मचारी, कल्पना आणि संस्कृती यावर प्रकाश टाकण्यात आला.




पुण्यातील वार्षिक दिन सोहळ्याने एडीपी इंडिया च्या कर्मचारी-केंद्रित संस्कृतीचे दर्शन घडवतानाच, उल्लेखनीय कामगिरीची दखल घेणे, प्रतिभेचा गौरव करणे आणि कर्मचाऱ्यांना एकत्र आणण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले. कार्यक्रमात एडीपी इंडिया च्या कर्मचाऱ्यांसह कंपनीच्या सामाजिक उत्तरदायित्व विभाग तरंगच्या माध्यमातून सहाय्य मिळणाऱ्या मुलांनी विविध सांस्कृतिक सादरीकरणे केली. या माध्यमातून एडीपी समुदायातील विविध पिढ्या एकाच मंचावर आल्या. एडीपी स्टुडिओ च्या उत्साहपूर्ण संगीत सादरीकरणांसह नाट्यप्रयोग आणि दमदार ढोलवादनाने सोहळ्याची रंगत वाढवली. या प्रसंगी बोलताना एडीपी प्रायव्हेट लिमिटेड चे व्यवस्थापकीय संचालक आणि सरव्यवस्थापक, श्री. विजय वेमुलापल्ली म्हणाले, "एडीपी इंडिया च्या उल्लेखनीय प्रवासाला आकार देणाऱ्या आणि संस्थेचे भविष्य घडवत राहणाऱ्या आमच्या कर्मचाऱ्यांचा गौरव करण्याची संधी म्हणजे वार्षिक दिन. २७ वर्षांच्या कालावधीत आम्ही १०२ कर्मचाऱ्यांपासून १३,६०० हून अधिक कर्मचाऱ्यांपर्यंतचा प्रवास केला असून, आज आम्ही नवोन्मेष आणि उच्च-मूल्याच्या कामासाठी एक धोरणात्मक केंद्र म्हणून विकसित झालो आहोत.

'मानवी नेतृत्व, कृत्रिम बुद्धिमत्तेची साथ' या नव्या युगात प्रवेश करत असताना, आमचे कर्मचारी आम्ही करत असलेल्या प्रत्येक गोष्टीच्या केंद्रस्थानी आहेत. मानवी क्षमतेला अधिक सक्षम करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्यावर आमचा भर आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



## गणेशोत्सवासाठी नारायणगाव बाजारपेठ सज्ज

**नारायणगाव: दैनिक संध्या**

गणेशोत्सवाचे वेध आता सर्वांनाच लागले असून अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या बाप्पाच्या स्वागतासाठी नारायणगाव आणि परिसर सज्ज झाला आहे. बाजारपेठेत गणेशमूर्ती विक्रीची दुकाने मोठ्या प्रमाणात थाटली गेली असून, विविध आकार, आकर्षक रंगसंगती आणि वेगवेगळ्या रूपांतील मूर्ती ग्राहकांना आकर्षित करत आहेत. यंदा घरगुती तसेच सार्वजनिक गणेशोत्सवासाठी मूर्ती खरेदी करणाऱ्या भाविकांची दुकानांमध्ये आतापासूनच मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. मात्र, महागाई आणि वाढत्या मजुरीचा फटका यंदा बाप्पाच्या मूर्तींनाही बसला असून किमतीत २५ ते ३० टक्क्यांनी वाढ झाली आहे. गणेशमूर्ती बनवण्यासाठी लागणारा कच्चा माल, रंग, वाहतूक आणि मुख्यत्वे मजुरीच्या खर्चात कमालीची वाढ झाली आहे. मूर्तिकारांच्या मते, गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा मजुरीचे दर वाढल्यामुळे उत्पादन खर्च वाढला असून, त्याचा थेट परिणाम मूर्तींच्या अंतिम किमतीवर झाला आहे. महागाईच्या या वाढत्या प्रमाणामुळे यंदा गणेशमूर्तींच्या किमती सुमारे २५ ते ३० टक्क्यांनी वधारल्याचे विक्रेत्यांनी सांगितले आहे. तसेच गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर आल्याने नारायणगाव परिसरातील वातावरण पूर्णपणे गणेशमय झाले आहे. मूर्ती विक्रीच्या दुकानांना आकर्षक रोषणाई आणि सजावट करण्यात आली असून, सकाळपासून रात्री उशिरापर्यंत या दुकानांमध्ये गर्दी पाहायला मिळते. अनेक कुटुंबे एकत्र येऊन आपल्या लाडक्या बाप्पाची मूर्ती निवडताना दिसत आहेत. केवळ घरगुतीच नव्हे, तर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनीही यंदा मंडप उभारणी, विद्युत रोषणाई, आणि सजावटीची तयारी वेगाने सुरू केली आहे. यामुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, नागरिक बाप्पाच्या आगमनाची आतुरतेने प्रतीक्षा करत आहेत. गणेशमूर्ती विक्री करणाऱ्या स्थानिक दुकानदारांनी सांगितले की, "गणेशोत्सव जवळ आल्याने गेल्या काही दिवसांपासून ग्राहकांची संख्या सातत्याने वाढत आहे. घरगुती गणपतीसाठी मध्यम आणि लहान आकाराच्या मूर्तींना मोठी मागणी आहे. यंदा मूर्ती तयार करण्याचा खर्च वाढल्यामुळे किमती वाढल्या असल्या, तरी आम्ही ग्राहकांच्या बजेटचा विचार करून विविध किमतींमधील मूर्ती उपलब्ध करून दिल्या आहेत." दुसऱ्या एका विक्रेत्याने सांगितले की, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांकडून मोठ्या आणि भव्य मूर्तींची मागणी येत असून, घरगुती गणपतीसाठी पारंपरिक तसेच छोट्या आकाराच्या मूर्तींना पसंती मिळत आहे.

## जेजुरीत एकल महिलांचे सर्वेक्षण सुरू

**जेजुरी: दैनिक संध्या**

राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थेमधील एकल महिलांचे सर्वेक्षण सुरू असून जेजुरी नगरपरिषद हद्दीतील एकल महिलांच्या सक्षमीकरणासाठी जेजुरी नगरपरिषदेत सर्वेक्षण सुरू असून संबंधित महिलांनी परिषदेत संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. शासनाच्या आदेशा नुसार एकल महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी योजना आखण्यात आली असून विधवा, परित्यक्ता, घटस्फोटित, व अविवाहित महिलांचे सर्वेक्षण करण्यात येत आहे. यासाठी संबंधित महिलांनी आधार कार्ड व रेशनिंग कार्डची झेरॉक्स तसेच फोटो जेजुरी नगरपरिषदेत देऊन व नोंद करून या योजनेच्या सर्वेक्षणासाठी नोंद करावी असे आवाहन जेजुरी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष जयदीप बारभाई तसेच मुख्याधिकारी चारुदत्त इंगुले यांनी केले आहे. जेजुरी नगरपरिषदेचे कार्यालयीन वेळेत या विभागाचे अधिकारी अमर रणवरे यांच्याशी संपर्क साधावा असे प्रशासनाच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.

## डॉ. प्रभा अत्रे संगीत-साहित्य आणि संगीत-संशोधन पुरस्कार वितरण समारंभ रविवारी

**पुणे : दैनिक संध्या**

डॉ. प्रभा अत्रे फाऊंडेशनतर्फे स्वरयोगिनी डॉ. प्रभा अत्रे संगीत-साहित्य पुरस्कार आणि स्वरयोगिनी डॉ. प्रभा अत्रे संगीत-संशोधन पुरस्कार वितरण समारंभ रविवार, दि. ६ सप्टेंबर रोजी सकाळी १०:३० वाजता टिळक रस्त्यावरील न्यू इंग्लिश शाळेच्या आवारातील गणेश सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. पुरस्कारांचे वितरण सुप्रसिद्ध ध्रुपद गायक, संशोधक, शिक्षणतज्ज्ञ, पद्मश्री व संगीत नाटक अकादमी पुरस्कार विजेते डॉ. ऋत्विक सन्याल यांच्या हस्ते होणार असून या प्रसंगी ज्येष्ठ साहित्यिक व पत्रकार विजय कुवळेकर, डॉ. प्रभा अत्रे फाऊंडेशनचे व्यवस्थापकीय विश्वस्त ॲड. अशोक वळसंगकर, प्रख्यात हिंदुस्थानी शास्त्रीय गायक डॉ. विकास कशाळकर यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे, अशी माहिती डॉ. प्रभा अत्रे फाऊंडेशनच्या सचिव डॉ. भारती एम. डी., कार्यक्रम निर्देशक प्रसाद भडसावळे यांनी निवेदनाद्वारे कळविली आहे. डॉ. प्रभाताई अत्रे यांचे विचार प्रत्यक्षात आणण्यासाठी आणि संगीत क्षेत्रातील संशोधन व दस्तऐवजीकरणाला प्रोत्साहन देण्यासाठी डॉ. प्रभा अत्रे फाऊंडेशनतर्फे या वर्षीपासून 'स्वरयोगिनी डॉ. प्रभा अत्रे संगीत-साहित्य पुरस्कार' आणि 'स्वरयोगिनी डॉ. प्रभा अत्रे संगीत-संशोधन पुरस्कार' देण्यात येणार आहेत. संगीत साहित्य पुरस्कार : प्रथम : प्रा. अंजली मालकर, द्वितीय : माधवी नानल, तृतीय : विदुषी शमा भाटे तर संगीत-संशोधन पुरस्कार : प्रथम : डॉ. अर्पिता वैशंपायन, द्वितीय डॉ. पल्लवी पोटे, तृतीय डॉ. निरजा उदय वाघ यांना प्रदान केला जाणार आहे. पुरस्कार वितरण समारंभानंतर प्रा. अंजली मालकर यांच्या 'हिंदुस्थानी अभिजात संगीतचा इतिहास' या पुस्तकावर आधारित सांगितीक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे.

## चाकणला ड्रेनेज लाईनच्या कामास प्रारंभ

**चाकण : दैनिक संध्या**

चाकण येथे प्रभाग क्रमांक आठमधील सरफराज सिकिलकर यांच्या घरापासून संजय कदम यांच्या घरा पर्यंत ड्रेनेज लाईनच्या कामास प्रारंभ करण्यात आला आहे. चाकण नगरपरिषदेच्या नगरसेविका तृप्ती जगनाडे यांच्या हस्ते या कामाचा प्रारंभ करण्यात आला. याप्रसंगी उद्योजक किशोर जगनाडे, फिरोज सिकिलकर, नगरसेवक मंगेश कांडगे, सामाजिक कार्यकर्ते मुजफ्फर सिकिलकर, खेड तालुका अल्पसंख्यांकचे अध्यक्ष सरफराज सिकिलकर, धनंजय कदम आदी उपस्थित होते. तृप्ती जगनाडे यांनी यावेळी सांगितले की," चाकण नगरपरिषदेच्या माध्यमातून चाकण गावात विकास कामांना प्राधान्य देणार आहे. पायाभूत सुविधा मार्गी लावण्याबरोबरच वीज, पाणी, कचरा या समस्यांकडे विशेष लक्ष दिले जाणार आहे. नागरिकांनी परिसरात स्वच्छता ठेवून गाव सुंदर राहण्यासाठी जागरूक राहिले पाहिजे." किशोर जगनाडे, मंगेश कांडगे व धनंजय कदम यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.



# शिक्षकांच्या प्रश्नांची जाण असलेले नेतृत्व प्राचार्य नंदकुमार सागर यांना सभागृहात पाठवा - मेमाणे

**■ जेजुरी(दै. संध्या)**

पुणे विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाचे राज्य सचिव, राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त प्राचार्य नंदकुमार सागर हे उमेदवार म्हणून निवडणूक लढविणार आहेत. शिक्षण क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव, शिक्षक व मुख्याध्यापकांच्या प्रश्नांचा सातत्यपूर्ण अभ्यास, संघटनात्मक कार्यातील सक्रिय सहभाग आणि प्रशासनाशी प्रभावी संवाद साधण्याची क्षमता या गुणांमुळे प्राचार्य सागर यांना शिक्षक मतदारसंघातून सभागृहात पाठविणे आवश्यक असल्याचे मत राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त माजी मुख्याध्यापक कुंडलिक मेमाणे यांनी व्यक्त केले आहे.



प्राचार्य नंदकुमार सागर यांचा शैक्षणिक प्रवास हा संघर्षातून यशाकडे वाटचाल करणारा आहे. प्रतिकूल परिस्थितीतही शिक्षण क्षेत्राशी निष्ठा राखून त्यांनी शिक्षक, मुख्याध्यापक, संघटक आणि शैक्षणिक नेतृत्व अशा विविध भूमिका समर्थपणे पार पाडल्या. जिजामाता हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, जेजुरी येथे शिक्षक म्हणून कार्यास प्रारंभ करून पुढे प्राचार्य पदाची जबाबदारी स्वीकारत त्यांनी संस्थेच्या आणि विद्यालयाच्या शैक्षणिक प्रगतीत महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या कार्याची दखल घेऊन विविध स्तरांवर पुरस्कार मिळाले असून सन २०१६ मध्ये भारत सरकारकडून शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च मानला जाणारा राष्ट्रपती पुरस्कार प्रदान करण्यात आला.

शिक्षकांच्या प्रश्नांची सखोल जाण :- शिक्षक हा केवळ वर्गात अध्यापन करणारा घटक नसून समाज परिवर्तनाचा महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. मात्र आज शिक्षक आणि मुख्याध्यापकांना प्रशासकीय कामांचा वाढता बोजा, रिक्त पदे, अनुदानाचे प्रश्न, वेतनविषयक अडचणी, सेवाशर्ती, टीईटी, संचमान्यता, अतिरिक्त कामे आणि शाळांच्या गुणवत्तावाढीसाठी आवश्यक सुविधा अशा अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागत आहे. या सर्व प्रश्नांचा प्रत्यक्ष अनुभव असलेले प्राचार्य नंदकुमार सागर हे केवळ समस्या मांडणारे नव्हे, तर त्यावर अभ्यासपूर्ण आणि विधायक उपाय सुचविणारे नेतृत्व असल्याचे कुंडलिक मेमाणे यांनी नमूद केले. प्राचार्य नंदकुमार सागर यांनी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, मुख्याध्यापक आणि शैक्षणिक संस्थांच्या प्रश्नांसाठी स्पष्ट भूमिका मांडली आहे. त्यांनी खालील प्रश्न सोडविण्यासाठी वेळोवेळी आंदोलने केली आहेत,त्यामध्ये जुनी पेन्शन योजना लागू करण्यासाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा केला आहे, अनुदानास पात्र प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना अनुदान मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले आहेत,

मराठी शाळा टिकविण्यासाठी संवेदनशील धोरण तयार करावे यासाठी ते रात्रंदिवस झटत आहेत,वेतनाव्यतिरिक्त अनुदान हक्कांमध्ये वाढ करण्यासाठी पाठपुरावा करत आहेत,शिक्षकांवरील अशैक्षणिक कामांचा बोजा कमी करणे,शिक्षण विभागातील रिक्त पदे तातडीने भरण्यासाठी प्रयत्न केले आहेत,एस.एस.सी व एच.एस.सी बोर्डातील आवश्यक सुधारणा करण्यासाठी पाठपुरावा केला आहे,सर्व शाळांना इंटरनेट व डिजिटल सुविधा मिळण्यासाठी प्रयत्नशील आहेत,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कॅशलेस वैद्यकीय सेवा मिळण्यासाठी प्रयत्न केला आहे,सेवा हमी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ते तळमळीने शासन दरबारी पाठपुरावा करीत आहेत,

शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मुख्याध्यापक मान्यता व वरिष्ठ वेतनश्रेणीसंदर्भातील प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करीत आहेत, ग्रामीण व शहरी भागातील सर्व शाळांना गुणवत्तापूर्ण सुविधा मिळण्यासाठी प्रयत्नशील आहेत, स्पर्धा परीक्षा व शिष्यवृत्ती परीक्षांसाठी तालुकास्तरावर मार्गदर्शन मेळावे घ्यावेत यासाठी ते सतत पाठपुरावा करीत असतात, लोकसेवा आयोग व इतर स्पर्धा परीक्षांसाठी जिल्हानिहाय निवासी केंद्रांची सुविधा उपलब्ध व्हावी ही ते आग्रही आहेत.सी.एस. आर. अंतर्गत शाळांसाठी निधी उपलब्ध करून देणे यासाठी प्रयत्न करीत आहेत, शिक्षण व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मुलांसाठी विविध शासकीय योजनांचा लाभ उपलब्ध करून देणे यासाठी प्रयत्न करणार आहेत, त्यांचे कार्य निवडणुकीपुरते नसून शिक्षण क्षेत्राच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने असल्याचे दिसून येते.

### गतिमान प्रशासनाची भूमिका

प्राचार्य सागर यांच्या कार्यशैलीचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची प्रशासनाविषयीची सकारात्मक आणि गतिमान भूमिका. प्रशासन हे समाजाचा आरसा असून लोकांसाठी सदैव उपलब्ध राहणे, विविध प्रश्नांवर अभ्यासपूर्ण चर्चा करून निर्णय घेणे आणि विकासासाठी कालबद्ध पद्धतीने काम करणे आवश्यक आहे, हा त्यांचा दृष्टिकोन आहे. शिक्षण क्षेत्रातील अनुभवाबरोबरच विविध शिक्षक व मुख्याध्यापक संघटनांमध्ये त्यांनी काम केले आहे. त्यामुळे शिक्षकांच्या प्रश्नांची केवळ कागदोपत्री नव्हे, तर प्रत्यक्ष अनुभवातून त्यांना जाण आहे. शिक्षण क्षेत्रातील आपले प्रशासकीय ज्ञान इतरांनाही उपयोगी पडावे या भावनेतून त्यांनी लेखन आणि मार्गदर्शनाचे कार्यही केले आहे. पुणे विभागात पुणे, सातारा, सांगली, सोलापूर आणि कोल्हापूर या जिल्ह्यांतील शिक्षकांच्या अनेक समस्या वर्षानुवर्षे प्रलंबित आहेत. ग्रामीण आणि शहरी भागातील शिक्षण व्यवस्थेतील तफावत, अनुदान, शिक्षक भरती, संचमान्यता, मुख्याध्यापकांचे प्रश्न, शाळांच्या भौतिक सुविधा आणि शिक्षणाच्या गुणवत्तेचा प्रश्न यासाठी सभागृहात प्राचार्य नंदकुमार सागर यांच्या अभ्यासू आणि अनुभवी आवाजाची आवश्यकता आहे. "प्राचार्य नंदकुमार सागर यांनी आयुष्यभर शिक्षण क्षेत्रासाठी काम केले आहे. शिक्षक, मुख्याध्यापक, संस्था आणि विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची त्यांना प्रत्यक्ष जाण आहे. संघर्षातून उभे राहून त्यांनी शिक्षण क्षेत्रात आदर्श निर्माण केला आहे. त्यामुळे केवळ प्रतिनिधी म्हणून नव्हे, तर शिक्षकांच्या प्रश्नांसाठी प्रभावीपणे आवाज उठविणारे नेतृत्व म्हणून त्यांना सभागृहात पाठविण्याची गरज आहे," असे मत राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त माजी मुख्याध्यापक कुंडलिक मेमाणे यांनी व्यक्त केले. प्राचार्य नंदकुमार सागर यांचा प्रवास हा एका सामान्य शिक्षकापासून राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त शैक्षणिक नेतृत्वापर्यंतचा आहे. कठोर परिश्रम, प्रामाणिकपणा, विद्यार्थ्यांविषयीची आत्मीयता आणि शिक्षण क्षेत्राप्रती असलेली निष्ठा या बळावर त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली. त्यांच्या नेतृत्वाखाली शाळेची गुणवत्ता, निकाल, विविध उपक्रम आणि विद्यार्थ्यांची प्रगती यांना चालना मिळाल्याचा उल्लेख त्यांच्या जीवनप्रवासात आढळतो. आज शिक्षक मतदारसंघाला केवळ आश्वासनांची नव्हे, तर प्रश्नांची जाण, प्रशासनाचा अनुभव आणि संघर्ष करण्याची तयारी असलेल्या प्रतिनिधीची आवश्यकता आहे. प्राचार्य नंदकुमार सागर यांच्या रूपाने शिक्षकांना असा अनुभवी, संवेदनशील आणि अभ्यासू पर्याय उपलब्ध झाला आहे. "शिक्षकांचे प्रश्न सभागृहात प्रभावीपणे मांडण्यासाठी, शिक्षण क्षेत्राला न्याय देण्यासाठी आणि शिक्षकांच्या हक्कांसाठी सातत्याने लढणारे नेतृत्व मिळावे, यासाठी प्राचार्य नंदकुमार सागर यांना पुणे विभाग शिक्षक मतदारसंघातून विजयी करून सभागृहात पाठवावे," असे आवाहन राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त माजी मुख्याध्यापक कुंडलिक मेमाणे यांनी केले आहे.

## राहुल गांधी यांच्याविरूध्द दाखल करण्यात आलेल्या FIR च्या निषेधार्थ निषेध आंदोलन

**■ पुणे (दै. संध्या)**

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मा. खा. श्री. मल्लिकार्जुन खरगे यांच्या हल्दवानी येथील सभास्थळी भाजप व आरएसएसच्या कार्यकर्त्यांनी केलेल्या अत्यंत निंदनीय अशा शुध्दीकरण विधीच्या पार्श्वभूमीवर, लोकसभेचे विरोधी पक्षनेते मा. खा. श्री. राहुलजी गांधी यांनी पत्रकार परिषदेत ठाम भूमिका घेतली आणि या कृत्यांमध्ये सहभागी असलेल्या व्यक्तींविरूध्द कठोर कारवाई करून FIR दाखल करण्याची मागणी केली.



मात्र घटनात्मक मूल्यांचा गंभीर अपमान करणाऱ्यांवर कारवाई करण्याऐवजी, भाजप प्रणित राज्य सरकारच्या दबावाखाली कार्यरत असलेल्या उत्तराखंड पोलीसांनी मा. खा. श्री. राहुलजी गांधी यांच्या विरूध्द हल्दवानी शहर कोतवाली पोलीसांनी धोकादायकपणे FIR दाखल केला. जातीय भेदभाव आणि दलितांवरील अत्याचारांविरोधात आवाज उठविणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला दडपण्यासाठी राज्याची संपूर्ण यंत्रणा वापरण्याची त्यांची तयारी दिसून येते. या सुडबुध्दीच्या राजकारणाचा तीव्र निषेध करण्यासाठी आणि उत्तराखंडमधील दोषी भाजप कार्यकर्त्यांविरूध्द तातडीने कायदेशीर कारवाई करण्यात यावी यासाठी आज पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने पुणे महानगरपालिकेतील काँग्रेस पक्षाचे गटनेते मा. रामचंद्र उर्फ चंदूशेठ कदम यांच्या नेतृत्वाखाली आज झाशीची राणी पुतळा, बालगंधर्व चौक येथे निषेध आंदोलन करण्यात आले.

यावेळी गटनेते चंदूशेठ कदम म्हणाले की, "संविधानात अंतर्भूत असलेल्या सामाजिक न्यायाच्या मूल्यांवर हल्ला करणाऱ्यांच्या विरोधात आमचा संघर्ष सुरूच राहील. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसला राज्य पुरस्कृत दडपशाहीच्या कारवायांनी घाबरवता येणार नाही आणि प्रत्येक नागरिकाच्या सामाजिक न्याय, घटनात्मक समानता व प्रतिष्ठेसाठी काँग्रेस पक्ष सातत्याने संघर्ष करीत राहील.

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या सभेनंतर सभास्थळाचे 'शुद्धीकरण' करणे ही जातीयवादी मानसिकतेची पराकाष्ठा आहे. हा केवळ मल्लिकार्जुन खर्गे यांऺचा अपमान नसून देशातील कोट्यवधी दलित, वंचित आणि शोषित नागरिकांचा अपमान आहे. भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला समानतेचा अधिकार दिलेला असताना जात-पात आणि अस्पृश्यतेच्या मानसिकतेला खतपाणी घालणाऱ्या प्रवृत्तींविरोधात काँग्रेस पक्ष सातत्याने लढा देत राहील."



## जनकल्याण महामार्ग नको; शेतकऱ्यांचा निर्धार, शेती नष्ट होण्याची भीती

**■ नारायणगाव (दै. संध्या)**

कल्याण-लातूर जनकल्याण महामार्गाच्या प्रस्तावित मार्गासाठी सुरू असलेल्या सर्वेक्षणाला जुन्नर तालुक्यातील शेतकऱ्यांकडून अत्यंत तीव्र विरोध केला जात आहे. या प्रकल्पाच्या विरोधात कोळवाडी येथे शेकडो शेतकऱ्यांची एक महत्त्वपूर्ण सभा पार पडली. या सभेच्या माध्यमातून तालुक्यातील तब्बल १६ गावांतील शेतकऱ्यांनी एकत्र येत प्रशासनाविरोधात एल्गार पुकारला आहे. प्रस्तावित भूसंपादनामुळे हजारो हेक्टर सुपीक शेती नष्ट होण्याची भीती यावेळी शेतकऱ्यांनी व्यक्त केली. कोळवाडी येथील माजी आमदार बाळासाहेब दांगट यांच्या निवासस्थानी या भव्य सभेचे आयोजन करण्यात आले होते. प्रस्तावित महामार्गामुळे शेतकऱ्यांच्या सुपीक जमिनी, घरे आणि रोजगारावर काय परिणाम होईल, यावर या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

या बैठकीला मंदाकिनी दांगट, माजी जिल्हा परिषद सदस्य अंकुश आमले, भाजपा नेते भगवान घोलप, बापूसाहेब कुमकर, सूरज वाजगे, सुभाष घोलप, पोपट राक्षे, रोहिदास गोडे, नितीन घोलप यांच्यासह विविध पक्षांचे पदाधिकारी, सरपंच, शेकडो शेतकरी आणि व्यावसायिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. महामार्गासाठी जमीन संपादन झाल्यास अनेक शेतकऱ्यांच्या जमिनीचे तुकडे होतील, शेती व्यवसाय धोक्यात येईल आणि स्थानिक बाजारपेठांचे अर्थकारण कोलमडेल, अशी भीती उपस्थितांनी व्यक्त केली.

**बाधित गावांना एकत्र करून शासनाकडे हा प्रस्ताव रद्द करण्याची मागणी करण्याचा निर्णय या वेळी घेण्यात आला. जुन्नर तालुका हा प्रामुख्याने माळशेज घाट परिसरातील निसर्गरम्य आणि वनसंपदेने नटलेला कृषिप्रधान भाग आहे. यावेळी शेतकऱ्यांनी चिंता व्यक्त केली आहे की, जर हा महामार्ग येथून गेला तर हजारो हेक्टर सुपीक शेतजमीन नष्ट होईल. तसेच वन्यप्राण्यांचे नैसर्गिक अधिवास धोक्यात येतील आणि अनेक शेतकरी कुटुंबे भूमिहीन होऊन रस्त्यावर येतील. स्थानिक प्रशासनाने किंवा सरकारने शेतकऱ्यांची मते जाणून न घेता कोणतीही प्रक्रिया पुढे नेऊ नये, अशी मागणी यावेळी करण्यात आली. या बैठकीत उपस्थित शेतकऱ्यांनी केवळ जमिनी जाण्याचाच नव्हे, तर महामार्गामुळे होणाऱ्या भविष्यातील धोक्यांचाही प्रश्न मांडला आहे. महामार्ग तयार झाल्यास या भागातील वाहनांची वर्दळ प्रचंड वाढेल.**


महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

**इ-निविदा सूचना**
**क्र.ना.औ.वि.कें/२०२६-२७/२३**

| अ. क्र. | निविदा क्र./ विभाग | निविदा तपशील | अंदाजे रक्कम (रु.) इसारा रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| १. | ३००००७१४४९ / ईएम | एच.टी. ट्रान्सफॉर्मर ऑईल फिल्ट्रेशन आणि टेस्टींग च्या कामाचे वार्षिक कंत्राट. | २,९५,४८२/- / ६,४६०/- |
| २. | ३००००७१४९८ / आय ॲन्ड सी | संच क्र. ४ च्या ओव्हरहॉल दरम्यान RTD आणि K-टाइप थर्मोकपल्सची खरेदी. | १२,४३,४६१/- / १५,९३५/- |
| ३. | ३००००७१५०६ / बीएम | संच क्र. ४ च्या वार्षिक दुरूस्ती दरम्यान विविध आकाराच्या क्रिटिकल उच्च दाब व्हॉल्वच्या सर्व्हिसिंग आणि दुरूस्तीचे काम. | १३,९३,२५४/- / १७,४५०/- |
| ४. | ३००००७१५११ / ओडीपी | ओडीपी २ येथे दैनंदिन देखभालीच्या कामांसाठी ऑटो रिक्षा सेवा पुरविण्यासाठी वार्षिक कामाचा करार. | ४,१९,६५४/- / ७,७००/- |
| ५. | ३००००७१५१२ / टीएम | युनिट क्रमांक ४ च्या सी.डब्लु पंपाच्या पायाभुत संरचना मजबुत करण्याचे काम. | ७,६८,७६०/- / ११,२००/- |
| ६. | ३००००७१५१३ / टीएम | टीएम २ येथे सीओपी बाऊल जीएस पंप स्ट्रेनर, एचटूबीपी स्ट्रेनर, सील ऑईल फिल्टर यांची साफसफाई व टर्बाईन ऑक्झिलरीजमध्ये ऑईल टॉपअप या कामाचे कंत्राट. | ७,७७,८९८/- / ११,३००/- |
| ७. | ३००००७१५१४ / टीएम | टीएम येथे दैनंदिन देखभालीच्या कामांसाठी कामाचा करार (आवश्यकतेनुसार). | ७,३०,५५०/- / १०,८५०/- |
| ८. | ३००००७१६३३ / ईएम | एच.टी. मोटर स्थलांतर करण्याच्या कामाचे कंत्राट.(गरज असेल तेव्हा) | ३,८४,७३८/- / ७,३००/- |
| ९. | ३००००७१६३५ / ईएम | एच. टी./एल.टी. मोटर स्पेअर्स साठी मेटल फिलींग, मशिनींग आणि रिकंडिशनींग च्या कामाचे कंत्राट.(आवश्यकतेनुसार) | ४,९१,४३६/- / ८,४००/- |
| १०. | ३००००७१६३२ / ईएम | युनिट ४ सीओएच दरम्यान २२० व्ही / ५० व्ही डीसी बॅटरी क्षमता टेस्ट/ कार्यक्षमता चाचणीसाठी कामाचा करार. | ३,०२,३००/- / ६,४८०/- |
| ११. | ३००००७१६५१ / ओएस | टप्पा क्र. २ युनिट ३,४ व ५ येथे बॉटम ॲश व फ्लाय ॲश शिफ्टनिहाय काढण्यासाठी द्विवार्षिक कंत्राट. | ५५,१०,०९४/- / ५८,६०१/- |
| १२. | ३००००७१७५३ / सीएचपी | शिफ्ट इलेक्ट्रिकल मेंटेनन्स वर्क, सीएचपीसाठी शिफ्टमध्ये प्लांट ऑपरेशन आणि लाईटींग फिक्श्चर, केबल्स, पॅनल्स, जंक्शन बॉक्सेस दुरूस्ती/ बदलण्यासाठी वार्षिक कामाचा कंत्राट. | ९३,३७,८५०/- / ९६,८५०/- |
| १३. | ३००००७१७७५ / सीएचपी | सीएचपी येथे अंतर्गत साम्रगीच्या वाहतुकीसाठी ड्रायव्हरसह हायड्रा क्रेन सेवा पुरविण्यासाठी कामाचा करार (आवश्यकतेनुसार). | ११,२२,११६/- / १४,६८०/- |
| १४. | ३००००७१७७१ / टीएम | व्हॉल्व, ॲक्च्युएटर्स, पंपाच्या ओव्हरहॉलिंगसाठी (आवश्यकतेनुसार) कामाचा करार. | ३४,५२,९३४/- / ३८,०३०/- |
| १५. | ३००००७१७७० / टीएम | युनिट क्र. ३/४/५ मधील टर्बाईन साईडला उच्च दाबाचे व्हॉल्व्ह बसविण्याच्या कामाचे कंत्राट. | ७,६३,०८८/- / ११,१४०/- |
| १६. | ३००००७१७६९ / टीएम | नाशिक औ.वि.केंद्र येथे बसवलेल्या किर्लोस्कर कंपनीच्या जी एस पंप पुनर्बांधणी / दुरुस्ती. | २९,२५,०००/- / ३२,७५०/- |

नविन विक्रेते/ नोंदणी नसलेल्या विक्रेत्यांना विनंती आहे की त्यांनी त्यांच्या कंपनीची ई-टेंडरिंगसाठी नोंदणी करावी. अधिक तपशीलांसाठी वेबसाइटवर लॉग इन करा.

प्रत्येक निविदा किंमत: रु. ११८०/-, अधिक माहिती व अद्यतनांसाठी कृपया https://eprocurement.mahagenco.in येथे भेट द्यावी.

मुख्य अभियंता, नाशिक
औ.वि.केंद्र, एकलहरे

## थोडक्यात पण महत्वाचे



### तब्बल २ कोटी २० लाखांची फसवणूक; राजस्थानमधील तीन आरोपींना अटक

**पिंपरी : दैनिक संध्या**

नामांकित ऑटो शोरूम कंपनीच्या मालकाचे बनावट व्हॉट्सअॅप अकाउंट तयार करून कंपनीच्या अकाऊंट एक्झिक्युटिव्हची फसवणूक करत तब्बल २ कोटी २० लाख रुपयांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या राजस्थानमधील तीन आरोपींना पिंपरी-चिंचवड सायबर पोलिसांनी अटक केली आहे. सायबर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी हे एका ऑटो शोरूम कंपनीचे मालक आहेत. १४ ऑगस्ट २०२६ रोजी कंपनीच्या अकाऊंट एक्झिक्युटिव्हला एका व्हॉट्सअॅप क्रमांकावरून संदेश प्राप्त झाला. त्या क्रमांकाच्या डीपीवर कंपनीच्या मालकाचा फोटो आणि नाव असल्याने त्यांनी त्यावर विश्वास ठेवून कंपनीच्या खात्याची शिल्लक माहिती दिली. यानंतर संबंधित व्हॉट्सअॅप क्रमांकावरून विविध बँक खात्यांवर पैसे हस्तांतरित करण्याचे निर्देश देण्यात आले. कंपनीच्या मालकांच्या नावाचा वापर करून विश्वास संपादन करण्यात आला आणि वेगवेगळ्या खात्यांमध्ये एकूण २ कोटी २० लाख रुपये जमा करण्यास सांगण्यात आले. पैशांची मागणी सतत वाढत असल्याने अकाऊंट एक्झिक्युटिव्हला संशय आला. त्यांनी थेट कंपनीच्या मालकाशी संपर्क साधला असता, त्यांच्या नावाने बनावट व्हॉट्सअॅप अकाउंट तयार करून फसवणूक केल्याचे उघड झाले. याप्रकरणी सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपासादरम्यान फसवणुकीतील काही रक्कम आयडीबीआय बँकेच्या एका खात्यात जमा झाल्याचे निष्पन्न झाले. हे खाते डोंबिवली येथील संचय पराग चव्हाण (वय २०) यांच्या नावावर असल्याचे आढळून आले. पोलिसांनी तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे त्याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने पनवेल येथे वास्तव्यास असलेले रमेश कुमार शंकरलालजी पुनीया (वय २४) आणि प्रकाश गोरधनराम पवार (वय २०) या दोघांना विविध बँक खाती उपलब्ध करून दिल्याची माहिती दिली. हे दोघे मूळचे जोधपूर, राजस्थान येथील रहिवासी आहेत. यानंतर सायबर पोलिसांनी पनवेल परिसरात शोधमोहीम राबवून रमेश पुनीया आणि प्रकाश पंवार यांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी सायबर फसवणुकीसाठी विविध बँक खात्यांचा वापर केल्याची कबुली दिली. तसेच फसवणुकीतून मिळालेल्या रकमेपैकी काही रक्कम चेक आणि एटीएमद्वारे काढून घेतल्याचेही तपासात समोर आले. या प्रकरणात संचय चव्हाण, रमेश पुनीया आणि प्रकाश पंवार यांचा सहभाग निष्पन्न झाल्याने तिघांनाही अटक करण्यात आली असून पुढील तपास पोलीस निरीक्षक दिगंबर गायकवाड करीत आहेत. ही कारवाई पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, सहपोलीस आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त सारंग आव्हाड, पोलीस उपायुक्त (गुन्हे) रोहिदास पवार आणि सहाय्यक पोलीस आयुक्त रोहिणी बानकर यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविकिरण नाळे यांच्या नेतृत्वाखालील सायबर पोलिसांच्या पथकाने केली. सायबर पोलिसांकडून या गुन्ह्याचा पुढील तपास सुरू असून, फसवणुकीतील इतर आरोपी आणि आर्थिक व्यवहारांशी संबंधित व्यक्तींचा शोध घेण्याचे काम सुरू आहे.

### अखिल भारतीय बैलगाडा संघटनेच्या संचालकपदी मनोज मोरे यांची निवड

**पिंपरी : दैनिक संध्या**

हवेली तालुक्यातील बैलगाडा शर्यतप्रेमींसाठी आनंदाची आणि अभिमानाची बातमी समोर आली आहे. अखिल भारतीय बैलगाडा संघटनेच्या हवेली तालुका संचालकपदी मनोज दत्तात्रय मोरे यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे तालुक्यातील बैलगाडा मालक, शेतकरी आणि शर्यतप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामीण महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचा अविभाज्य भाग असलेल्या बैलगाडा शर्यतींचे संवर्धन आणि जतन करण्यासाठी संघटना सातत्याने कार्यरत आहे. या पार्श्वभूमीवर मनोज मोरे यांच्यावर संघटनेच्या माध्यमातून बैलगाडा मालक, शेतकरी तसेच शर्यतप्रेमींच्या विविध प्रश्नांना न्याय देण्याची आणि त्यांच्या हक्कांसाठी प्रभावीपणे आवाज उठविण्याची महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. हवेली तालुक्याला अखिल भारतीय स्तरावर प्रतिनिधित्व मिळाल्याने ही निवड तालुक्यासाठी गौरवाची बाब मानली जात आहे. मनोज मोरे यांच्या निवडीमुळे बैलगाडा शर्यतींच्या विकासाला चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. दरम्यान, त्यांच्या निवडीबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवर, बैलगाडा मालक, शेतकरी आणि बैलगाडा शर्यतप्रेमींनी त्यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

### श्रमिकांच्या कष्टाने कामगार नगरीचा विकास – महापौर रवी लांडगे

**पिंपरी : दैनिक संध्या**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी सांगितले आहे की, “पृथ्वी ही शेषनागाच्या मस्तकावर तरलेली नसून ती कष्टकऱ्यांच्या, श्रमिकांच्या तळहातावर तरलेली आहे.” याप्रमाणे श्रमिकांच्या कष्टाने पिंपरी चिंचवड या औद्योगिक आणि कामगार नगरीचा विकास झाला आहे. कामगारांच्या न्याय हक्कासाठी लढणारे कामगार नेते इंटकचे प्रदेशाध्यक्ष डॉ. कैलास कदम आणि त्यांची हिंद कामगार संघटना देशभर कार्यरत आहे. या संघटनेच्या वर्धापन दिनानिमित्त दरवर्षी एका कामगाराला ‘हिंद रत्न कामगार पुरस्कार’ देण्यात येतो. यावर्षीचा पुरस्कार प्रथमच एका परिचारिका महिलेला देण्यात येत आहे. हा पुरस्कार म्हणजे सर्व परिचारिकांचा सन्मान आणि इतरांना प्रेरणादायी आहे. यावर्षीच्या पुरस्कारार्थी या नूतन भोसरी रुग्णालयातून स्वेच्छा निवृत्ती घेतलेल्या परिचारिका मीरा शिंदे यांचे मी अभिनंदन करतो. त्यांनी स्वाईन फ्लू आणि कोरोनाच्या काळात आपले कर्तव्य जबाबदारीने पार पाडले त्यांची निवड सार्थ आहे असे पिंपरी चिंचवडचे महापौर रवी लांडगे यांनी सांगितले. हिंद कामगार संघटनेच्या वर्धापन दिनानिमित्त मीरा शिंदे यांना ‘हिंद रत्न कामगार पुरस्कार २०२६’ महापौर रवी लांडगे यांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले. या पुरस्काराचे स्वरूप मानपत्र, स्मृतीचिन्ह, शाल, श्रीफळ, रोख रक्कम आहे. यावेळी इंटकचे प्रदेशाध्यक्ष व हिंद कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. कैलास कदम, माजी नगरसेवक सद्गुरु कदम, भारती घाग, निवृत्त पोलीस अधिकारी रघुनाथ मोरे, हाफिज पठान, आनंदराव फडतरे, यशवंत सुपेकर, शांताराम कदम, सचिन कदम, उत्तम गायकवाड, सारिका भिंगे आणि कामगार बंधू, भगिनी उपस्थित होते. डॉ. कैलास कदम यांनी स्वागत, प्रास्ताविक करताना सांगितले की, राष्ट्रीय मजदूर काँग्रेस (इंटक) ही स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापन झालेली कामगार संघटना आहे. इंटकचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. जी. संजीवा रेड्डी यांच्या नेतृत्वाखाली हिंद कामगार संघटना इंटक संलग्न आहे. हिंद कामगार संघटनेच्या वर्धापन दिनानिमित्त देण्यात येणारा पुरस्कार हा पिंपरी चिंचवडचे महापौर रवी लांडगे यांच्या हस्ते देत आहोत ते देखील एका कामगार संघटनेचे नेते आहेत. त्यांच्या हस्ते पुरस्कार देताना आम्हाला अभिमान वाटत आहे. मीरा शिंदे यांनी आपली नोकरी व कुटुंबाची जबाबदारी समर्थपणे सांभाळत एकूण पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत २७ वर्ष रुग्णसेवा केली. त्यांचा गौरव करताना आम्हाला अभिमान वाटत आहे असेही डॉ. कैलास कदम यांनी सांगितले. सत्काराला उत्तर देताना मीरा शिंदे म्हणाल्या की, महाराष्ट्र प्रदेश इंटकचे प्रदेशाध्यक्ष आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते डॉ. कैलास भाऊ कदम यांना मी शिंदे परिवाराच्या वतीने वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा देते.






# शोभीकरणाच्या झगमगाटात सुरक्षेचा बोजवारा

■ **पिंपरी (दै. संध्या)**

शहर सुशोभीकरणाच्या नावाखाली महापालिकेकडून शहर परिसरात विकासकामे करण्यात येत आहेत; मात्र ही कामे सुरु असताना दुसरीकडे नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण करणाऱ्या बाबींकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे वास्तव आहे. शहरातील विविध भागांत पाहणी केली असता, स्टॉर्म वॉटर लाईनचे चेंबर उघडेच, मॅनहोल, खचलेल्या भिंती, धोकादायक अवस्थेतील विद्युत पेट्या, झुकलेली झाडे तसेच रस्त्यावर कोसळलेले लोखंडी फलक अशा धोकादायक स्थितीमुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे; परंतु याकडे पाहण्यास संबंधित यंत्रणांचे दुर्लक्ष होत असल्याने त्यांना शहरवासीयांच्या जीवाचे मोल नसल्याचे अधोरेखित होत आहे. पालिकेकडून लावण्यात आलेले काही सूचना फलक तसेच अर्बन स्ट्रीट परिसरातील जाहिरातींचे मोठे लोखंडी पत्रे व फलक उखडून रस्त्यावर आडवे पडल्याचे दिसते. हे फलक वाहनचालक किंवा पादचाऱ्यांच्या अंगावर पडल्यास गंभीर दुखापत होऊ शकते. अशा फलकांची मजबुती तपासणे आणि धोकादायक फलक तातडीने हटविणे आवश्यक आहे.

शहरातील काही ठिकाणी झाडे एका बाजूला मोठ्या प्रमाणात झुकलेली दिसतात. जोरदार वारा किंवा वादळी पावसात ती रस्त्यावर, वाहनांवर अथवा नागरिकांवर कोसळण्याची शक्यता नाकारता येत नाही. वृक्ष विभागाने धोकादायक झाडांचे सर्वेक्षण करून छाटणी किंवा आवश्यक ती उपाययोजना करणे गरजेचे आहे.

रस्त्यालगतच्या काही विद्युत पेट्यांना योग्य प्रकारे कुलूपबंद नसल्याचे आढळले. पावसाळ्यात पाणी साचलेल्या परिसरात हा धोका अधिक गंभीर ठरू शकतो. संबंधित विभागाने अशा पेट्यांची तातडीने तपासणी करून सुरक्षित कव्हरिंग आणि लॉकिंग व्यवस्था करावी. काही ठिकाणी मॅनहोलची झाकणे गायब अथवा उघडी असल्याचे दिसते. गर्दीच्या रस्त्यावर किंवा पादचारी मार्गावर असा मॅनहोल म्हणजे थेट मृत्यूचा सापळाच.

तात्पुरते बॅरिकेडिंग न करता कायमस्वरूपी झाकण बसविणे आवश्यक आहे. नागरिकांच्या जीवाशी संबंधित अशा बाबींमध्ये तक्रार आल्यानंतर कारवाईपेक्षा पालिकेने ‘धोकादायक ठिकाणांचा विशेष सर्वेक्षण अभियान’ राबविणे आवश्यक आहे. प्रत्येक प्रभागात उघडी मॅनहोल, स्टॉर्म वॉटर लाईन, विद्युत पेट्या, धोकादायक भिंती, झुकलेली झाडे आणि फलक यांची यादी तयार करून त्यावर तातडीने उपाययोजना करावी.

धोकादायक ठिकाणी तत्काळ बॅरिकेडिंग, सूचना फलक, रात्री प्रकाश व्यवस्था आणि संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करणे गरजेचे आहे.

अपघात होण्यापूर्वी धोका ओळखून तो दूर करणे हीच प्रशासनाची खरी जबाबदारी आहे.

## अप्पू घर अम्युजमेंट पार्कला मुदतवाढ देऊ नये

### शत्रुघ्न काटे यांचे महापालिका आयुक्तांना निवेदन

**पिंपरी(दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या अप्पू घर अम्युजमेंट पार्क प्रकल्पाला मुदतवाढ देण्याच्या प्रस्तावावर भाजपचे शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी आक्षेप नोंदवला आहे. याबाबत त्यांनी महापालिका आयुक्तांना निवेदन देऊन प्रकल्पाची संपूर्ण माहिती सार्वजनिक केल्याशिवाय कोणतीही मुदतवाढ किंवा मान्यता देऊ नये, अशी मागणी केली आहे.

शत्रुघ्न काटे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड शहरातील अप्पू घर हे अनेक वर्षांपासून नागरिकांचे आकर्षण असलेले पर्यटन व मनोरंजन केंद्र आहे. कोरोना काळात प्रकल्प बंद राहिल्यामुळे त्याच्या मुदतवाढीचा प्रस्ताव महापालिकेकडे विचाराधीन आहे. मात्र, मुदतवाढ देताना प्रकल्पात नेमके कोणते नवीन उपक्रम राबविण्यात येणार आहेत, याची माहिती नागरिकांसमोर ठेवणे आवश्यक आहे. प्रस्तावित प्रकल्पात कोणत्या प्रकारची खेळणी, साहसी उपक्रम, वॉटर पार्क सुविधा किंवा इतर मनोरंजनात्मक साधने उभारली जाणार आहेत, याबाबत स्पष्टता नसल्याचे त्यांनी नमूद केले आहे. तसेच प्रकल्पाचे नियोजन करणारे सल्लागार कोण आहेत, सुरक्षा निकषांची अंमलबजावणी कशी होणार,





नागरिकांच्या सुरक्षेची जबाबदारी कोण घेणार, कोणत्या नोंदणीकृत कंपन्यांची उत्पादने वापरली जाणार आणि आवश्यक शासकीय परवानग्यांचे नियोजन काय आहे, असे अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. या सर्व बाबींचे सादरीकरण शहरातील प्रमुख नेते, विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी आणि संबंधित तज्ज्ञांसमोर करण्यात यावे, अशी मागणीही त्यांनी केली आहे. तसेच मनोरंजन प्रकल्पांच्या क्षेत्रातील तज्ज्ञ आर्किटेक्ट, डिझायनर आणि अनुभवी संस्थांच्या अधिकृत सल्ल्याशिवाय कोणताही निर्णय घेऊ नये, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

प्रकल्पाची संपूर्ण अधिकृत माहिती उपलब्ध होईपर्यंत अप्पू घर अम्युजमेंट पार्कला कोणत्याही प्रकारची मुदतवाढ देऊ नये आणि सर्व बाबींची खातरजमा झाल्यानंतरच पुढील कार्यवाही करावी, अशी मागणी शत्रुघ्न काटे यांनी महापालिका प्रशासनाकडे केली आहे.

## दरवर्षी ‘विचार प्रबोधन पर्व’ आयोजित करा : ऋषिकेश कानवटे

■ **पिंपरी (दै. संध्या)**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे सत्य, अहिंसा, स्वच्छता आणि सामाजिक समतेचे विचार आजच्या आधुनिक युगातही समाजाला मार्गदर्शक आहेत. हे विचार युवा पिढीपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने दरवर्षी २ ऑक्टोबर रोजी ‘महात्मा गांधी विचार प्रबोधन पर्व’ आयोजित करावे, अशी मागणी आम आदमी पार्टी युवक आघाडी महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष ऋषिकेश कानवटे यांनी पालिका आयुक्तांकडे पत्राद्वारे केली आहे.

पिंपरी-चिंचवड हे केवळ औद्योगिक शहर नसून सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक क्षेत्राचेही महत्त्वाचे केंद्र आहे. शहरातील विद्यार्थी, युवक आणि नागरिकांमध्ये संविधानिक मूल्ये तसेच गांधीजींच्या विचारांची जाणीव अधिक दृढ व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम दरवर्षी आयोजित करण्याची आवश्यकता असल्याचे कानवटे यांनी पत्रात नमूद केले आहे. या ‘विचार प्रबोधन पर्वा’ अंतर्गत गांधीवादी तत्त्वज्ञानावर व्याख्यानमाला, परिसंवाद आणि चर्चासत्रे आयोजित करण्याची सूचना करण्यात आली आहे. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये निबंध, वक्तृत्व, चित्रकला आणि प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यासोबतच ‘गांधी विचार आणि आजचा आधुनिक समाज’ या विषयावर युवकांसाठी विशेष चर्चासत्रांचे आयोजन करण्याचा प्रस्ताव आहे.

याशिवाय स्वच्छता, व्यसनमुक्ती, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक सलोखा याबाबत जनजागृती मोहिमा राबविणे, गांधीजींच्या जीवनाशी संबंधित दुर्मिळ छायाचित्रे व साहित्याचे प्रदर्शन भरविणे, तसेच ‘गांधी विचार पदयात्रा’ आणि जनजागृती रॅली आयोजित करण्याची मागणी करण्यात आली आहे. सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा ‘समाजरत्न’ पुरस्काराने सन्मान करण्याचेही प्रस्तावित करण्यात आले आहे. या संकल्पनेस तत्त्वतः मान्यता देऊन महानगरपालिकेच्या वार्षिक अंदाजपत्रकात आवश्यक निधीची तरतूद करावी आणि संबंधित विभागांना तातडीने आवश्यक निर्देश द्यावेत, अशी आग्रही मागणी ऋषिकेश कानवटे यांनी केली आहे.

# कामकाजाचा आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी घेतला आढावा

### गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर रस्ते, पदपथ, स्वच्छता, विद्युत सुरक्षा आणि विसर्जन व्यवस्थेला प्राधान्य देण्याचे दिले निर्देश

■ **पिंपरी (दै. संध्या)**

गणेशोत्सवाच्या अनुषंगाने विद्युत तारा व जोडण्यांची सुरक्षितता तपासून धोकादायक जोडण्यांवर संबंधित यंत्रणांच्या समन्वयाने कार्यवाही करावी. कृत्रिम विसर्जन हौदांची तयारी, स्वच्छता, प्रकाश व्यवस्था आणि सुरक्षा व्यवस्था वेळेत पूर्ण करावी. तसेच प्रत्येक क्षेत्रीय अधिकाऱ्याने आपला प्रभाग स्वच्छ, सुंदर आणि नागरिकांसाठी सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी प्रभावीपणे पार पाडावी. पदपथ पादचाऱ्यांसाठी मोकळे करावेत, सार्वजनिक स्वच्छतागृहांची नियमित स्वच्छता, झाडांची छाटणी आणि रस्त्यांची दुरुस्ती वेळेत पूर्ण करावी. बीट निरीक्षकांमार्फत अनधिकृत बांधकामांवर बारकाईने लक्ष



ठेवून तातडीने निष्कासनाची कार्यवाही करावी, अशा सूचना महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिल्या. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनामध्ये आगामी गणेशोत्सव तसेच शहरातील विविध नागरी सुविधांच्या अनुषंगाने आयुक्त डॉ.सूर्यवंशी यांनी संबंधित विभागप्रमुख व अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेतली. यावेळी शहरातील अतिक्रमणे, अनधिकृत बांधकामे, स्वच्छता व्यवस्था, रस्ते व पदपथांची स्थिती, विद्युत सुरक्षाव्यवस्था, उद्याने, गणेशमूर्ती विसर्जनासाठी कृत्रिम विसर्जन हौदांची तयारी तसेच नागरिकांच्या तक्रारींचा निपटारा आदी विषयांचा आढावा घेण्यात आला. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देताना आयुक्त बोलत होते.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, विक्रांत बगाडे, तृप्ती सांडभोर, सह आयुक्त मनोज लोणकर, शहर अभियंता मनोज सेठिया, सह शहर अभियंता अजय सूर्यवंशी, प्रेरणा सिनकर, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, उपआयुक्त सचिन पवार, सीताराम बहुरे, राजेश आगळे, डॉ. प्रदीप ठेंगल, अण्णा बोदडे, व्यंकटेश दुर्वास, संदीप खोत, पंकज पाटील, मुख्य उद्यान अधीक्षक महेश गारगोटे, सहाय्यक आयुक्त अमित पंडित, तानाजी नरळे, क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील, अश्विनी गायकवाड, निवेदिता घार्गे, अजिंक्य येळे, पूजा दूधनाळे, परशुराम वाघमोडे, गोरक्षनाथ लिम्हण, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड यांच्यासह स्थापत्य, विद्युत, पर्यावरण आदी विभागांचे कार्यकारी अभियंता आणि कर्मचारी उपस्थित होते.

गणेशमूर्ती विसर्जनासाठी शहरातील कृत्रिम विसर्जन हौदांची आवश्यक तयारी वेळेत पूर्ण करावी.

## थोडक्यात पण महत्वाचे




### ग्रामपंचायत-रोटरीच्या सहकार्यातून स्वच्छतागृहाची उभारणी

**नारायणगाव : दैनिक संध्या**

जुन्नर तालुक्यातील वडगाव आनंद येथे ग्रामस्थांच्या आरोग्य व स्वच्छतेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या नूतन स्वच्छतागृहाचे लोकार्पण सोहळा मंगळवारी मोठ्या उत्साहात पार पडला. रोटरी क्लब ऑफ आळेफाटा सेंट्रल आणि ग्रामपंचायत वडगाव आनंद यांच्या संयुक्त प्रयत्नातून व सहकार्यातून या आधुनिक स्वच्छतागृहाची उभारणी करण्यात आली आहे. गावातील सार्वजनिक स्वच्छता आणि नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी स्थानिक प्रशासन आणि सामाजिक संस्थांनी एकत्र येऊन काम केल्याचे उत्तम उदाहरण या उपक्रमातून समोर आले आहे. स्वच्छता ही केवळ प्रशासनाची एकट्याची जबाबदारी नसून ती एक सामायिक सामाजिक चळवळ आहे. ग्रामपंचायत आणि स्थानिक नागरिकांच्या सक्रिय सहभागातूनच एक स्वच्छ, सुंदर आणि निरोगी गाव निर्मिती शक्य होऊ शकते, असा आशावाद याप्रसंगी व्यक्त करण्यात आला. या लोकार्पण सोहळ्याला रोटरी क्लब ऑफ आळेफाटा सेंट्रलचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यामध्ये रोटरी क्लब ऑफ आळेफाटा सेंट्रलचे प्रांतपाल नितीन ढमाले, संस्थापक महावीर पोखरणा, माजी अध्यक्षा विद्या जाधव, अध्यक्ष वेदप्रकाश कणसे, विमलेश गांधी आदी पदाधिकारी या कार्यक्रमात प्रामुख्याने उपस्थित होते. स्वच्छतागृहाच्या उभारणीसाठी विशेष योगदान दिल्याबद्दल ज्ञानेश जाधव यांचे यावेळी विशेष आभार मानण्यात आले. तसेच या कार्यक्रमाला लोकनियुक्त सरपंच रेलिका जाधव, उपसरपंच संतोष पाटीर, सामाजिक कार्यकर्ते डी. बी. नाना वाळुंज, ऋषिकेश गडगे, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष तानाजी देवकर, माजी उपसरपंच गणेश भुजबळ यांसह ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.या सुसज्ज स्वच्छतागृहामुळे गावातील नागरिक, तसेच बाहेरून येणाऱ्या प्रवाशांची मोठी सोय होणार असून, ग्रामस्थांनी या संयुक्त उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

### बेपत्ता तरुण शेतकऱ्याचा जंगलात मृतदेह आढळला

**नारायणगाव : दैनिक संध्या**

जुन्नर तालुक्यातील ३४ वर्षीय तरुण शेतकरी संदीप सुदाम शिंदे यांचा आबाटेक येथील जंगलात झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत मृतदेह आढळल्याची दुर्दैवी घटना समोर आली आहे. ३१ ऑगस्टपासून ते बेपत्ता होते आणि टोमॅटो विक्रीचे पैसे आणण्यासाठी गेलेल्या संदीप यांचा असा अचानक अंत झाल्याने आणे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. जुन्नर तालुक्यातील आणे गावातील रहिवासी असलेले ३४ वर्षीय संदीप सुदाम शिंदे हे ३१ ऑगस्ट रोजी दुपारी टोमॅटो विक्रीचे पैसे आणण्यासाठी आपल्या दुचाकीवरून नारायणगाव येथे गेले होते. त्यानंतर सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास त्यांचे त्यांच्या वडिलांशी फोनवर संभाषण झाले होते. मात्र, या संभाषणानंतर काही वेळातच त्यांचा मोबाईल फोन अचानक बंद झाला. संध्याकाळ उलटूनही घरी न परतल्यामुळे आणि संपर्क होऊ न शकल्यामुळे कुटुंबीयांची चिंता वाढली.दुसऱ्या दिवशी, १ सप्टेंबर रोजी आळे-बोरी रस्त्यावरील बोरी बुद्रुक हद्दीत संदीप यांची दुचाकी, त्यांची चावी, मोबाईल आणि पाकीट मिळाले. स्वतःची वाहने आणि साहित्य रस्त्यावर मिळाल्याने कुटुंबीयांची धाकधूक अधिक वाढली आणि त्यांनी आजूबाजूच्या परिसरात तातडीने त्यांचा शोध घेण्यास सुरुवात केली. तसेच, या प्रकरणी आळेफाटा पोलीस ठाण्यात ते बेपत्ता असल्याची अधिकृत तक्रारही दाखल करण्यात आली होती. संदीप बेपत्ता झाल्यानंतर कुटुंबीय आणि स्थानिक नागरिकांकडून त्याचा शोध घेण्यात आला. दरम्यान, आबाटेक परिसरातील जंगलात काही नागरिक जनावरे चारण्यासाठी गेले असता, त्यांना एका झाडाला गळफास घेतलेल्या स्थितीत एक मृतदेह आढळून आला. ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली आणि तातडीने आळेफाटा पोलिसांना याची माहिती दिली. माहिती मिळताच आळेफाटा पोलीस त्वरित घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी मृतदेहाची ओळख पटवली असता तो बेपत्ता असलेले संदीप सुदाम शिंदे यांचाच असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन पुढील तपास व शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवला आहे. संदीप शिंदे यांच्यासारख्या तरुण शेतकऱ्याने टोमॅटोचे पैसे आणायला गेल्यावर असे टोकाचे पाऊल का उचलले, यामागे नेमके काय कारण होते, याचा अद्याप कोणताही उलगडा झालेला नाही. आर्थिक अडचण, कौटुंबिक किंवा इतर काही तणाव होता का, या सर्व बाजूंनी आळेफाटा पोलीस सध्या सखोल तपास करत आहेत. या दुर्दैवी घटनेमुळे आणे आणि जुन्नर परिसरात शोककळा पसरली असून एका होतकरू तरुण शेतकऱ्याच्या जाण्याने हळहळ व्यक्त होत आहे.




### ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट शारदानगर येथे राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा

**बारामती : दैनिक संध्या**

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट,शारदानगर, बारामती येथे विविध क्रीडा उपक्रमांचे आयोजन करून राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात वरिष्ठ क्रीडा प्रशिक्षक श्री.राजेंद्र करणे सर यांच्या हस्ते भारताचे महान हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.यावेळी उपस्थित मान्यवरांनी मेजर ध्यानचंद यांच्या क्रीडा क्षेत्रातील अतुलनीय योगदानाचे स्मरण करून त्यांना अभिवादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.श्री.रणजीत देवकर सर यांनी केले.यावेळी हॉकी खेळाडू श्रावणी कदम व निसर्गा कांबळे हिने मेजर ध्यानचंद यांच्या कारकिर्दीविषयी व भारतीय हॉकीसाठी त्यांनी दिलेल्या योगदानाविषयी उपस्थित खेळाडूंना थोडक्यात माहिती दिली. राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त विद्यार्थ्यांना खेळाचे महत्त्व, शारीरिक तंदुरुस्ती,शिस्त,सांघिक भावना,खेळाडूवृत्ती आणि क्रीडाभावना याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.खेळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासोबतच आरोग्यदायी आणि शिस्तबद्ध जीवनशैली घडविण्याचे महत्त्व यावेळी अधोरेखित करण्यात आले. या कार्यक्रमास संस्थेचे मा. चेअरमन श्री.राजेंद्र पवार व विश्वस्त मा. सौ.सुनंदा पवार यांचे मार्गदर्शन लाभले तसेच सर्व विभागातील प्राचार्य,विभाग प्रमुख, क्रीडा शिक्षक,प्रशिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये खेळाविषयीची आवड,उत्साह आणि क्रीडाभावना अधिक दृढ करण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

# नीरा येथे 'ज्युबिलंट प्रतिभा पुरस्कार २०२६'चा शुभारंभ

**२५ गुणवंत विद्यार्थ्यांना संगणकीय फलकाची भेट**

■ नीरा (दै. संध्या)

ज्युबिलंट भारतीया फाउंडेशन आणि ज्युबिलंट इंग्रेव्हिया लिमिटेड, निरा यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेला चालना देणाऱ्या 'ज्युबिलंट प्रतिभा पुरस्कार २०२६' या उपक्रमाचा नीरा येथे शुभारंभ करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे, डिजिटल अर्थात संगणकीय शिक्षणाला प्रोत्साहन देणे आणि गुणवंत विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी आवश्यक साधने उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या उपक्रमांतर्गत इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या स्पर्धात्मक परीक्षेतून २५ गुणवंत विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. श्री बाबालाल साहेबराव काकडे देशमुख विद्यालय, निंबुत, माध्यमिक विद्यालय, खंडोबाचीवाडी-गडदरवाडी, श्री ज्योतिर्लिंग हायस्कूल, गुळुंचे आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पिंपरे खुर्द या चार शाळांमधील विद्यार्थ्यांनी या परीक्षेत उत्स्फूर्त सहभाग घेतला.

निवड झालेल्या प्रत्येक विद्यार्थ्याला लेनोवो कंपनीचा संगणकीय फलक (टॅबलेट) देण्यात आला आहे. त्यामध्ये 'माइंडस्पार्क' हे कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित अनुकूलित शिक्षण व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक गरजेनुसार वैयक्तिकृत शिक्षणाचा अनुभव मिळणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे ज्ञान, आकलनक्षमता आणि शैक्षणिक कामगिरी सुधारण्यास मदत होणार आहे.



या उपक्रमाचा लाभ निवड झालेल्या विद्यार्थ्यांना पुढील तीन वर्षे मिळणार आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचे नियमित मूल्यमापन करण्यासाठी पूर्वमूल्यांकन आणि पश्चातमूल्यांकन घेण्यात येणार असून, त्याद्वारे या उपक्रमाचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर झालेला परिणाम मोजला जाणार आहे. कार्यक्रमास ज्युबिलंट इंग्रेव्हिया लिमिटेड, निराचे स्थळप्रमुख डॉ. योगेश कोपारकर उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी संगणकीय शिक्षणाच्या माध्यमातून उपलब्ध होणाऱ्या संधींचा योग्य उपयोग करून शैक्षणिक प्रगती साधण्याचे आवाहन केले. यावेळी पर्यावरण, आरोग्य व सुरक्षितता विभागाचे प्रमुख विनोद होंगेंकर तसेच अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख विनोद घाटे उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या उपक्रमाच्या आयोजन व समन्वयाची जबाबदारी करण सावळकर, स्मिता काकडे, रेश्मा गायकवाड आणि मनोहर सूर्यवंशी यांनी पार पाडली. संबंधित शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी तसेच ज्युबिलंट भारतीया फाउंडेशनच्या पथकाच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला. गुणवंत विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणाची साधने उपलब्ध करून देत त्यांच्या शैक्षणिक क्षमतेला योग्य दिशा देणारा 'ज्युबिलंट प्रतिभा पुरस्कार २०२६' हा उपक्रम भविष्यातील संधींसाठी विद्यार्थ्यांना सक्षम करणारा महत्त्वपूर्ण उपक्रम ठरणार आहे.

## घोडेगाव पोलिसांची अवैध गांजा विक्रीवर धडक कारवाई

■ घोडेगाव (दै. संध्या)

■ १.०७ लाखांचा मुद्देमाल जप्त, आरोपीला ५ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी

घोडेगाव पोलीस स्टेशनच्या हद्दीत बेकायदेशीररीत्या गांजा बाळगून त्याची विक्री करण्याच्या तयारीत असलेल्या चास (ता. आंबेगाव) येथील संपत गणपत शिंदे (चास) आरोपीला मुद्देमालासह रंगेहात पकडण्यात स्थानिक गुन्हे शाखा व घोडेगाव पोलीस स्टेशन ला यश आले आहे. या कारवाईत पोलिसांनी १ लाख ७ हजार ६०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करून आरोपीला अटक करण्यात आली. घोडेगाव न्यायालयाने पाच सप्टेंबर पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. याबाबत सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर पवार म्हणाले, दिनांक ०१ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री ११ ते दिनांक ०२ सप्टेंबर २०२६ रोजी पहाटे २ वाजेच्या सुमारास चास-नारोडी मार्गावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने व घोडेगाव पोलीस स्टेशन पथक यांनी सापळा रचून ही कारवाई केली. आरोपी प्रतिबंधित असलेला गांजा विक्री करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगून मोटारसायकलसह थांबला असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती. पोलिसांनी आरोपीकडून एकूण १,०७,६०० चा माल व इतर जप्त केले. यात मोटारसायकल १५,००० रुपये किमतीची एक लाल-काळ्या रंगाची पॅशन प्रो (क्र. MH 14 F 3105 ) गांजा ८६,५०० रुपये किमतीचा प्लास्टिक पिशवीत भरलेला सुट्टा गांजा (वजन १ किलो ७३० ग्रॅम). १०० रुपये किमतीचे ४ प्लास्टिक पाऊचमधील गांजा (निव्वळ वजन २० ग्रॅम). इतर साहित्य: स्टार शाईन जिप्सम (STAR SHINE GYPSUM) लिहिलेले पांढऱ्या रंगाचे रिकामे पोते. सदर कारवाईत आरोपीला अटक करण्यात आली.

## स्क्रॅप मटेरियलपासून एस. बी. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी साकारली 'गरुडा' इलेक्ट्रिक थ्री-व्हीलर

■ भिगवण (दै. संध्या)

वनगळी (इंदापूर) येथील एस. बी. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या अंतिम वर्षातील मेकॅनिकल अभियांत्रिकी विभागाच्या विद्यार्थ्यांनी स्क्रॅप मटेरियलचा प्रभावी वापर करून 'गरुडा' ही बॅटरीवर चालणारी इलेक्ट्रिक थ्री-व्हीलर यशस्वीरित्या विकसित केली आहे. पर्यावरणपूरक वाहतुकीला चालना देण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आलेली ही इलेक्ट्रिक थ्री-व्हीलर एकदा पूर्ण चार्ज केल्यानंतर सुमारे ६० किलोमीटर अंतर पार करू शकते. गाडीची बॅटरी पूर्ण चार्ज होण्यासाठी 4 ते 5 तासांचा कालावधी लागतो. तसेच या वाहनामध्ये रिव्हर्स चार्जिंग सुविधा, जीपीएस ट्रॅकिंग प्रणाली आणि सुरक्षेसाठी कॅमेरा बसविण्यात आला आहे. त्यामुळे वाहनाचा मागोवा घेणे तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने देखरेख करणे अधिक सुलभ होते.या वाहनाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्याची निर्मिती प्रामुख्याने स्क्रॅप मटेरियलपासून करण्यात आली आहे. त्यामुळे कमी खर्चात, पर्यावरणपूरक आणि उपयुक्त तंत्रज्ञान विकसित करण्याचा विद्यार्थ्यांचा प्रयत्न यशस्वी ठरला आहे. ही गाडी ताशी सुमारे 50 किलोमीटर वेगाने धावू शकते.




या प्रकल्पासाठी मेकॅनिकल विभागाचे विभागप्रमुख डॉ. मयूर जगताप यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच या प्रकल्पाच्या निर्मितीसाठी महाविद्यालय व्यवस्थापनाने बॅटरी प्रायोजित करून विद्यार्थ्यांना महत्त्वपूर्ण सहकार्य केले. बॅटरीवर चालणारी इलेक्ट्रिक थ्री-व्हीलर बनविणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.टी शिरकांडे, अकॅडमीक डिन डॉ. व्ही एस नलवडे, आणि सर्व विभागाचे विभाग प्रमुख यांनी सत्कार करून आभार व्यक्त केले.

या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. हर्षवर्धन पाटील सचिव. भाग्यश्री पाटील, संस्थेच्या उपाध्यक्षा अंकिता पाटील-ठाकरे, विश्वस्थ राजवर्धन पाटील यांनी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक प्राध्यापकांचे अभिनंदन करून त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## बारामती नगरपरिषद कामगार सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी श्री. फिरोज महामुद आत्तार

**व्हाईस चेअरमन पदी श्री. उमेश दिलीप लालबिगे यांची बिनविरोध निवड**

■ बारामती (दै. संध्या)

बारामती नगरपरिषद कामगार सहकारी पतसंस्था मर्यादित,बारामती या संस्थेच्या चेअरमन व व्हाईस चेअरमन पदाची निवडणूक प्रक्रिया अत्यंत उत्साहात आणि सौहार्दपूर्ण वातावरणात पार पडली. यामध्ये संस्थेच्या चेअरमन पदी श्री.फिरोज महामूद आत्तार तर व्हाईस चेअरमनपदी श्री. उमेश दिलीप लालबिगे यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली आहे.




संस्थेची निवडणूक प्रक्रिया सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था, बारामती तथा अध्यासी अधिकारी श्री.प्रमोद पं.दुरगुडे यांच्या अध्यक्षतेखाली व मार्गदर्शनाखाली सहाय्यक निबंधक कार्यालयात सुरळीत पार पडली.१८ एप्रिल १९७९ रोजी स्थापन झालेल्या या पतसंस्थेने सभासदांच्या विश्वासाच्या बळावर यशस्वी वाटचाल केली आहे.३१ मार्च २०२६ अखेर संस्थेचे एकूण भाग भांडवल रुपये ३,४१,६५,००० असून,सभासदांना कर्ज रुपये ५,६८,४२,३५३ इतके वाटप करण्यात आले आहे.संस्था आर्थिकदृष्ट्या अत्यंत मजबूत स्थितीत असून कामगारांच्या हितासाठी कटीबद्ध आहे.या निवडणूक प्रसंगी संस्थेचे माजी चेअरमन तथा बारामती नगर परिषदेचे नगरसेवक श्री.राजेंद्र (नाना) सोनवणे,संस्थेचे सर्व संचालक मंडळ,सचिव व लिपिक उपस्थित होते. नवनिर्वाचित चेअरमन श्री.फिरोज आत्तार व व्हाईस चेअरमन श्री.उमेश लालबिगे यांनी सर्व संचालक मंडळ,माजी पदाधिकारी आणि सभासदांचे आभार मानले.संस्थेची हीच उज्वल परंपरा पुढे चालू ठेवून सभासदांच्या सर्वांगीण विकासासाठी व हितासाठी कटीबद्ध राहू असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. निवडीनंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते नूतन पदाधिकाऱ्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला व अभिनंदन करण्यात आले.

## 'माऊलींच्या साहित्यामध्ये विश्वकल्याणाचा विचार' – प्रमोद महाराज जगताप

■ आळंदी (दै. संध्या)

ज्ञानेश्वरी हा केवळ भगवद्गीतेचा भावार्थ नसून, मानवी जीवनाला योग्य दिशा देणारा जीवनग्रंथ आहे. ज्ञान, भक्ती आणि कर्म यांचा सुंदर समन्वय ज्ञानेश्वरीतून साधण्यात आला आहे. माणसाने अहंकाराचा त्याग करून परमात्म्याशी एकरूप होण्याचा मार्ग माऊलींनी दाखविला आहे, असे प्रतिपादन प्रवचनकार प्रमोद महाराज जगताप यांनी केले. संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या जन्मोत्सवानिमित्त संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरात प्रवचनरूपी सेवा भक्तिमय वातावरणात पार पडली. यावेळी प्रमोद महाराज जगताप यांनी सुश्राव्य वाणीतून संत ज्ञानेश्वर महाराजांचे जीवनकार्य, साहित्य आणि व्यापक ज्ञानविश्व यांचे विवेचन केले. माऊलींच्या विचारांचा केंद्रबिंदू हा केवळ अध्यात्म नसून मानवाच्या सर्वांगीण कल्याणाचा विचार असल्याचे त्यांनी सांगितले. संत ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरीतून आत्मज्ञान, अद्वैत आणि चैतन्यस्वरूपाची अनुभूती मांडली आहे. बाह्य जगापेक्षा अंतर्मनातील आत्मतत्त्व ओळखणे आणि त्यातून जीवनाची खरी अनुभूती घेणे, हा अमृतानुभवाचा गाभा आहे. तसेच हरिपाठातून नामस्मरण, भक्ती, सदाचार आणि ईश्वराशी अखंड नाते जोडण्याचा सहज-सोपा मार्ग समाजाला मिळाला, असेही जगताप यांनी स्पष्ट केले.



माऊलींच्या साहित्यात प्रेम, करुणा, समता, बंधुभाव आणि विश्वकल्याणाचा व्यापक विचार आहे. त्यामुळे त्यांचे साहित्य केवळ वाचण्यापुरते मर्यादित न ठेवता त्यातील विचार दैनंदिन जीवनात आचरणात आणणे, हीच संत ज्ञानेश्वर महाराजांच्या चरणी खरी सेवा आहे. माऊलींच्या विचारांचा जागर समाजात सातत्याने झाला पाहिजे, असे आवाहनही प्रमोद महाराज जगताप यांनी केले. यावेळी मंदिर समितीचे विश्वस्त चैतन्य महाराज कबीरबुवा व पुरुषोत्तम महाराज पाटील उपस्थित होते.

# पुणे जिल्हा गणित अध्यापक संघाचा प्राचार्य नंदकुमार सागर यांना ठाम पाठिंबा

**शिक्षकांच्या हक्कासाठी लढणाऱ्या नेतृत्वाला साथ देण्याचा एकमताने निर्णय**

■ जेजुरी (दै. संध्या)

पुणे जिल्हा गणित अध्यापक संघाची नुकतीच वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहपूर्ण व सकारात्मक वातावरणात संपन्न झाली. या सभेत संघाच्या विविध शैक्षणिक उपक्रमांचा आढावा घेण्याबरोबरच गणित अध्यापकांच्या विविध प्रश्नांवर, शिक्षण क्षेत्रातील सद्यस्थितीवर तसेच शिक्षक व विद्यार्थ्यांच्या हिताच्या विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी पुणे विभाग शिक्षक आमदार निवडणुकीसाठी प्राचार्य नंदकुमार सागर यांना पाठिंबा देण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.



सभेला महाराष्ट्र गणित अध्यापक महामंडळाचे विद्या समिती प्रमुख देविदास शिंदे, पुणे जिल्हा गणित अध्यापक संघाचे सल्लागार भारत काळे, अध्यक्ष कल्याण कडेकर, सचिव सचिन धनवट, कार्याध्यक्ष संदीप लोणकर, कोषाध्यक्ष योगेश माळशिरसकर, उपाध्यक्ष जितेंद्र त्रिवेदी, सहसचिव मारुती मांढरे, तसेच भगवान पांडेकर, अंगद शिंदे, काशिनाथ पोखरकर, शरद जाधवर, दिलीप जगताप यांच्यासह पुणे जिल्ह्यातील अनेक गणित अध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुणे जिल्हा गणित अध्यापक संघाच्या स्थापनेच्या प्रक्रियेत पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघाच्या माध्यमातून प्राचार्य नंदकुमार सागर यांनी दिलेली भक्कम साथ आणि सहकार्य यावेळी विशेषत्वाने अधोरेखित करण्यात आले. गणित अध्यापकांना संघटित व्यासपीठ मिळावे, त्यांच्या प्रश्नांना योग्य दिशा मिळावी आणि शिक्षकांच्या विविध मागण्यांना प्रभावीपणे वाचा फुटावी, यासाठी त्यांनी केलेल्या सहकार्याची उपस्थितांनी कृतज्ञतापूर्वक नोंद घेतली. शिक्षकांच्या पाठीशी कायम खंबीरपणे उभे राहणारे नेतृत्व म्हणून प्राचार्य नंदकुमार सागर यांची शिक्षकांमध्ये असलेली प्रतिमा सभेत व्यक्त करण्यात आली. शिक्षण क्षेत्रातील विविध समस्या आणि शिक्षकांच्या न्याय्य मागण्या शासन स्तरावर मांडून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी अहोरात्र झटणारा शिक्षकांचा हक्काचा माणूस म्हणून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

शिक्षकांच्या प्रश्नांना केवळ सभागृहापुरते मर्यादित न ठेवता ते शासन दरबारी प्रभावीपणे मांडणे, शिक्षकांच्या हक्कांसाठी सातत्याने पाठपुरावा करणे आणि शिक्षण क्षेत्रातील सकारात्मक बदलांसाठी प्रयत्नशील राहणे, ही प्राचार्य नंदकुमार सागर यांच्या कार्याची वैशिष्ट्ये असल्याची भावना यावेळी उपस्थित गणित अध्यापकांनी व्यक्त केली. याच पार्श्वभूमीवर येत्या पुणे विभाग शिक्षक आमदार निवडणुकीत प्राचार्य नंदकुमार सागर यांच्या उमेदवारीला पुणे जिल्हा गणित अध्यापक संघाचा ठाम व एकमताचा पाठिंबा राहील, असा स्पष्ट निर्णय वार्षिक सर्वसाधारण सभेत घेण्यात आला. उपस्थित सदस्यांनी या ठरावाला एकमुखाने अनुमोदन देत शिक्षकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने कार्य करणाऱ्या नेतृत्वाला साथ देण्याचा निर्धार व्यक्त केला. प्राचार्य नंदकुमार सागर यांना दिलेला हा पाठिंबा म्हणजे केवळ निवडणुकीपुरता निर्णय नसून शिक्षकांच्या हक्कांसाठी, त्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी आणि शिक्षण क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी संघर्ष करणाऱ्या नेतृत्वाला दिलेली संघटित साथ असल्याचे मत सभेत व्यक्त करण्यात आले. शिक्षकांचे प्रश्न शासन दरबारी प्रभावीपणे मांडणारा, शिक्षकांच्या अडचणी समजून घेणारा आणि त्यांच्या हक्कांसाठी सातत्याने लढणारा प्रतिनिधी विधानपरिषदेत असणे आवश्यक आहे. या भूमिकेतून पुणे जिल्हा गणित अध्यापक संघाने प्राचार्य नंदकुमार सागर यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचा आणि त्यांच्या विजयासाठी संघटितपणे प्रयत्न करण्याचा निर्धार व्यक्त केला.

## थोडक्यात पण महत्वाचे



### यवत पोलीसांची कामगिरी मोटार सायकल चोरी करणारा आरोपी जेरबंद

**कोरेगावमुळ : दैनिक संध्या**

दिनांक ०९/०७/२०२६ रोजी सायंकाळी ०५:३० वा चे सुमारास मौजे बोरीपार्धी ता. दौंड जि. पुणे गावचे हददीत केडगाव रेल्वे स्टेशन समोरील मोकळ्या जागेत एक काळ्या रंगाची हिरो कंपनीची स्पेंल्डर आय स्मार्ट मॉडेलची मोटार सायकल चोरीस गेली असल्यावरुन यवत पोलीस ठाणे येथे गु.र.नं ६९९/२०२६ भा.न्या.सं ३०३(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयाचा तात्काळ तपास करण्यासाठी तपास पथक तयार करुन अज्ञात आरोपीचा शोध घणेकरिता रवाना करण्यात आले. सदर गुन्हयातील सी.सी.टी.व्ही. फुटेज व गोपनीय बातमीदारामार्फत शोध घेतला असता सदर मोटर सायकल ची चोरी ही नामे बालाजी पांडुरंग लोखंडे राहणार मुरुड तालुका लातूर जिल्हा लातूर याने केली असल्याची खात्रीशिर माहिती प्राप्त झाल्याने त्यास ताब्यात घेवुन गुन्हयाचे अनुषंगाने चौकशी केली असता त्याने सदरचा गुन्हा केला असल्याची कबुली दिली. त्यानंतर त्यास अटक करुन गुन्ह्याच्या तपासादरम्यान अटक आरोपीकडुन यवत पोलीस स्टेशन गु.र.नं ६९९/२०२६ भा न्या सं ३०३(२) या गुन्ह्यातील चोरीस गेलेली मोटारसायकल तसेच वेगवेगळ्या कंम्पनीच्या अशा एकूण ७ मोटारसायकल त्यांची एकुण किंमत अंदाजे ११०.००० रु किं मुद्देमाल आरोपींकडुन हस्तगत करण्यात आला आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक संदिपसिंह गिल, अप्पर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी बापुराव दडस यांच्या मार्गदर्शनाखाली यवत पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संतोष तासगावकर, पोलीस उपनिरीक्षक मारोती मेतलवाड, पोहवा संदिप देवकर, पोहवा रॉकी देवकाते, पोहवा अमोल काळे, पोहवा महेंद्र चांदणे, पो.कॉ.धिरज जाधव, पो.कॉ. प्रतिक जगताप, पो.कॉ. अमोल भुजबळ, पो.कॉ. सचिन गुंड, पो.कॉ. मारूती बाराते, पो. कॉ. दिनेश लोणकर व पो.कॉ.विनित कुऱ्हाडे यांनी केलेली आहे.



### जेजुरी कडेपठार गडावर प्लास्टिक, थर्माकोलच्या द्रोण-पत्रावळींना बंदी

**जेजुरी : दैनिक संध्या**

श्री क्षेत्र जेजुरी येथील खंडोबा देवतेचे मूळ स्थान असलेल्या कडेपठार गडावरील अन्नपूर्णा अन्नछत्रांमध्ये प्लास्टिक आणि थर्माकोलच्या द्रोण पत्रावळींच्या वापरावर बंदी घालण्यात आली आहे. श्री खंडोबा देवता लिंग कडेपठार ट्रस्टने हा निर्णय घेतला असून, भाविकांनी पर्यावरणपूरक नैसर्गिक पानांच्या द्रोण-पत्रावळींचाच वापर करण्याचे आवाहन ट्रस्टने केले आहे. कडेपठार मंदिर परिसरातील अन्नछत्रांमध्ये कडेपठार ट्रस्टसह अनेक भाविक वर्षभर अन्नदान करीत असतात. अन्नदानासाठी येताना अनेक भाविक प्लास्टिक आणि थर्माकोलच्या द्रोण-पत्रावळी सहज घेऊन येतात. मात्र, त्यांचे विघटन होत नसल्याने त्यांचा कचरा परिसरात साचत आहे. त्यामुळे प्रदूषण वाढून पर्यावरणाची हानी होत आहे. या पार्श्वभूमीवर देवस्थान ट्रस्टने अन्नछत्रांमध्ये केवळ नैसर्गिक पानांच्या पत्रावळींचाच वापर करण्याचा निर्णय घेतला आहे. प्लास्टिक व थर्माकोलच्या द्रोण-पत्रावळी अथवा अन्य अशा वस्तू देवस्थानाकडून स्वीकारल्या जाणार नसल्याचे ट्रस्टने स्पष्ट केले आहे. निसर्गसंवर्धन आणि पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने हा निर्णय लागू करण्यात आल्याची माहिती मुख्य विश्वस्त दिली. म्हाळसाकांत जेजुरीकर यांनी दरम्यान, ॲड मंगेश जेजुरीकर ,दीपक थोरात, दिलीप बांदल, जेजुरी उद्योजक संघाचे अध्यक्ष डॉ. रामदास कुटे, भाजपच्या अलका शिंदे, पुरंदर नोटरी क्लबचे अध्यक्ष ॲड. धनंजय भोईटे, जेजुरी देवसंस्थानचे माजी विश्वस्त नितीन राऊत, सामाजिक कार्यकर्ते राजेश शिंदे,डॉ मोनाली कुटे यांच्या उपस्थितीत झाडांच्या पानांपासून तयार केलेल्या पत्रावळींमध्ये भोजनप्रसाद घेऊन या उपक्रमाला प्रारंभ करण्यात आला. जेजुरी फोटो जेजुरी कडेपठार गडावरील अन्नछत्रात नैसर्गिक पत्रावळींचा वापर सुरू करताना.

### सई राजेंद्र भराट यांना 'केशव सन्मान पुरस्कार' जाहीर

**पुणे : दैनिक संध्या**



तृतीयपंथीय समाजाच्या हक्कांसाठी, सामाजिक सन्मानासाठी तसेच धार्मिक व सामाजिक प्रबोधनासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सई राजेंद्र भराट (सई नगरकर) यांना 'केशव सन्मान पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात येणार आहे. हिंदुस्थानातील पहिले शंखवादकांचे पथक म्हणून ओळख असलेल्या केशव शंखनाद पथकाच्या १०व्या वर्धापन दिनानिमित्त हा पुरस्कार प्रदान सोहळा रविवार, ६ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५.३० वाजता टिळक रस्त्यावरील स.प. महाविद्यालयाच्या लेडी रमाबाई सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. अशी माहिती केशव शंखनाद पथकाचे संस्थापक अध्यक्ष नितीन महाजन यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी पथकाचे सचिव रणजीत हगवणे,काळूराम डोमाळे, सुहास मदनाल, प्रमोद डोंगरे, शैलेंद्र भालेराव उपस्थित होते. वर्धापन दिन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ह.भ.प. चिदंबरेश्वर महाराज साखरे, (श्री गुरु साखरे महाराज साधक आश्रम, आळंदी) राहणार आहेत. इस्कॉन कात्रजचे राधिका विनोद दास प्रभू यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. नितीन महाजन म्हणाले, सई राजेंद्र भराट यांनी अहिल्यानगरमधील श्रीरामपूर भागात हिंदुत्वाचे कार्य, कृष्णभक्तीचा प्रचार-प्रसार आणि भगवद्गीतेतील उपदेश सोशल मीडिया तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचविण्याचे कार्य केले आहे. मठ, सभा व धार्मिक उपक्रमांमध्ये सहभागी होऊन हिंदुत्वाचा आवाज बुलंद करण्यासाठी त्या सातत्याने प्रयत्नशील आहेत. तृतीयपंथीय समुदायाच्या समस्या व संघर्ष समाजासमोर मांडण्यासोबतच शाळा-महाविद्यालयांमध्ये जनजागृती करून या समुदायाबद्दलचे गैरसमज दूर करण्याचे काम त्या करतात. समुदायाच्या हक्क व अस्तित्वासाठी आवाज उठविणे, भावी पिढीला चुकीच्या मार्गापासून दूर करून धर्माच्या वाटेवर आणणे, धार्मिक व सामाजिक उपक्रमांत सहभाग, रक्तदान तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून सामाजिक-धार्मिक प्रबोधन असे विविध समाजहिताचे कार्य त्या करीत आहेत. या उल्लेखनीय कार्याची दखल घेत 'केशव सन्मान पुरस्कार २०२६' त्यांना प्रदान करण्यात येणार आहे.

# चांगल्या गणेशोत्सव कार्यकर्त्यांचा सन्मान होतो याचा अभिमान

**■ पुणे (दै. संध्या)**



सध्या स्पर्धेचे युग आहे. प्रत्येकाला टेन्शन आहे. पुणे परिवारचे अभिनंदन कारण वाद्यपथकापासून सगळ्यांचा सन्मान केला, हे सोपे नाही. चांगल्या कार्यकर्त्यांचा सन्मान होतो, याचा अभिमान वाटतो. पूर्वी म्हणायचे, पुणे तिथे काय उणे; मात्र पुण्यात आता बदल झाला आहे. दुसऱ्यांना आनंद द्या, आनंदी रहा. आशीर्वाद देणारे लोक हीच आपली संपत्ती आहे. लोकांच्या कामी येण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कोणाचे मन दुखावेल असे करू नका. आनंदात राहा, हसत रहा, असे मत कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी व्यक्त केले.

पुणे परिवारच्या वतीने देण्यात येणारा लोकमान्य जीवन गौरव पुरस्कार ज्येष्ठ नेते आणि उर्वरित पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळाचे माजी अध्यक्ष उल्हास पवार यांना प्रदान करण्यात आला. टिळक रस्त्यावरील स.प. महाविद्यालयाच्या लेडी रमाबाई हॉलमध्ये झालेल्या कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या विविध गणेशोत्सव मंडळांच्या कार्यकर्त्यांचाही सन्मान करण्यात आला. यावेळी आमदार हेमंत रासने, महापौर मंजुषा नागपुरे, जन्मेजयराजे भोसले, माजी मंत्री बाळासाहेब शिवरकर, सुनील रासने, अण्णा थोरात, विजयकुमार कुवळेकर, महेश सूर्यवंशी, पराग ठाकूर, सूर्यकांत पाठक, पुणे परिवाराचे अध्यक्ष ॲड. प्रताप परदेशी, उपाध्यक्ष शिरीष मोहिते, कार्याध्यक्ष विनायक घाटे, सह कार्याध्यक्ष प्रकाश ढमढेरे आदी उपस्थित होते.

दत्तात्रय भरणे म्हणाले, माणसाने न्यूनगंड बाळगू नका. मी एक शेतकऱ्याचा मुलगा असून मंत्री झालो, असे सांगत त्यांनी दिवंगत अजित पवार यांच्या स्मृती जागवल्या. राजकारण निवडणुकीपुरते ठेवावे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

ते पुढे म्हणाले, पुण्याने मला खूप काही दिले असून, पुण्याशी माझे नाते वेगळे आहे. शिवाजी मराठा शाळेच्या वसतिगृहातील गणपतीच्या मिरवणुकीच्या आठवणी सांगताना ते म्हणाले, वसतिगृहाचा गणपती असताना गाडा करून नाचत-नाचत सारसबागेपासून जात कालव्यात गणपतीचे विसर्जन करत होतो. अशा प्रकारे त्यांनी पुण्यातील जुन्या आठवणींना उजाळा दिला.

विनायक घाटे म्हणाले, मागील २० वर्षांपासून हा सन्मान सोहळा होत आहे. गणेशोत्सव कार्यकर्त्यांच्या कार्यामुळे हा कार्यक्रम करण्याची प्रेरणा मिळाली. सामाजिक कार्यकर्ते समाजाला ऊर्जित अवस्था देतात. वर्षभर समाजात कार्य करणारे हे अष्टपैलू कार्यकर्ते आहेत.

पराग ठाकूर म्हणाले, आज काही दिवसांत गणेशोत्सव साजरा करण्याबाबत घुसळण होत आहे. हलाहल पचविण्याची ताकद कार्यकर्त्यांमध्ये आहे. गणपती कार्यकर्त्यांचा सन्मान हा आनंद देणारा आहे.

हेश सूर्यवंशी, विजय कुवळेकर यांनी मनोगत व्यक्त केले. ॲड. प्रताप परदेशी यांनी पुरस्कार्थ्यांची माहिती दिली.

*आदर्श गणेशोत्सव कार्यकर्ता पुरस्काराने नारायण पेठ माती गणपती मंडळ ट्रस्टचे अध्यक्ष परेश हराळे, देशप्रेमी मित्र मंडळ, एरंडवणेचे कार्यकर्ते मंदार बलकवडे, विद्यानगरी मित्र मंडळ, धनकवडीचे अध्यक्ष प्रतीक कुंभार, अखिल रामनगर मित्र मंडळ, येरवडाचे अध्यक्ष राकेश चव्हाण आणि श्री गजानन मित्र मंडळ ट्रस्ट, तुळशीबागचे अध्यक्ष सागर दहिभाते यांचा गौरव करण्यात आला.*

*गणेश सेवा पुरस्कार मानस गोईलकर तसेच तृतीयपंथीय सर्व वादकांचे शिखंडी वाद्यपथक यांना प्रदान करण्यात आला.

गणराया गुणगौरव विशेष सन्मान पराग प्रभाकर बंगाळे आणि येरवडा मध्यवर्ती कारागृहातील पुंडलिक वासुदेव खलोरकर यांना प्रदान करण्यात आला.

## तिसऱ्या श्रावणी सोमवारी रामलिंग, देव्हडेश्वर मंदिरात भाविकांची मोठी गर्दी

**■ शिरूर (दै. संध्या)**

तिसऱ्या श्रावणी सोमवारनिमित्त शिरूर शहरालगत असलेल्या श्री रामलिंग महाराज मंदिर तसेच देव्हडेश्वर महाराज मंदिरात भाविकांची मोठी गर्दी झाली होती. पहाटेपासूनच दर्शनासाठी भाविकांच्या रांगा लागल्या होत्या. श्रावणातील सोमवार असल्याने संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

श्री रामलिंग महाराज मंदिरातील शिवपिंडीबाबत पौराणिक आख्यायिका प्रचलित आहे. प्रभू श्रीराम वनवासात असताना या परिसरात आले होते आणि त्यांनी स्वतः या शिवपिंडीची स्थापना केली, अशी भाविकांची श्रद्धा आहे. त्यामुळे श्रावण महिन्यात दररोज शिरूर शहरातून अनेक भाविक पहाटे पायी वारी करत



रामलिंग मंदिरात दर्शनासाठी जातात. तिसऱ्या श्रावणी सोमवारी पायी जाणाऱ्या भाविकांची संख्या लक्षणीय वाढली होती.

दरम्यान, श्रावण महिन्याच्या पहिल्या सोमवारपासून शिरूर शहरातील भाविकांनी एकत्र येऊन घोडनदी पात्रातील पाणी कावड यात्रेद्वारे रामलिंग मंदिरात नेण्यास सुरुवात केली आहे. तिसऱ्या श्रावणी सोमवारनिमित्त मध्यरात्री दीडच्या सुमारास कावड यात्रा रामलिंग मंदिराकडे रवाना झाली. पहाटे अडीचच्या सुमारास कावड यात्रा मंदिरात पोहोचल्यानंतर शिवपिंडीवर जलाभिषेक करण्यात आला. त्यानंतर महाआरती पार पडली. या कावड यात्रेत संतोष गवळी, सदानंद लांडे, अशोक भोसले, पठारे मामा, लक्ष्मण धोत्रे, श्याम कोळपकर, राजेंद्र जाधव, गोपीनाथ पठारे, श्याम चिखलीकर, प्रा. सतीश धुमाळ यांच्यासह अनेक भाविक सहभागी झाले होते. तिसऱ्या श्रावणी सोमवारनिमित्त रामलिंग मंदिराच्या प्रवेशद्वारासह गाभाऱ्यात आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती. मंदिर परिसरात भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. दिवसभर भाविकांची मोठी गर्दी राहिल्याने संपूर्ण परिसरात 'हर हर महादेव'च्या जयघोषाने भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

## जनरेटिव्ह एआय हॅकाथॉन पुण्यात झोनल राउंडसाठी पोहोचला

**■ पुणे (दै. संध्या)**

लॉजिटेक ने अ‍ॅस्पायर फॉर हर सोबत भागीदारीत # आपल्या क्षेत्रात प्रावीण्य मिळवणाऱ्या महिला उपक्रमांतर्गत देशव्यापी जनरेटिव्ह एआय हॅकाथॉनचा पुणे झोनल राउंड आयोजित केला. ही स्पर्धा एएसएम कॉलेजमध्ये झाली, ज्यामध्ये स्थानिक महिला टॅलेंट सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट आणि टेक्नॉलजी क्षेत्रातील एकत्र आली.

हा उपक्रम लॉजिटेक एमएक्स आणि अ‍ॅस्पायर फॉर हर यांच्या नेतृत्वाखालील देशव्यापी समन्वित प्रयत्न आहे, ज्याचा उद्देश महिलांना भविष्यकालीन तंत्रज्ञान कौशल्ये, मार्गदर्शन आणि करिअरच्या संधींमध्ये समान प्रवेश मिळवून देणे आहे. एंड-टू-एंड कौशल्यविकास चळवळ म्हणून डिझाइन केलेल्या या हॅकाथॉनमुळे महिलांना जनरेटिव्ह एआय क्षमता प्राप्त होतात, ज्यामुळे सिद्ध होते की प्रत्यक्षात वापरलेली जनरेटिव्ह एआय कौशल्ये आर्थिक स्वावलंबन आणि करिअर प्रगतीसाठी थेट उत्प्रेरक ठरू शकतात. देशव्यापी प्रभाव दाखवत, या चळवळीने जवळपास 1,00,000 महिलांना 15,729 महाविद्यालये आणि 5,107 शहरांमधून जोडले आहे, ज्यामध्ये 60% पेक्षा जास्त अर्जदार टियर 2 शहरांमधून आणि त्याखालील स्तरांमधून आले आहेत. प्रोग्राम आणि अंमलबजावणी भागीदार म्हणून अ‍ॅस्पायर फॉर हर यांनी या देशव्यापी उपक्रमाला एंड-टू-एंड सहभागी प्रवासात रूपांतरित करण्यात मदत केली. आपल्या समुदाय आणि संस्थात्मक नेटवर्कचा वापर करून अ‍ॅस्पायर फॉर हर यांनी आउटरीच, सहभागींचे एकत्रीकरण, जनरेटिव्ह एआय सक्षम करणे, मार्गदर्शन आणि आठ ठिकाणी झोनल राउंड्सचे समन्वय साधले. स्पर्धेपलीकडे, सहभागी महिलांना मार्गदर्शन, कौशल्यविकास, सहाध्ययन आणि करिअर संधींच्या विस्तृत परिसंस्थेत प्रवेश मिळेल.



## शिवलिंग पांडेश्वराला पंचक्रोशीतील कावडींचा जलाभिषेक

**■ पुरंदर (दै. संध्या)**

श्रावणातील तिसऱ्या सोमवारनिमित्त पुरंदर तालुक्यातील जयाद्री खोऱ्यात असलेल्या प्राचीन पांडेश्वर शिवालयातील बाहुबली शिवलिंगाला पंचक्रोशीतील कावडींमधून आणलेल्या पवित्र जलाने जलाभिषेक करण्यात आला. यावेळी 'हर हर महादेव'च्या जयघोषाने संपूर्ण पांडेश्वर परिसर दुमदुमून गेला होता.

श्रावणातील तिसऱ्या सोमवारी पांडेश्वरच्या महाशिवलिंगाला जलाभिषेक करण्याची कावड परंपरा विशेष महत्त्वाची मानली जाते. तेल्या-भुत्याची मानाची कावड तसेच पंचक्रोशीतील विविध गावांमधील कावडी मोठ्या भक्तिभावाने पांडेश्वर येथे दाखल झाल्या. पिंपरी, मावडी, कापूरहोळ, कुरोली, पांडेश्वर आदी परिसरातून शिवभक्त कावडी घेऊन नाचत-बागडत पांडेश्वरला आले.

पांडेश्वर गावातून ग्रामप्रदक्षिणा घेतल्यानंतर कावडी वाजत-गाजत शिवालयाच्या परिसरात दाखल झाल्या. येथील करा नदीकाठच्या पवित्र जलाशयात कावडींचे जलस्नान करून त्यातील पवित्र जल बाहुबली शिवलिंगावर धार धरून अर्पण करण्यात आले. प्रत्येक कावडीने मंदिराची प्रदक्षिणा घेतल्यानंतर देखण्या प्रवेशद्वाराला कावड टेकवण्याचा मान घेण्यात आला. तिसऱ्या सोमवारी होणाऱ्या या कावड उत्सवाला विशेष महत्त्व असल्याने सकाळपासूनच जलाभिषेक व आरतीसाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. यावेळी समाजसेवक लालाना जगताप, रोमणवाडीचे सरपंच जगताप यांच्यासह पंचक्रोशीतील विविध मान्यवर उपस्थित होते.

पांडेश्वर हे प्राचीन शिवालय असून येथील बाहुबली महाशिवलिंगाबाबत विविध पौराणिक आख्यायिका प्रचलित आहेत. भगवान श्रीकृष्ण आणि पाच पांडवांनी बेल व तांदळाने या महाशिवलिंगाची निर्मिती केली, अशी आख्यायिका पारंपरिक गुरव पुजारी आकाश दळवी यांनी सांगितली.

पाच पांडवांनी याच ठिकाणी आपल्या पूर्वजांचे श्राद्ध व पितृविधी केल्याचा पौराणिक इतिहासही सांगितला जातो. आजही येथे पितृशांती, पितृदोष निवारण आदी धार्मिक विधी केले जात असल्याने या क्षेत्राला धार्मिकदृष्ट्या विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

रोमणवाडीचे सरपंच सोनवणे व त्यांच्या सहकाऱ्यांच्या वतीने पांडेश्वर येथे येणाऱ्या भाविकांसाठी अन्नदान, पिण्याचे पाणी आणि इतर आवश्यक सोयी-सुविधांची व्यवस्था करण्यात आली होती. त्यामुळे कावड सोहळ्यासाठी आलेल्या शिवभक्तांना मोठा दिलासा मिळाला. पांडेश्वर परिसरात प्राचीन शिवालयासोबतच देखणी शिल्पसमृद्ध वास्तू, नदीकिनारा, भव्य तटबंदी, कोटाई माता मंदिर आणि पाच पांडवांचे मंदिर अशी अनेक धार्मिक व ऐतिहासिक स्थळे निसर्गाच्या सानिध्यात आहेत. मंदिराच्या प्रवेशद्वारासह परिसरातील शिल्पकलेत वैशिष्ट्यपूर्ण मंदिर स्थापत्याचे नमुने पाहायला मिळतात.

# 350 लेकरांसोबत साजरी झाली स्नेहाची राखीपौर्णिमा

**■ पिंपरी (दै. संध्या)**

नात्यांपलीकडे जाऊन समाजातील उपेक्षित घटकाला प्रेमाची आणि आपुलकीची ऊब देणे हीच खरी सणांची सार्थकता असते, याचा प्रत्यय चिंचवड येथील पुनरुत्थान समरसता गुरुकुलममध्ये आला. वंचित, भटके आणि विमुक्त समाजातील मुलांच्या चेहऱ्यावर उत्सवाचा खरा आनंद फुलवण्याच्या उदात्त भावनेतून 'तत्वम सोशल फाउंडेशन'च्या वतीने गुरुकुलममधील तब्बल 350 मुला-मुलींसोबत अनोखा रक्षाबंधन सोहळा आणि स्नेहभोजनाचा संवेदनशील उपक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.




उपक्रमादरम्यान फाउंडेशनने नेलेल्या राख्यांनी वातावरण भावूक झाले होते. गुरुकुलममधील मुलींनी तेथील मुलांना मायेची राखी बांधली, तसेच उपस्थित फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनाही राखी बांधत अनोखा जिव्हाळा जपला. रक्षाबंधन हा केवळ रूढी परंपरेतील सण नसून समाजातील दुर्लक्षित घटकांप्रती वाटणारी माणुसकी, आदर आणि सामाजिक बांधिलकीची ती एक प्रतिज्ञा आहे, ही भावना यावेळी अधोरेखित झाली. यាप्रसंगी ज्येष्ठ विचारवंत व समाजसेवक पद्मश्री गिरीशकाका प्रभुणे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, वंचित आणि उपेक्षित समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्यासाठी अशा आत्मीय उपक्रमांची नितांत गरज आहे. विशेषतः तत्वम फाउंडेशनच्या माध्यमातून सुशिक्षित तरुण वर्ग एकत्र येऊन सामाजिक जबाबदारीचे भान जपत असल्याबद्दल त्यांनी विशेष समाधान व्यक्त केले, तसेच हे सेवाकार्य अविरत सुरू ठेवण्याचे आवाहन केले. तत्वम सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष रवींद्र ठिकेकर म्हणाले की, सणांचा खरा आनंद हा समाजातील दुर्लक्षित व वंचित घटकांसोबत वाटून घेण्यातच असतो. या चिमुकल्यांच्या चेहऱ्यावरील हास्य हीच आमच्या सामाजिक कार्याची खरी ताकद असून, त्यांच्याशी जोडलेली ही नात्यांची आणि विश्वासाची वीण अधिक घट्ट करण्याचा आमचा निरंतर प्रयत्न राहील.

## थोडक्यात पण महत्वाचे



### ११ लाख ५० हजार रुपयांचे सोने-चांदीचे दागिने मूळ मालकांच्या ताब्यात

**कवठे येमाई : दैनिक संध्या**

शिरूर पोलीस ठाणे हद्दीत दाखल असलेल्या चोरीच्या दोन गुन्ह्यांमध्ये तपासादरम्यान जप्त करण्यात आलेले एकूण १४० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने आणि २०० ग्रॅम वजनाचे चांदीचे दागिने, असा एकूण ११ लाख ५० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल मूळ मालकांच्या ताब्यात देण्यात आला आहे.शिरूर पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर क्रमांक ६४९/२०२६, भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ३०५, ३३१(३)(४) अन्वये दाखल गुन्ह्यात चोरीस गेलेले व तपासादरम्यान जप्त केलेले १२१ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व २०० ग्रॅम वजनाचे चांदीचे दागिने, एकूण ९ लाख ९० हजार रुपये किमतीचे दागिने फिर्यादी शशांक बापूसाहेब कळमकर यांच्या ताब्यात देण्यात आले. तसेच गुन्हा रजिस्टर क्रमांक ६०४/२०२६, भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ३०४(२), ३(५) अन्वये दाखल गुन्ह्यात चोरीस गेलेले व तपासादरम्यान जप्त करण्यात आलेले १९ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र, अंदाजे १ लाख ६० हजार रुपये किमतीचे, फिर्यादी पूजा गजानन बु-हाडे यांच्या ताब्यात देण्यात आले. ही कारवाई पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल, अपर पोलीस अधीक्षक डॉ. शुभम कुमार, उपविभागीय पोलीस अधिकारी रविंद्र भोसले आणि पोलीस निरीक्षक विनोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. शिरूर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक शुभम चव्हाण, पोलीस हवालदार गणेश पालवे यांच्या पोलीस पथकाने ही कामगिरी केली.चोरीचा मुद्देमाल परत मिळाल्याने संबंधित फिर्यादींना मोठा दिलासा मिळाला असून, शिरूर पोलिसांच्या तपास व कारवाईचे कौतुक होत आहे.

### दलित पँथरच्या महाराष्ट्र प्रदेश अल्पसंख्यांक अध्यक्षपदी रफिक भाई कुरेशी यांची नियुक्ती

**पुणे : दैनिक संध्या**

दलित पँथर संघटनेतर्फे जिल्हा युवक, अल्पसंख्यांक आणि इतर पदांवर पुणे शहर आणि राज्यातील कार्यकर्त्यांच्या पदनियुक्त्या नुकतीच जाहीर करण्यात आल्याची माहिती संघटनेचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सुखदेव सोनवणे यांनी नवी पेठ येथील श्रमिक पत्रकार भवनमध्ये पत्रकार परिषदेत दिली. दलित पँथरच्या अल्पसंख्याक विभागाच्या प्रदेशाध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते रफिक भाई कुरेशी यांची नियुक्ती करण्यात आली. तर पुणे शहर अध्यक्ष पदासाठी प्रकाश साळवे यांची नियुक्ती करण्यात आली. पुणे शहर युवक अध्यक्ष पदासाठी राहुल सोनवणे यांची निवड करण्यात आली. पुणे जिल्हा युवक अध्यक्षपदी विक्रम कांबळे.दलित पँथर महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष सुखदेव तात्या सोनवणे यांच्या हस्ते हे नियुक्ती पत्र वाटप करण्यात आले. यावेळी दलित पँथर पुणे शहर अध्यक्ष प्रकाश साळवे, महाराष्ट्र प्रदेश युवक अध्यक्ष शुभम सोनवणे, पुणे शहर युवक अध्यक्ष राहुल सोनवणे, पुणे जिल्हा युवक अध्यक्ष विक्रम कांबळे, नयन शेख, शुभम माने, विजय शिरसाठ आदि उपस्थित होते.

### सासवडच्या सागर जाधव यांना पीएच. डी.



**सासवड : दैनिक संध्या**

सासवड येथील महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या वाघिरे हायस्कूलचे सेवानिवृत्त शिक्षक श्री. सुरेश सखाराम जाधव यांचे चिरंजीव डॉ. सागर आशा सुरेश जाधव यांनी पुणे विद्यापीठांतर्गत यश संपादन केले आहे. त्यांनी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न कॉलेज ऑफ फार्मसी (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न) मधून 'फार्मास्युटिक्स' या विषयात डॉक्टरेट (पीएच.डी.) पदवी संपादन केली आहे. या यशाबद्दल सासवड शहर आणि परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. या प्रवासात मॉडर्न कॉलेज व संशोधन केंद्राच्या फार्मास्युटिक्स विषयाचे प्रमुख प्रा. डॉ. अतुल फाटक यांचे अमूल्य मार्गदर्शन लाभले. तसेच, मॉडर्न कॉलेजचे प्राचार्य तथा संशोधन केंद्रप्रमुख डॉ. पी. डी. चौधरी यांचे बहुमूल्य मार्गदर्शन, सततची प्रेरणा आणि प्रोत्साहन यांचा या यशामध्ये विशेष वाटा राहिला असल्याचे डॉ. सागर जाधव यांनी सांगितले.



### नारायण जगताप यांचे निधन

**लोणी काळभोर : दैनिक संध्या**

कुंजीरवाडी येथील नारायण शंकर जगताप (वय ८२) यांचे अल्पक्षा आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे दोन मुले, चार मुली सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. हवेली तालुका मराठा महासंघाचे कार्याध्यक्ष गजानन जगताप यांचे ते वडील होते. कुंजीरवाडी व परिसरात नाना या टोपण नावाने ते प्रसिद्ध होते.

### लोणीकंदच्या कुटुंबांसाठी 'स्व. अजितदादा आरोग्य कवच योजना'

**कोरेगावमुळ : दैनिक संध्या**

पूर्व हवेली तालुक्यातील लोणीकंद गावातील कुटुंबांच्या आरोग्याची सुरक्षितता लक्षात घेऊन जयेश कंद सोशल फाउंडेशनच्या वतीने 'स्व. अजितदादा आरोग्य कवच योजना' हा महत्त्वपूर्ण सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत लोणीकंद गावातील कुटुंबांना मोफत आरोग्य विमा संरक्षण उपलब्ध करून देण्यात येणार आहे. आजच्या काळात आरोग्यविषयक उपचारांचा वाढता खर्च सर्वसामान्य कुटुंबांसाठी चिंतेचा विषय बनला आहे. अशा परिस्थितीत कुटुंबांना आरोग्याच्या संकटाच्या काळात आर्थिक आधार मिळावा, या सामाजिक भावनेतून जयेश कंद सोशल फाउंडेशनने हा उपक्रम हाती घेतला आहे. या योजनेसाठी नोंदणी करताना आधारकार्ड व मतदानकार्ड ही आवश्यक कागदपत्रे असल्याचे फाउंडेशनच्या वतीने सांगण्यात आले आहे. नोंदणीसाठी जयेश कंद सोशल फाउंडेशन, संपर्क कार्यालय, लोणीकंद येथे संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. 'आम्ही कामापुरते नाही, तर आम्ही कामाची माणसं आहोत'. या विचारातून सामाजिक बांधिलकी जपत फाउंडेशनच्या माध्यमातून विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले जात आहेत. स्वर्गीय अजितदादांच्या सामाजिक विचारांना कृतीतून आदरांजली वाहण्याचा हा उपक्रम असल्याची भावना व्यक्त करण्यात आली. या उपक्रमामुळे लोणीकंद परिसरातील अनेक कुटुंबांना आरोग्यविषयक संकटाच्या काळात मोठा दिलासा मिळणार असून, 'सेवा हीच खरी सामाजिक बांधिलकी' या भावनेतून राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. संपर्क : ७७२० ०५ ७०९५ / ९१७२ ६५ ७०९५

# शिरूर नगर परिषदेत सत्तेला हादरा!

**राष्ट्रवादी शरद पवार गटाचे पाच नगरसेवक सत्ताधारी गटातून बाहेर**

■ भाजपच्या गोटात उत्साह; नव्या सत्तासमीकरणाची शक्यता — सत्तेच्या चाव्या पुन्हा बदलणार?



> गटनेते आणि पक्षप्रमुखांना याबाबत वेळोवेळी माहिती देऊनही परिस्थितीत कोणताही बदल झाला नसल्याने अखेर सत्ताधारी गटातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतल्याचे ढोबळे यांनी स्पष्ट केले.

■ शिरूर (दै. संध्या)

शिरूर नगर परिषदेत गेल्या काही महिन्यांपासून सुरू असलेल्या अंतर्गत राजकीय धुसफुशीला अखेर तोंड फुटले असून, सत्ताधारी 'शिरूर नगर परिषद गटाला' मोठा धक्का बसला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या पाच नगरसेवकांनी सत्ताधारी गटातून बाहेर पडण्याचा निर्णय घेत नगराध्यक्षा ऐश्वर्या अभिजीत पाचर्णे यांना पत्र दिल्याने नगर परिषदेतील सत्तेची गणिते पुन्हा एकदा ढवळून निघाली आहेत. उपनगराध्यक्ष मितेश प्रदीप गादिया, माजी नगराध्यक्ष रवींद्र उर्फ शाम मनोहर ढोबळे, पाणीपुरवठा समितीच्या सभापती डॉ. सुनिता संतोष पोटे, महिला व बालकल्याण समितीच्या उपसभापती स्वप्नाली योगेश जामदार आणि सदस्या चारुशिला गणेश कोळपकर यांनी नगराध्यक्षा पाचर्णे यांना पत्र देत सत्ताधारी गटातून मुक्त करण्याची मागणी केली आहे.

या निर्णयामुळे शिरूर नगर परिषदेच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली असून, 'सत्तेसाठी झालेली तडजोड आता तुटण्याच्या मार्गावर' असल्याची चर्चा शहरात रंगली आहे. डिसेंबर २०२५ मध्ये झालेल्या शिरूर नगर परिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या ऐश्वर्या अभिजीत पाचर्णे नगराध्यक्षपदी निवडून आल्या. नगरसेवकांच्या संख्येत मात्र भाजपने बाजी मारत ११ जागा जिंकल्या. राष्ट्रवादी काँग्रेसचे सात, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पाच आणि एका अपक्षाने विजय मिळविला. नगर परिषदेच्या २४ सदस्यीय सभागृहात बहुमतासाठी १२ सदस्यांची आवश्यकता होती. मात्र, कोणत्याही एका पक्षाला बहुमत गाठता आले नसल्याने त्रिशंकू अवस्था निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांचे नगरसेवक आणि एका अपक्षाने एकत्र येत १४ जानेवारी २०२६ रोजी जिल्हाधिकाऱ्यांकडे 'शिरूर नगर परिषद गट' या नावाने स्वतंत्र गटाची नोंदणी केली आणि सत्ता स्थापन केली. सर्वाधिक ११ नगरसेवक निवडून आणूनही भाजपला सत्तेपासून दूर राहावे लागले.

सत्तास्थापनेनंतर उपनगराध्यक्षपदासह पाणीपुरवठा समितीचे सभापतीपद आणि महिला व बालकल्याण समितीचे उपसभापतीपद राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नगरसेवकांकडे देण्यात आले. मात्र, राजकीय तडजोडीतून तयार झालेला हा गट प्रत्यक्षात मनाने एक झाला नसल्याचे गेल्या काही महिन्यांपासून दिसून येत होते. किरकोळ कुरबुरी, हेवेदावे, आरोप-प्रत्यारोप आणि विकासकामांवरून सुरू असलेली राजकीय चढाओढ अखेर उघड संघर्षाच्या टप्प्यावर पोहोचली. सत्ताधारी गटातून बाहेर पडण्याच्या निर्णयामागे नगर परिषदेच्या कामकाजातील दुजाभाव आणि सापत्नभावाची वागणूक कारणीभूत असल्याचा गंभीर आरोप माजी नगराध्यक्ष रवींद्र उर्फ शाम ढोबळे यांनी केला आहे.

पक्षाचे नेते व स्थानिक पदाधिकाऱ्यांशी चर्चा केल्यानंतरच सत्ताधारी गटातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले. नगराध्यक्षा पाचर्णे यांना दिलेल्या पत्रात, नगर परिषदेच्या सर्वसाधारण तसेच विशेष सभांमध्ये त्यांच्या गटाच्या मतांची व विचारांची दखल घेतली जात नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. सभांमधील विषयांवर पुरेशी चर्चा अथवा विचारविनिमय न करता निर्णय घेतले जात असल्याचेही पत्रात नमूद करण्यात आले आहे. विशेष सभेपूर्वी किंवा सभेनंतरही त्यांच्या गटाच्या मतांचा विचार केला जात नसल्याचा आरोप करण्यात आला असून, दैनंदिन कामकाजातही त्यांच्या गटातील नगरसेवकांना डावलण्याची भूमिका घेतली जात असल्याचे त्यांनी म्हटले आहे. सत्तास्थापनेसाठी आमच्या पक्षाच्या नगरसेवकांनी पाठिंबा दिला असतानाही विकासप्रक्रियेत त्यांना सहभागी करून घेतले जात नसल्याने नगर परिषदेच्या कारभारात पारदर्शकतेचा अभाव निर्माण झाला असून भ्रष्टाचाराला पोषक वातावरण तयार होत असल्याचा गंभीर आरोप या पत्रातून करण्यात आला आहे.

### भाजपच्या गोटात उत्साह; सत्तेचे नवे समीकरण जुळणार?

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या पाच नगरसेवकांनी सत्ताधारी गटातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतल्याने विद्यमान सत्ताधारी गटाचे बहुमत धोक्यात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे आगामी काळात नगर परिषदेत धोरणात्मक निर्णय घेताना सत्ताधाऱ्यांसमोर मोठे आव्हान उभे राहण्याची शक्यता आहे. दरम्यान, ११ नगरसेवक असलेल्या भाजपच्या गोटात या घडामोडीनंतर उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पाच नगरसेवक एकत्र आल्यास नगर परिषदेतील सत्तेचे समीकरण पूर्णपणे बदलू शकते, अशी राजकीय चर्चा सुरू झाली आहे. असे समीकरण जुळल्यास उपनगराध्यक्षपदासह विविध विषय समित्यांवरही नव्या गटाचे वर्चस्व निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नगराध्यक्षपद राष्ट्रवादी काँग्रेसकडे असले तरी सत्तेच्या प्रत्यक्ष चाव्या कोणाच्या हातात राहणार, याकडे आता संपूर्ण शिरूरचे लक्ष लागले आहे. राजकीय तडजोडीतून जन्मलेली सत्ता आता अंतर्गत मतभेदांमुळे डळमळीत झाली असून, शिरूर नगर परिषदेच्या राजकारणात पुढील काही दिवस अत्यंत निर्णायक ठरण्याची चिन्हे आहेत.

## पशुधन चोरट्यांचा शिरूर पोलिसांकडून पर्दाफाश - दोन आरोपी जेरबंद

■ कवठे येमाई (दै. संध्या)



पशुधन चोरीच्या घटनांनी त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देणारी मोठी कारवाई शिरूर पोलिसांच्या डी.बी. पथकाने केली आहे. तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय माहितीच्या आधारे तपासाची चक्रे फिरवत पोलिसांनी दोन आरोपींना जेरबंद करून पशुधन चोरीचे दोन गुन्हे उघडकीस आणले आहेत. या कारवाईत चोरीस गेलेल्या दोन म्हशी, दोन बैल आणि एक पिकअप वाहन असा सुमारे ५ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. शिरूर तालुक्यातील सरडवाडी गावच्या हद्दीत ११ ऑगस्ट रोजी सायंकाळी ४ ते १२ ऑगस्ट रोजी पहाटे ४ वाजण्याच्या दरम्यान दादाभाऊ मगर यांच्या शेतातील मोकळ्या जागेत बांधलेल्या दोन म्हशी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्या होत्या. सुमारे ८० हजार रुपये किमतीच्या या म्हशी चोरीला गेल्याने शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास करत असताना पोलिसांना संशयित आरोपी रामनाथ सलीम भोसले (वय ३१, रा. पाण्याची टाकी, शिरूर) याच्याबाबत माहिती मिळाली. पोलिसांनी शिरूर बाजारपेठ परिसरात सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने साथीदाराच्या मदतीने पशुधन चोरी केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. तपासादरम्यान शिरूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आणखी एक पशुधन चोरीचा गुन्हा ही उघडकीस आला. चोरी केलेल्या पशुधनाची जावेद बबन पठाण (वय ३७, रा. वाळकी, जि. अहिल्यानगर) याच्याकडे विक्री केल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने त्यालाही पोलिसांनी अटक केली. दोन्ही आरोपींकडून चोरीस गेलेल्या दोन म्हशी,दोन बैल आणि पिकअप वाहन असा ५ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.दोन्ही आरोपींना न्यायालयात हजर केले असता ३ सप्टेंबर २०२६ पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजूर करण्यात आली आहे.

## डॉ. भागवत अशोक गोल्डे यांना राष्ट्रीय गौरव पुरस्कार

■ आळंदी (दै. संध्या)



कलाजीवन बहुउद्देशीय संस्था यांच्या वतीने दरवर्षी विविध क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. यावर्षी संपूर्ण देशातून सामाजिक, शैक्षणिक व बहुजन-आदिवासी विकासाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना 'राष्ट्रीय गौरव पुरस्कार २०२६'ने सन्मानित करण्यात आले आहेत. यामध्ये पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातील ज्ञानराज विध्या प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य डॉ. भागवत अशोक गोल्डे यांना 'राष्ट्रीय गौरव पुरस्कार २०२६'ने सन्मानित करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या तृप्तीताई देसाई यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय सकल ब्राह्मण महासंघाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय कुलकर्णी सुपेकर होते.

या प्रसंगी अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराजजी राजेभोसले, बॉलीवूड अभिनेत्री रूपाली पवार, ॲड. रमेश खेमू राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष सामाजिक कार्यकर्त्या डॉ. अलका नाईक या होत्या, तर कार्यक्रमाचे आयोजन कलाजीवन बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. युवराज ठाकरे यांनी केले होते.

डॉ. भागवत गोल्डे यांना आतापर्यंत आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य, विभागीय, जिल्हा, तालुका आणि गाव पातळीवर तब्बल ५१ पुरस्कार मिळाले असून, हा त्यांचा 51वा सन्मान ठरला आहे. महाराष्ट्र शासन शासन संत श्री ज्ञानेश्वर मुलांचे वसतिगृह आळंदी कार्यरत असून तसेच महाराष्ट्र शासनाचा 'सनशाईन इंग्लिश मिडीयम स्कूल आळंदी यांचे चेअरमन आहे अल्पसंख्याक व वंचित घटकांतील तरुणांसाठी राबवले जात आहे. हे प्रशिक्षण केंद्र आजही यशस्वीपणे सुरू असून, यासोबतच वाचनालय, ग्रंथालय आणि स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र अशा विविध सामाजिक योजना डॉ. गोल्डे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभावीपणे योजना राबवल्या जात आहेत.

त्यांच्या या कार्याची दखल घेत ऑल इंडिया बंजारा टायगर्स, अल्पसंख्याक निवासी पोलीस भरती पूर्व संघटना महाराष्ट्र राज्य आणि महाराष्ट्र राज्य अनुदानित वसतिगृह कर्मचारी संघटना यांच्या वतीने त्यांचे सर्वत्र कौतुक व हार्दिक अभिनंदन केले जात आहे.

## १८२२ वीजचोरांना महावितरणचा दणका; ६.१५ कोटींचा दंड

**२५ लाख ८९ हजार युनिट वीजचोरी उघड**

■ पुणे (दै. संध्या)

वीजचोरी करणाऱ्यांविरुद्ध महावितरणने धडक मोहीम सुरू ठेवली असून, एप्रिल ते ऑगस्ट २०२६ या पाच महिन्यांत पुणे परिमंडलातील पुणे ग्रामीण, गणेशखिंड शहर आणि रास्तापेठ शहर मंडलात १८२२ वीजचोरीची प्रकरणे उघडकीस आली असून, त्यांनी २५ लाख ८९ हजार ९५० युनिट वीजचोरी केल्याचे उघड झाले आहे. या सर्व वीजचोरांना ६ कोटी १५ लाखांचा दंड महावितरणने ठोठावल्याने वीजचोरी करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

भारतीय विद्युत अधिनियम २००३ मधील कलम १३५ व १३८ अन्वये मीटरमध्ये फेरफार करून अथवा वीज यंत्रणेद्वारे थेट आकडा किंवा केबल टाकून वीजचोरी करणाऱ्या ग्राहकांवर महावितरणकडून कारवाई करण्यात येते.

मोठ्या वीजचोरीच्या प्रकरणांमध्ये चाकण एमआयडीसी उपविभागातील 'व्यंकटेश इंडस्ट्रीजने (न्यू मल्हार इंडस्ट्रीज)' ७४९२२ युनिट वीजचोरी केल्याचे आढळून आले. त्यास १६ लाख १६ हजार रुपये तर चाकणमधीलच 'संत कृपा एंटरप्रायझेसला' ३८६६८ युनिटसाठी १५ लाख २२ हजारांचा दंड आकारण्यात आला. हडपसर औद्योगिक उपविभागातील 'द चेअरमन पार्क इन्फिनिया' येथे ४७८६७ युनिट वीजचोरीसाठी १६ लाख २९ हजार रुपये, गणेशखिंड उपविभागातील 'मिहिर एंटरप्रायझेस'ला ४७२१० युनिटसाठी १३ लाख ५२ हजार रुपये दंडाची आकारणी झाली. मंचर उपविभागातील 'नवनाथ रंगनाथ बांगर' या ग्राहकाने ३८४६८ युनिट वीजचोरी केल्याचे आढळून आले. या ग्राहकाला ४ लाख १९ हजार रुपयांचा दंड लावला आहे. राजगुरुनगर उपविभागातील 'भाग्यश्री राजेंद्र भालेराव' या ग्राहकाला ३३३२१ युनिटसाठी ८ लाख ३ हजार रुपये, हडपसर उपविभागातील 'माधुरी दिनेश शिवरकर' ला ३२७१० युनिटसाठी ३ लाख ७३ हजार रुपये आणि 'दिनेश मारुती शिवरकर' ग्राहकाकडे १८४४० युनिट वीजचोरी आढळून आल्याने त्यास ४ लाख ३२ हजार रुपये, 'मिनिनाथ मारुती सावंत' यास २४७९१ युनिटसाठी २ लाख ६८ हजार रुपये दंडाची आकारणी करण्यात आली. याशिवाय औंध उपविभागातील 'अक्षय विश्वनाथ निकाळजे' ग्राहकाची २१५८३ युनिट वीजचोरी सापडली त्यांना २ लाख ४९ हजार रुपये दंडाचा फटका बसला.

### महावितरणचे आवाहन

वीज ही राष्ट्रीय संपत्ती असून तिची चोरी करणे हा कायद्याने गुन्हा आहे. वीजचोरीच्या प्रकरणात दंडासोबतच कारावासाचीही तरतूद वीज कायद्यात आहे. तसेच, वीजचोरी करताना जीविताला धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे नागरिकांनी नियमानुसार अधिकृत वीजजोडणी घेऊनच विजेचा वापर करावा, असे आवाहन महावितरणने केले आहे.

## डिंभे-माणिकडोह बोगद्याला वळसे पाटलांचा विरोध

■ नारायणगाव (दै. संध्या)

कुकडी पाटबंधारे प्रकल्पाच्या ५,७०४.५० कोटी रुपयांच्या चौथ्या सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावाला राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे. मात्र, या सुधारित मान्यतेमध्ये मूळ कुकडी प्रकल्पात समाविष्ट नसलेल्या डिंभे-माणिकडोह या बोगद्याचा समावेश करण्यात आल्यामुळे आंबेगाव, शिरूर आणि जुन्नर तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी या निर्णयाला जाहीर विरोध दर्शवला असून या वादग्रस्त बोगद्याच्या निर्णयाचा तात्काळ पुनर्विचार करावा, अशी मागणी केली आहे. मंत्रिमंडळाच्या या निर्णयाची माहिती मिळताच दिलीप वळसे पाटील यांनी तातडीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रत्यक्ष भेट घेतली आणि त्यांना एक सविस्तर निवेदन सुपूर्द केले.मुख्यमंत्री महोदयांशी झालेल्या चर्चेदरम्यान वळसे पाटील यांनी या बोगद्यामुळे आंबेगाव, शिरूर आणि जुन्नर या तालुक्यांतील जनतेचा असलेला तीव्र विरोध मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिला. या बोगद्याच्या निर्मितीमुळे परिसरातील शेतीच्या सिंचनाचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता असून, त्यामुळे स्थानिक शेतकऱ्यांच्या पाण्याच्या हक्कांवर परिणाम होईल, अशी ठाम भूमिका त्यांनी व्यक्त केली. दिलीप वळसे पाटील यांनी मुख्यमंत्र्यांना जुन्या निर्णयांची आठवण करून देताना सांगितले की, १८ जुलै २०२४ रोजी तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत मुख्यमंत्र्यांसोबत एक महत्त्वाची बैठक झाली होती. त्या बैठकीत झालेल्या सविस्तर चर्चा, 'डिंभे-माणिकडोह बोगदा केला जाणार नाही' असे स्पष्ट आश्वासन मुख्यमंत्री महोदयांनी दिले होते. या सर्व बाबी पुन्हा एकदा मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आल्या आहेत. दिलीप वळसे पाटील यांच्या निवेदनाची आणि आक्रमक भूमिकेची दखल घेत मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीत झालेल्या या निर्णयामध्ये आवश्यक तो बदल करण्यात येईल.

## शिरूर शहरात वाहतूक नियमभंग करणाऱ्यांना पोलिसांचा दणका; २५७ वाहनांवर कारवाई

**विनापरवाना वाहनचालक, ट्रिपल सीट, फॅन्सी नंबर प्लेट व काळ्या काचांवर कारवाई**

■ शिरूर (दै. संध्या)



शिरूर शहरातील प्रमुख चौकांमध्ये करण्यात आलेल्या या नाकाबंदीमध्ये वाहनचालकांकडे वाहन चालविण्याचा परवाना आहे की नाही, वाहनावर नियमानुसार नंबर प्लेट आहे का, वाहनावर काळ्या काचा लावण्यात आल्या आहेत का, तसेच दुचाकीवर ट्रिपल सीट प्रवास केला जात आहे का, यासह इतर वाहतूक नियमांची तपासणी करण्यात आली. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर जागेवरच कायदेशीर कारवाई करण्यात आल्याने वाहनचालकांमध्ये काही काळ खळबळ उडाली. विशेषतः विनापरवाना वाहन चालविणे, ट्रिपल सीट प्रवास, फॅन्सी नंबर प्लेट, काळ्या काचा तसेच इतर वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांना पोलिसांनी दंडात्मक कारवाईचा सामना करावा लागला. शहरातील प्रमुख चौकांमध्ये पोलिसांची नाकाबंदी असल्याने अनेक वाहनचालकांनी वाहतूक नियमांचे पालन करत वाहने चालविण्यास प्राधान्य दिले.

शिरूर शहरातील वाढती वाहतूक कोंडी तसेच वाहनचालकांकडून होणारे वाहतूक नियमांचे उल्लंघन रोखण्यासाठी शिरूर पोलिसांनी विशेष मोहीम राबवित कडक कारवाई केली. उपविभागीय पोलिस अधिकारी रविंद्र भोसले यांच्या उपस्थितीत व पोलिस निरीक्षक विनोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शिरूर शहरातील पाबळ फाटा, विद्याधाम चौक आणि सिटी बोरा कॉलेज चौक या गर्दीच्या ठिकाणी नाकाबंदी करून वाहनांची तपासणी करण्यात आली. या कारवाईत विविध वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध तब्बल 257 केसेस दाखल करून 3 लाख 59 हजार 500 रुपयांचा दंड आकारण्यात आला.